

CMYK
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
सोलापूर | रविवार, १४ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १९६ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



संस्थेत अनुशासन जास्त, प्रशासन कमी असावे. अनुशासनाचा आदर्श संस्थेच्या प्रमुखाने, प्रमुख मंडळींनी घालून दिला पाहिजे. अनुशासनात कुठे कमतरता आढळली, दोष आढळले तर ज्या माणसाबद्दल ते असतील त्याच्याशी थेट संपर्क करावा व त्या गोष्टीची इतरत्र चर्चा करू नये.

**स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

# जगाला मार्गदर्शन करण्यासाठी भारताने सज्ज राहावे : सरसंघचालक



**तिरुवनंतपुरम्, १३ जून**

सनातन धर्म हा भारताचा आत्मा आहे आणि भारतीय संस्कृतीचा विचार आधुनिक जगासमोरील आव्हानांवर शाश्वत उपाय प्रदान करतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी शनिवारी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या प्रवासाच्या निमित्ताने आयोजित एका कार्यक्रमात ते संबोधित करीत होते. राष्ट्र पुनर्रचना आणि जागतिक कल्याणासाठी संघटित होण्याचे आवाहन त्यांनी समाजाला केले.

भारताच्या समृद्ध क्रांतिकारी वारशाचे स्मरण करीत त्यांनी सुभाषचंद्र बोस आणि वीर सावरकर यांच्यासारख्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली तसेच रा. स्व. संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे जीवन आणि त्यांची दूरदृष्टी यावर प्रकाश टाकला. डॉ. हेडगेवार असे देशभक्त होते, ज्यांनी अगदी लहानपणापासून देशाप्रति असाधारण निष्ठा दाखवली तसेच वैयक्तिक अडचणींवर मात करून स्वतःला समाजसेवा आणि राष्ट्रजागृतीसाठी समर्पित केले, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

उपासना पद्धतींमधील भिन्नता असूनही सामायिक सांस्कृतिक व सभ्यताविषयक मूल्यांमुळे भारत ऐतिहासिकदृष्ट्या एकसंध राहिला, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सनातन धर्म आणि भारतीय अस्मितेवर भाष्य करताना म्हटले. गुरुनानक देवजींनी मांडलेल्या 'हिंदुस्थान'च्या संकल्पनेचा संदर्भ देत त्यांनी यावर भर दिला की, सनातन धर्म समाजाला एकत्र बांधून ठेवणाऱ्या एकतेची जाणीव करून देण्यासोबतच विविधतेचा आदर करण्यासही शिकवतो. हिंदुत्व ही सामाजिक एकात्मता साधणारी एक शक्ती असून, ती 'वसुधैव कुटुम्बकम्' या आदर्शांचे प्रतिबिंब दर्शवते, असेही त्यांनी नमूद केले.

(पान २ वर...)

### हिंदुत्व संकुचित विचारधारा नाही

हिंदुत्व ही काही संकुचित विचारधारा नसून, ती एक जिवंत सांस्कृतिक परंपरा आहे, असे प्रतिपादन डॉ. मोहनजी भागवत यांनी सामाजिक एकतेबाबत केले. रा. स्व. संघ हा सामाजिक एकोपा दृढ करण्यासाठी, सामाजिक भेद दूर करण्यासाठी आणि सामूहिक जबाबदारीची भावना जोपासण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय जीवन आणि सांस्कृतिक सातत्यावर परिणाम करणाऱ्या आव्हानांबाबत समाजाने जागरूक राहण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

## धीरज सेठ होणार लष्करप्रमुख



**नवी दिल्ली, १३ जून**

केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची भारताचे पुढील लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. ३० जूनपासून ते पदाची धुरा सांभाळतील. लष्कराच्या आधुनिकीकरणातील त्यांच्या योगदानासाठी ते एक अग्रगण्य जनरल ऑफिसर म्हणून ओळखले जातात. राष्ट्रपतींनी लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची जनरल पदावर पुढील 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ' (लष्करप्रमुख) म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. (वृत्तसंस्था)

## उत्तर कोरियाला अमेरिकेचा दणका

### वैद्यकीय उपकरणांच्या निर्यातीवर बंदी | विशेष परवानगीची ठेवली अट



**वॉशिंग्टन, १३ जून**

अणू कार्यक्रमाचा सातत्याने विस्तार करणाऱ्या उत्तर कोरियावर अमेरिकेने वैद्यकीय उपकरणांच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. त्यांना यापुढे निर्यातीसाठी विशेष परवानगी घ्यावी लागणार आहे.

अमेरिकेतून उत्तर कोरियाला निर्यात करण्यात येणाऱ्या वैद्यकीय उपकरणांसाठी नवे नियम जारी करण्यात येत असल्याचे वाणिज्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. वैद्यकीय उपकरणांची यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, निर्यातीसाठी आता उत्तर कोरियाला विशेष परवानगी घ्यावी लागणार आहे. यादीनुसार, काही वैद्यकीय उपकरणे आता सामान्य परवान्याच्या कक्षेतून वगळण्यात आली आहेत. यापूर्वी, काही कृषी उत्पादने, औषधे आणि वैद्यकीय उपकरणांच्या निर्यातीला सामान्य परवान्याअंतर्गत परवानगी होती. बंदी घालण्यात आलेल्या उपकरणांमध्ये गामा इमेजिंग उपकरणे, टॅक्टाइल इमेजिंग, थर्मोग्राफी मशीन, फ्रीझ-ड्रायिंग आणि स्प्रे-ड्रायिंग, निर्जंतुकीकरण शॉवर, प्रयोगशाळा शेकर्स आणि इनक्यूबेटर शेकर्स, कार्बन डायऑक्साइड इनक्यूबेटर, दुहेरी वापराच्या उपकरणांचा यात समावेश आहे. अमेरिकेचा हा निर्णय नागरी आणि लष्करी अशा दोन्ही कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांच्या निर्यातीवर मर्यादा घालण्याच्या उद्देशाने घेतला गेला आहे. (वृत्तसंस्था)

## ईशान्य भारतातून आफ्सा हटविणार : गृहमंत्री शहा

### नागालॅण्ड-आसाम सरकारचा खनिज उत्खननासाठी करार

**नवी दिल्ली, १३ जून**

पुढील वर्षापर्यंत एक-दोन राज्ये वगळता संपूर्ण ईशान्य भारतातून आफ्स्पा (सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा ) हटवला जाईल, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली आहे.

आसाम-नागालॅण्ड सीमेवर तेल आणि खनिजांच्या उत्खननासाठी केंद्र सरकार, आसाम सरकार आणि नागालॅण्ड सरकार यांच्यात त्रिपक्षीय करारावर स्वाक्षरी यावेळी बोलताना शाह म्हणाले, संपूर्ण ईशान्य भारत 'राष्ट्र प्रथम' या भावनेने पुढे वाटचाल करीत आहे आणि हा करार या प्रदेशाच्या प्रगतीसाठी नवीन मार्ग खुले करेल.

केंद्र सरकार ईशान्य भारतात कायमस्वरूपी शांतता आणि विकासाला चालना देण्यासाठी सातत्याने पावले उचलत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे २०१९ पासून बारापेक्षा जास्त शांतता करारांवर स्वाक्षरी झाली आहे. यामुळे हिंसक घटनांमध्ये ८० टक्के घट झाली.

आगामी वर्षभरात एक-दोन राज्ये वगळता इतर ईशान्य भारतातील आफ्स्पा हटवला जाईल. (वृत्तसंस्था)

### विकसित भारताच्या दिशेने वाटचाल

**आसाम-नागालॅण्ड सीमा क्षेत्रात तेल आणि खनिज उत्खननाबाबतचा करार, ईशान्य भारताला विकासाच्या दिशेने पुढे नेईल. यामुळे देशाला ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आत्मनिर्भर होण्यास मदत होईल. सामंजस्य करारामुळे ऊर्जा उत्पादन क्षमता दहा पटीने वाढवता येईल. केवळ एकाच भागातून १५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे तेल काढता येऊ शकते. आपण नागालॅण्डमध्ये पसरलेले तेलसाठे काढले, तर तेलाच्या गरजांसाठी इतर देशांवरील अवलंबित्व कमी होईल, असे शाह म्हणाले.**

## विमान कोसळले; पाच जवान हुतात्मा



स्क्वाड्रन लीडर प्रशांतसिंह, सार्जंट जितेंद्र शर्मा, खेमाराम कुमावत, दिनेश आलम, फ्लाईट लेफ्टनंट शुभमकुमार

**नवी दिल्ली, १३ जून**

आसाममधील जोरहाट येथील वायुतळावर उतरत असलेले मालवाहू विमान एएन-३२ शनिवारी कोसळून या अपघातात वायुदलाचे पाच जवान हुतात्मा झाले, अशी माहिती संरक्षण विभागाने दिली.

या भीषण अपघातात स्क्वाड्रन लीडर प्रशांतसिंह, फ्लाइट लेफ्टनंट शुभमकुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, वायुदलाचा अग्निवीर खेमाराम कुमावत आणि दानिश आलम हुतात्मा झाले, अशी माहिती वायुदलाने अपघातानंतर दिली. धावपट्टीवर उतरत असताना अपघातग्रस्त झाल्यावर विमानाला आग लागली. आपत्कालीन प्रतिसाद पथकाने तातडीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले. विमान धावपट्टीवर उतरताच त्यात अचानक आग लागली आणि धुराचे लोट आकाशात लोटले. हे दृश्य अतिशय भीषण होते. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी या अपघातावर तीव्र दुःख व्यक्त केले. (वृत्तसंस्था)

## भरदिवसा बंदुकीचा धाक दाखवून सोन्याचे दागिने पळविले

### वर्दळीच्या ७० फूट रोडवरील घटना 'सीसीटीव्ही'त कैद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

सोलापूर शहरातील सतत वर्दळ असलेल्या ७० फूट रोडवरील शिवकुमार ज्वेलर्स या सोन्याच्या दुकानात भरदिवसा बंदूक दाखवून सोन्याचे दागिने पळवल्याची खळबळजनक घटना शनिवार, १३ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली.



शिवकुमार ज्वेलर्स हे दुकान उघडून काही वेळच झाला होता. इतक्यात ग्राहक बनून आलेल्या तीन अज्ञात दरोडेखोरांनी दुकानात प्रवेश केला. दुकानदाराला काही समजण्याच्या आतच दरोडेखोरांनी थेट बंदूक बाहेर काढली आणि दुकानदाराच्या डोक्याला लावली.

बंदुकीचा धाक दाखवून दुकानदाराला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे घाबरलेल्या दुकानदाराला प्रतिकार करणे अशक्य झाले. दरोडेखोरांनी अवघ्या काही मिनिटांतच दुकानातील सोन्याचे मौल्यवान दागिने गोळा केले आणि घटनास्थळावरून पोबारा केला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस तात्काळ शिवकुमार ज्वेलर्स येथे दाखल झाले. लुटलेल्या सोन्याच्या दागिन्यांची नेमकी किंमत किती आहे, याचा आकडा अद्याप समोर आलेला नाही. पोलिस सध्या दुकानातील आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहे.

## बांगलादेशात श्रीरामाच्या भव्य पुतळ्याचा प्रकल्प रोखला

### धार्मिक स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह

**ढाका, दि. १३ जून -**

श्रीरामाच्या भव्य पुतळ्याच्या निर्मितीचा प्रकल्प बांगलादेशातील अधिकाऱ्यांनी रोखण्याचा आदेश दिला आहे. हा पुतळा गाइबांधा जिल्ह्याच्या उपजिल्ह्यातील श्री श्री राधा गोविंद आणि काली मंदिरात उभारला जात आहे, असे स्थानिक माध्यमांनी वृत्तात म्हटले.

मंदिराचे सल्लागार श्यामलकुमार मंहत यांनी मंदिराच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

बांगलादेशी सरकारने घेतलेल्या या निर्णयाविरोधात तीव्र प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. या प्रकल्पाला विरोध करणाऱ्या मुस्लिम गटांच्या दबावाखाली हा प्रकल्प रोखण्यात आला, असा आरोप बांगलादेश सरकारवर होत आहे. राम मंदिराला होणारा विरोध आणि या मुद्यावर मिळणाऱ्या धमक्यांच्या मुद्यावर बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांनी जोरदार टीका केली आहे. ज्या देशात लाखो मशिदी आहेत आणि निर्मिती केली जात आहे, तिथे केवळ पूजास्थळाला का लक्ष्य केले जात आहे, असा प्रश्न त्यांनी एक्स वरील पोस्टमध्ये उपस्थित केला. जर धार्मिक स्वातंत्र्य खरोखरच सर्वांसाठी असेल, तर ते केवळ बहुसंख्यांनाच नव्हे, तर अल्पसंख्यांकांनाही समान रीतीने लागू झाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### राम मंदिरच्या विरोधातील धमक्या चिंताजनक

पलाशबारी, गाइबांधा येथे निर्माणाधीन राम मंदिराच्या विरोधात येत असलेल्या धमक्या, चिथावणी आणि त्याविरोधातील द्वेष चिंताजनक आहे. केवळ पसंत नाही म्हणून, दुसऱ्या समुदायाच्या प्रार्थनास्थळाची तोडफोड करण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला किंवा गटाला प्राप्त होत नाही. कायद्याचे राज्य असलेल्या देशात धार्मिक मतभेद हिंसाचार किंवा रानटीपणाद्वारे सोडवता येत नाहीत. याचे वर्णन अस्तित्वाचे संकट, असे का केले जात आहे, असा सवाल तस्लिमा नसरीन यांनी उपस्थित केला.







CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तवांगमध्ये तोफगोळा केला निकामी

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशातील तवांग जिल्ह्यात, १९६२ च्या भारत-चीन युद्धातील असल्याचे मानला जाणारा एक जीवंत तोफ गोळा भारतीय लष्कराने यशस्वीरित्या निकामी केला. तवांग शहरातील लेब्रंग भागात गुरुवारी दुपारी हा न फुटलेला तोफ गोळा सापडला, असे तवांगचे पोलिस अधीक्षक तासी दारंग यांनी सांगितले. या जीवंत तोफगोळ्याची माहिती तवांग पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक ल्हाम थिनले यांच्याकडून मिळाली. लष्कराच्या बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाने हे स्फोटक सुरक्षितपणे मेथांग येथील एका निर्जन भागात नेले आणि तिथे ते निकामी केले. अरुणाचल प्रदेशातील विविध सीमावर्ती भागांत १९६२ च्या काळातील न फुटलेले तोफ गोळे अनेकदा सापडतात. असे दारंग यांनी नमूद केले. अशी दारूगोळा सामग्री अत्यंत स्फोटक असते आणि त्यामुळे नुकसान होऊ शकते.

### युट्युबर मसूद चंडीची घरात घुसून हत्या

**हैदराबाद :** हैदराबादमधील गोवळकोंडा परिसरात युट्युबर आणि फिटनेस कंटेंट क्रिएटर मसूद चंडी, ज्याला शेख मेहबूब म्हणूनही ओळखले जाते, याची राहत्या घरी हत्या करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, काही हल्लेखोर अचानक घरात शिरले आणि लोखंडी सळया तसेच धारदार शस्त्रांनी त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने मसूद चंडी याचा जागीच मृत्यू झाला. हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले. पोलिस तपासात ही घटना कौटुंबिक वादातून घडल्याचे समोर येत आहे. मुख्य आरोपी म्हणून शेख सोहेल याचे नाव पुढे आले आहे. तो मृताच्या पत्नीचा भाऊ असल्याचे सांगितले जाते.

### अभिषेक मुलासारखा, बॅनर्जींची कोलांटउडी


**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कल्याण बॅनर्जी अलिकडेच अभिषेक बॅनर्जींवर चांगलेच भडकले होते. त्यांनी अभिषेक अहंकारी असून त्याच्यामुळेच पक्ष संपत आहे, असा आरोप करत ममता बॅनर्जींना एक तर अभिषेक किंवा मी या दोघांपैकी एकाची निवड करा, असा अल्टिमेटम दिला होता.यानंतर अभिषेकने ते ज्येष्ठ आहेत, त्यांना मला बोलण्याचा अधिकार आहे, असे सांगत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.अभिषेक मला मुलासारखा आहे. मी त्याच्या सर्व चूका माफ केल्या, असे बॅनर्जी म्हणाले. कल्याण बॅनर्जी पुढे म्हणाले, देशातील लोकशाही धोक्यात आहे. पश्चिम बंगालने अशी परिस्थिती कधीही पाहिली नाही जिथे विरोधी पक्ष पूर्णपणे नामशेष झाला आहे. विद्यमान मुख्यमंत्री सूडभावनेने प्रेरित आहेत. हा लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका आहे, असे सांगत भाजपावर निशाणाा साधला.

# आज ‘मातोश्री’वर किती खासदार येणार?

## शिवसेना(उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी बोलावली बैठक

**मुंबई, १३ जून**

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर दर दोन महिन्याला ‘ऑपरेशन टायगर’च्या चर्चा रंगत असतात. आताही जवळपास सात खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याच्या चर्चा पुन्हा रंगल्या आहेत. या पृष्ठभूमीवर उबाठा गटाची महत्त्वाची बैठक उद्या मातोश्रीवर होणार आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे बैठकीला उपस्थित राहणार असून नेमके किती खासदार बैठकीला उपस्थित राहतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर असताना उबाठा गटाचे काही खासदार त्यांना भेटल्याच्या बातम्या गेल्या दोन वर्षांत अनेकदा आल्या आहेत. तसेच ठाण्यात जाऊनही काही खासदारांनी गुप्त भेट घेतल्याच्या चर्चाही रंगत असतात. आता हा मुद्दा पुन्हा उपस्थित झाला आहे. परभणीचे खासदार बंडू जाधव मातोश्रीवर झालेल्या एका बैठकीला अनुपस्थित राहिल्याने आणि त्यांची काही विधाने संभ्रम निर्माण करणारी असल्याने ते उबाठा सोडणार असल्याच्या चर्चा परभणीत रंगल्या. तसेच आता धाराशीवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याबाबतीतही वावड्या उठल्या आहेत. अंबादास दानवे हे धाराशिवच्या दौऱ्यावर असताना झालेल्या आढावा बैठकीला निंबाळकर अनुपस्थित होते. आमदार कैलास पाटील आणि आमदार प्रवीण स्वामी उपस्थित होते. हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनीही एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याची चर्चा आहे. मात्र, आपण उद्धव ठाकरेंसोबत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी एकदाचे काय ते स्पष्ट व्हायला हवे, असे भुवया उंचावणारे वक्तव्य केले आहे. काही खासदार एकनाथ शिंदेंना भेटले असल्याचे बोलले जात असून काही जण याविषयी उघडपणे बोलत असल्याचे आम्हालाही माहित आहे, असे दानवे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### कारवाई टाळण्यासाठी हवेत सहा खासदार

उबाठाचे लोकसभेत एकूण नऊ खासदार निवडून आले आहेत. पक्षांतरबंदी कायद्यानुसार होणारी अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी कमीत कमी नऊ खासदारांनी वेगळा गट स्थापन करण्याची गरज आहे. किंवा हे सहा खासदार शिंदे गटातही थेट प्रवेश करू शकतात. मात्र, शिंदे गटाने सात खासदारांना गळाला लावल्याची चर्चा आहे. उद्याच्या बैठकीला किती जण उपस्थित राहतात यावरून पुढचे गणित ठरणार आहे.

### उबाठाचे नऊ खासदार

अरविंद सावंत-दक्षिण मुंबई, संजय दीना पाटील-ईशान्य मुंबई, संजय जाधव-परभणी, ओमराजे निंबाळकर-धाराशिव, भाऊसाहेब वाकचौरे-शिर्डी, राजाभाऊ वाजे-नाशिक, संजय देशमुख-यवतमाळ-वाशिम, नागेश पाटील आष्टीकर-हिंगोली, अनिल देसाई-दक्षिण मध्य मुंबई.

### तिवळी येथे कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**मालेगाव, १३ जून**

मालेगाव तालुक्यातील तिवळी येथे शनिवारी दुपारी घडलेल्या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. संतोष तुकाराम बकाल यांनी शेतकरी दगडूजी बोरकर यांच्या शेतातील विद्युत टॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यानंतर त्याची पत्नी व दोन लहान मुलांचे मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आल्याने गाव शोकसागरात बुडाले. संतोष यांनी शनिवारी दुपारी विद्युत टॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांची पत्नी इंद्रायणी, ८ वर्षीय मुलगी जान्हवी आणि पाच वर्षीय मुलगा सोहम यांचे मृतदेह त्यांच्या शेतातील विहिरीत आढळून आले.

घटनेची माहिती मिळताच मालेगावचे पोलिस उपनिरीक्षक धनराज तायडे आपल्या सहकार्यांसह घटनास्थळी दाखल झाले. गावकर्यांच्या मदतीने विहिरीतील मृतदेह बाहेर काढण्यात आले तसेच विद्युत टॉवरवरून संतोषचा मृतदेह खाली उतरवून पंचनामा करण्यात आला. यानंतर सर्व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. (वृत्तसंस्था)

### बुवाबाजीच्या घटनांमध्ये सतर्क रहा : अंनिस

**सोलापूर, दि. १३ जून-**

राज्यात सध्या बुवाबाजीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले आहे. करणी, जादूटोणा किंवा तत्सम अंधश्रद्धेच्या नावाखाली कोणी आर्थिक फसवणूक करत असल्यास नागरिकांनी तातडीने समितीचे शहर शाखा कार्याध्यक्ष आर. डी. गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शाखा सचिव सुजित हावळे यांनी केले आहे.

## दोन दिवसांत तीन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी



चाचणीदरम्यान प्रक्षेपित करण्यात आलेले क्षेपणास्त्र

### ‘डीआरडीओ’ची ऐतिहासिक कामगिरी

**नवी दिल्ली, १३ जून**

दीर्घ पल्ला असलेल्या तीन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची सलग चाचणी घेऊन भारताने शुक्रवारी निवडक देशांच्या यादीत स्थान मिळवले आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) १० आणि ११ जून रोजी या चाचण्या घेतल्या. ही कामगिरी भारताच्या संरक्षण क्षमतेतील एक मोठी कामगिरी दर्शवते.

केवळ चाचणी उड्डाणेच नव्हे, तर मध्यम पल्ल्याच्या जहाजविरोधी संरक्षण प्रणालीची पहिली यशस्वी चाचणी घेण्यात आली. या दोन्ही यशांबद्दल संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी डीआरडीओचे अभिनंदन केले आहे. डीआरडीओने चाचणी केलेल्या दोन्ही इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांमध्ये दोन हजार ते पाच हजार किमी पल्ला असलेल्या मध्यम पल्ल्याचे आंतरखंडीय क्षेपणास्त्र म्हणून वर्गीकृत केल्या जाणाऱ्या शत्रूच्या क्षेपणास्त्रांना नष्ट करण्याची क्षमता आहे. सरकारने या क्षेपणास्त्रांबाबत माहिती दिलेली नाही. मात्र, ही इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे बाह्य वातावरणीय आणि अंतः वातावरणीय दोन्ही प्रकारची असून, उड्डाण चाचण्या यशस्वी झाल्यामुळे ती लवकरच इतर चाचण्यांसाठी रवाना केली जातील, असे सरकारी सूत्रांनी सांगितले. मागील काही महिन्यांपासून भारताने बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. मागील वर्षी डीआरडीओने अग्नी-५ या आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या सुधारित आवृत्तीवर काम सुरू केले होते. (वृत्तसंस्था)

# विकासात्मक कार्यातून नवभारताचा पाया

## ● नितीन गडकरी यांचे प्रतिपादन ● पत्रपरिषदेतून मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कामगिरीचा आढावा

**नागपूर, १३ जून**

स्वातंत्र्यानंतर २०१२ पर्यंत झाला नाही तेवढा विकास केंद्रातील मोदी सरकारने गेल्या १२ वर्षांत करून दाखवित गरिबांच्या कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून नवभारताच्या नर्मितीचा भक्कम पाया रचला आहे. देशाच्या पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास, महिला सक्षमीकरण, संरक्षण क्षेत्रातील आत्मनर्भिरता आणि सुशासनाच्या माध्यमातून विकसित भारताच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कामगिरीची माहिती देताना गडकरी यांनी नागपूरमध्ये झालेल्या, सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विकासकामांचाही आढावा घेतला. गडकरी म्हणाले, सरकारने योजनांच्या केवळ घोषणा न करता त्यांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला. गरीब कल्याणाच्या विविध योजनांमुळे देशातील कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमानात बदल घडून आला आहे. चार कोटींहून अधिक गरिबांना पक्की घरे देण्यात आली असून ११ कोटी महिलांना उज्ज्वला योजनेअंतर्गत मोफत गॅस जोडणी देण्यात आली. जल जीवन मिशनच्या माध्यमातून १६ कोटी नागरिकांना स्वच्छ पण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले.



**राष्ट्रीय महामार्गांनी भारताला जोडले**

देशाच्या पायाभूत सुविधांच्या विकासात गेल्या दशकात मोठी झेप घेतल्याचे सांगताना गडकरी म्हणाले, २०१४ मध्ये देशात ९१ हजार २८७ किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग होते. आज ही लांबी वाढून १.४६ लाख किलोमीटरपेक्षा अधिक झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग बांधकामाचा वेगही ११.६७ किलोमीटर प्रतिदिनवरून ३४ किलोमीटर प्रतिदिनपेक्षा अधिक झाला आहे. २०१४ मध्ये केवळ पाच शहरांमध्ये २४८ किलोमीटरचे मेट्रो जाळे होते, तर आज २६ हून अधिक शहरांमध्ये १ हजार १०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे मेट्रो नेटवर्क कार्यरत आहे. (तभा वृत्तसेवा)

# बंडखोर खासदारांची आज बैठक

### स्वतंत्र गटाला मान्यता देण्याची करणार विनंती

**नवी दिल्ली, १३ जून**

तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर खासदारांची उद्या रविवारी दिल्लीत बैठक होणार आहे. विशेष म्हणजे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. या बैठकीनंतर तृणमूल काँग्रेसचे बंडखोर खासदार सोमवार १५ जूनला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेणार आहे. हे खासदार बिर्ला यांची भेट घेत तृणमूल काँग्रेसच्या वेगळ्या गटाला मान्यता देण्याची आणि लोकसभेत बसण्याची वेगळी व्यवस्था करण्याची मागणी करणार असल्याचे समजते. यामुळे तृणमूल काँग्रेस सांसदीय पक्षात फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे २८ खासदार आहेत. पक्षातून फूटून बाहेर पडत वेगळा गट स्थापन करण्यासाठी दोनतृतियांश सदस्यांची आवश्यकता असते. तृणमूल काँग्रेसचे २० खासदार ममता बॅनर्जी यांच्या विरोधात गेले आहेत. यात काकोली घोष दस्तीदार, शताब्दी रॉय, बापी हलदर, शर्मिला सरकार, निखिलकुमार महतो, अरुप चक्रवर्ती, कालिपडा सारेन, जगदीशचंद्र बसुनिया, खलिलरू रहमान, युसुफ पठाण, मिताली बाग, माला रॉय, पार्थ भौमिक, अबू ताहिर खान या खासदारांचा समावेश आहे. नंतर सयानी घोष आणि कल्याण बॅनर्जी असे आणखी दोन खासदार आले, त्यामुळे बंडखोर खासदारांची संख्या २० झाली आहे. ही संख्या एकूण सदस्यसंख्येच्या दोनतृतियांशपेक्षा जास्त असल्यामुळे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला त्यांना वेगळा गट म्हणून मान्यता देऊ शकतात, तसेच त्यांची बसण्याची वेगळी व्यवस्थाही करु करतात. तृणमूल काँग्रेस विधिमंडळ पक्षातही फूट पडली आहे. पक्षाच्या ८० पैकी ५८ आमदारांनी विधानसभेच्या सभापतींना पत्र देत आपल्याला वेगळा गट म्हणून मान्यता देण्याची मागणी केली होती. (तभा वृत्तसेवा)



### राज्यसभेच्या चार खासदारांचाही राजीनामा

लोकसभेतील खासदारांनी वेगळा गट बनवला असतांना तृणमूल काँग्रेसच्या राज्यसभेतील ४ खासदारांनी आतापर्यंत राजीनामे दिले आहेत. यात सुखेंदू शेखर रॉय, सुष्मिता देव, प्रकाश चिक आणि कोयल मलिक यांचा समावेश आहे. तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेत १३ खासदार होते, यापैकी चार खासदारांनी राजीनामे दिल्यामुळे आता ९ खासदार उरले आहेत.

### मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात शिरली कार

**पणजी :** उत्तर गोव्यात मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या ताफ्यात एका पोलिस कॉन्स्टेबलसह पाच जणांना घेऊन जाणारी कार शिरल्याप्रकरणी पोलिसांनी त्यांना अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. ही घटना गुरुवारी रात्री मुख्यमंत्री सांखळीहून पणजीकडे प्रवास करताना अमोना येथे घडली. मुख्यमंत्र्यांसोबत असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत ती गाडी रस्त्याच्या कडेला वळवली. ज्यामुळे संभाव्य अपघात टळला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्राथमिक चौकशीत हे लोक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे आढळून आले.गाडीचा चालक, जो फोंडा उपविभागात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होता, तो घटनास्थळावरून पळून गेला होता, मात्र त्याला शुक्रवारी अटक करण्यात आली. हे पाचही जण सध्या पोलीस कोठडीत असून पुढील तपास सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

# टीटीपीच्या चार प्रमुख कमांडरसह २१ दहशतवादी ठार

## खैबर पख्तुनख्वामध्ये पाकिस्तानी लष्कराची कारवाई

**पेशावर, १३ जून**

पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वामध्ये लष्कराच्या कारवाईत तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तानचे (टीटीपी) २१ दहशतवादी ठार झाले. यात चार प्रमुख कमांडरचा समावेश आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे उत्तर वझिरिस्तान जिल्ह्यात शोधमोहीम सुरू करण्यात आली. यावेळी जंगलात लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी गोळीबार केला. सुरक्षा दलाने जोरदार प्रत्युत्तर देत २१ दहशतनवाद्यांना ठार केले. गेल्या ७२ तासांपासून ही चकमक सुरू होती. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये चार प्रमुख कमांडरांचा समावेश आहे. ठार झालेले कमांडर सुरक्षा दलांवरील हल्ले आणि नागरिकांच्या हत्येत सहभागी असल्याची माहिती पाकिस्तानी लष्कराने निवेदनातून दिली. गेल्या आठवड्यात याच भागात मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची संख्या एकूण ४८ झाली आहे.



दहशतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त केला आहे. परिसरात लपून बसलेल्या उर्वरित दहशतवाद्यांना पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू आहे. यापूर्वी, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लष्कराने दत्ता खेल परिसरात ११ दहशतवाद्यांना ठार केले होते. त्यानंतर, जूनच्या पहिल्या आठवड्यात मिरानशाहमध्ये एक आत्मघाती हल्ला हाणून पाडण्यात आला. (वृत्तसंस्था)

### जगाला मार्गदर्शन करण्यासाठी भारताने सज्ज राहावे : सरसंघचालक

(शेष पान १ वरून)

सध्याच्या विकास प्रारूपांना वाढत्या प्रमाणात मर्यादा येत आहेत, असे निरीक्षण त्यांनी समकालीन जागतिक आव्हानांचा उल्लेख करताना नोंदवले. भारतीय विचारसरणी एक संतुलित मार्ग प्रदान करते; हा मार्ग विकासाचा निसर्गाशी मेळ घालतो आणि शाश्वतता व जबाबदारीवर आधारित एक पर्याय उपलब्ध करून देतो, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले. या सभ्यताविषयक दृष्टिकोनांची देवाणघेवाण करून जगाला मार्गदर्शन करण्यासाठी भारताने स्वतःला सज्ज केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

अति-भौतिकवादी आणि अनिर्बंध लोभ यासारख्या आधुनिक आव्हानांवर भारतीय विचारसरणीत रुजलेल्या मूल्यांमध्येच उपाय दडलेले आहेत. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी राष्ट्र आणि मानवता या दोघांच्याही कल्याणासाठी समर्पित अशा संघटित आणि जागृत समाजाची गरज डॉ. भागवत यांनी व्यक्त केली.

आधुनिक विज्ञानाची प्रगती होत असली, तरीही ‘योगवसिष्ठ’ आणि ‘पतंजली योगसूत्रे’ यासारखे प्राचीन ग्रंथ चेतना, मानवी मन आणि अस्तित्वाचे प्रारूप याबाबत सखोल अंतःदृष्टी प्रदान करतात, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी भारतीय ज्ञानपरंपरांच्या समर्पकतेवर भाष्य करताना नमूद केले. या परंपरांचे समकालीन काळातही महत्त्व कायम आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. (वृत्तसंस्था)

### पवारांनी उपोषणाला बसणे मर्सिडीजला नांगर जुंपण्यासारखे

#### लक्ष्मण हाकेंची रोहित पवारांवर टीका

**पंढरपूर, १३ जून**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा शिनवारी दुसरा दिवस असतानाच, ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी रोहित पवारांवर टीका केली आहे.



पवार कुटुंबातील व्यक्तीने शेतकऱ्यांच्या आंदोलनाला बसणे म्हणजे मर्सिडीज कारला नांगर जुंपण्यासारखे आहे, असा टोला हाके यांनी लगावला आहे. रोहित पवारांच्या आंदोलनात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. रोहित पवार यांनी चांगले आठवडाभर आंदोलन करावे. पवारांची कुठलीतरी एक पिढी आंदोलनाला बसत आहे, यामुळे पोलिसांनी त्यांना चांगले प्रोटेक्शन द्यावे, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली. पवारांच्या कुटुंबातील व्यक्तीने शेतकऱ्यांच्या आंदोलनाला बसणे हे शेतकऱ्यांना न पटणारी गोष्ट आहे. ज्या पवारांनी महाराष्ट्रातली शेती उद्ध्वस्त केली, शेतकरी उद्ध्वस्त केला, ज्या पवारांनी सहकार उद्ध्वस्त केला आणि खाजगीकरण आणले, ज्या पवारांनी इथल्या शैक्षणिक संस्था स्वतःच्या नावावर करून घेतल्या. (वृत्तसंस्था)

# महिला शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक पाऊल

## येत्या अधिवेशनात ‘महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६’ सादर होणार

**मुंबई, १३ जून**

राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांच्या आयुष्यात परिवर्तन घडवणारे आणि कृषी क्षेत्रात लिंगसमतेचा नवा अध्याय लिहिणारे ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६’ आगामी पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. या विधेयकाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख मिळणार असून त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि सर्वांगीण सक्षमीकरणासाठी व्यापक यंत्रणा उभारली जाणार आहे.



वर्षा निवासस्थानी आयोजित बैठकीत मुख्यमंत्री यांनी विधेयकाच्या प्रारूपाचा आढावा घेतला. यावेळी कृषिमंत्री दत्ता भरणे आणि कृषी राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल उपस्थित होते. राज्यातील कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग ८१ टक्क्यांहून अधिक असतानाही अनेक शासकीय योजना आणि लाभांपासून त्या वंचित राहतात. जमिनीच्या मालकीची अट, कुटुंबाच्या नावावर असलेली शेती आणि पूरक कृषी व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या महिलांना शेतकरी म्हणून मान्यता नसल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पृष्ठभूमीवर तयार करण्यात आलेल्या विधेयकाद्वारे महिलांना कृषी क्षेत्रातील वैधानिक दर्जा, आर्थिक सुरक्षा आणि योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याचे उद्दिष्ट आहे. हे विधेयक राज्यातील लाखो महिला शेतकर्यांना स्वतंत्र ओळख, हक्क आणि संधी देणारे ठरेल. तसेच कृषी क्षेत्रात महिला-पुरुष समानतेच्या दिशेने महाराष्ट्र देशासमोर एक नवा आदर्श निर्माण करेल. असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### कोणत्या महिलांचा होणार समावेश?

या कायद्यात केवळ पारंपरिक शेती करणार्या महिलाच नव्हे तरपशुपालन व दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती व फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन यासह भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणाऱ्या महिला आणि स्थलांतरित कृषी कामगार महिलांनाही या कायद्याच्या कक्षेत आणण्याचा विचार आहे.

### महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस

महिलांना कर्ज, अनुदान, बियाणे, खते, पीक विमा, बाजारपेठ, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा यासाठी स्वतंत्र डिजिटल डेटाबेस आणि प्रभावी डिजिटल यंत्रणा उभारली जाणार आहे. आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वतंत्र ‘महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी’ स्थापन करण्याचाही प्रस्ताव आहे. जिल्हा, तालुका आणि गाव पातळीपर्यंत मजबूत यंत्रणा उभारून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारतीय नद्यांचे पाणी विसरा

## पाकिस्तानाला इशारा, आगळिक करणाऱ्यांना जशास तसे प्रत्युत्तर





**हैदराबाद, १३ जून**

दहशतवाद्यांना पोसणाऱ्या आणि मानवतेच्या शत्रूला सिंधू नदीचे पाणी आम्ही कोणत्याही परिस्थितीत पोहोचू देणार नाही. रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. त्यांनी कितीही प्रयत्न केले, तरीही भारतीय हद्दीतून सीमापार जाणाऱ्या नद्यांचा प्रवाह रोखला जाईल. भारतीय नद्यांचे पाणी मिळण्याची आशा त्यांनी सोडून द्यावी, अशा कडक शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला सुनावले.

तेलंगणा भाजपाच्या वतीने हैदराबाद येथे शनिवारी आयोजित एका कार्यक्रमात बोलताना राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानसह देशातील विरोधकांवरही जोरदार निशाणा साधला. भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करताना ते म्हणाले, जे लोक शांतता आणि सलोख्याची भाषा समजत नाहीत, त्यांना त्यांच्याच भाषेत कसे उत्तर द्यायचे, हे भारताला चांगलेच ठाऊक आहे. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आम्ही संपूर्ण जगाला दाखवून दिले. भारतावर पुन्हा दहशतवादी हल्ले झाले, तर पाकिस्तानचा अन्न आणि पाण्याचा पुरवठा रोखला जाईल, हे आमच्या सरकारने आधीच स्पष्ट केले. सिंधू नदीच्या पाण्याचा एकही थेंब सीमापार जाणार नाही याची काळजी आम्ही घेतली आहे. जोपर्यंत पाकिस्तान सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे पूर्णपणे आणि कायमचे बंद करत नाही, तोपर्यंत सिंधू जलकरार स्थगितच राहील. त्यांनी कितीही प्रयत्न केले, तरी भारताचा निर्णय बदलणार नाही. आगळिक करणाऱ्यास जशास तसे प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सेना सज्ज आहे.

**लाखो एकर शेतीला फटका**

पाकिस्तानी वृत्तपत्र 'डॉन'नुसार, सिंधू नदीवरील महत्त्वाच्या सिंचन संरचनांपैकी एक असलेल्या सक्कर बॅरेजच्या परिसरात पाणी संकट अधिक भयंकर आहे. हा बॅरेज सिंध आणि बलुचिस्तानच्या काही भागांतील लाखो एकर शेतजमिनीला पाणी पुरवतो, ज्यामुळे तो पाकिस्तानच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. (वृत्तसंस्था)


### आमच्याकडे लस आणि ब्रह्मोस क्षेपणास्त्रही

आजचा भारत हा जगासाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून पुढे आला असून संकटाच्या काळात नेहमीच इतर देशांच्या मदतीला धावून जातो. कोरोनाच्या काळात भारताने अनेक देशांना केलेल्या मदतीचा उल्लेख करत ते म्हणाले की, आज जगामध्ये भारताची प्रतिमा जगाचा मित्र अशी आहे. भारताच्या शत्रूंनी हे अजिबात विसरू नये की, संकटकाळात जगाला वाचवण्यासाठी भारताकडे जशी लस आहे, तशीच शत्रूचा थरकाप उडवण्यासाठी ब्रह्मोस क्षेपणास्त्रही सज्ज आहे. ■

### सिंध प्रांतात पाणीबाणी, दुष्काळाचे संकट गडद

भारताने सिंधू जल करार स्थगित केल्यामुळे पाकिस्तानातील सिंध आणि बलुचिस्तान प्रातांत तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती असून, शेतीला पाणी उपलब्ध नसल्याने दुष्काळाचे संकट अधिक गडद झाले आहे. पाकिस्तानला सर्वाधिक महसूल देणाऱ्या सिंध प्रांतात पाणीटंचाईने सातत्याने आंदोलने सुरू आहे. सिंध आणि बलुचिस्तानमध्ये पाणीटंचाईने एक तृतीयांश लोकसंख्येवर परिणाम झाल्याची माहिती पाकिस्तानच्या जलमंत्र्यांने दिली. ■

# तीन खलाशांच्या मृत्यूवर अमेरिकेकडे तीव्र नाराजी



**वॉशिंग्टन, १३ जून**

एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यासोबत चर्चा करीत आखातात अमेरिकी नौदलाच्या हल्ल्यात ठार झालेल्या भारतीय खलाशांच्या मुद्यावर तीव्र नाराजी व्यक्त करीत कठोर निषेध नोंदवला आहे.

व्यापारी जहाजांवर अशा प्राणघातक कारवाया समर्थनीय नाहीत, असे जयशंकर यांनी यांच्याशी झालेल्या चर्चेबाबत 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. या आठवड्यात ओमानच्या किनाऱ्यावर भारतीय कर्मचारी असलेल्या तीन जहाजांवर हल्ले झाले. यापैकी एका हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यासोबत सायंकाळी चर्चा केली. आखाती भागात अमेरिकी नौदलाने केलेल्या हल्ल्यांमध्ये तीन भारतीय खलाशी ठार झाले, त्याबद्दल भारताचा तीव्र निषेध व्यक्त केला, असे जयशंकर म्हणाले. या प्रकरणावर निषेध नोंदवण्यासाठी भारताने नवी दिल्लीतील अमेरिकी दूतावासाच्या 'चार्ज द अफेअर्स'ला हजर राहण्याचा आदेश दिला होता.

होर्मुझ सामुद्रीधुनीतून बाहेर पडणाऱ्या भारतीय जहाजांवर हल्ला करणारे इराणी ड्रोन पाडण्यात आले, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला तसेच हा प्रकार पूर्णतः अस्वीकारार्ह असल्याचे म्हटले होते. एक दिवसापूर्वी होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून जाणाऱ्या भारतीय जहाजांवर इराणनी ड्रोन हल्ला केला. हा प्रकार अस्वीकारार्ह आहे. या देशाने वेळीच आपली वागणूक सुधारावी, असे ट्रम्प यांनी 'ट्रूथ सोशल'वरील एका पोस्टमध्ये म्हटले होते. (वृत्तसंस्था)

# घुसखोरी करण्याचा प्रयत्न, पाकिस्तानी तरुणाला अटक



**कुपवाडा, १३ जून**

जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण रेषेजवळ घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत असताना एका पाकिस्तानी तरुणाला अटक करण्यात आली. सुरक्षा दलांनी शनिवारी कुपवाडा जिल्ह्यातील सिमरी गावाजवळ ही कारवाई केली. असद खान रा. मुझफ्फराबाद, असे आरोपीचे नाव आहे.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे एका पाकिस्तानी नागरिकाने संशयास्पद परिस्थितीत नियंत्रण रेषा ओलांडली होती.

चिनार वॉरियर्स आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या सतर्क संयुक्त पथकाने तत्परतेने कारवाई करत त्या व्यक्तीला अडवले आणि संभाव्य सुरक्षा उल्लंघन टाळले. चिनार कॉर्प्सने एक्सवर पोस्ट केले की, तत्परतेने कारवाई करत, चिनार वॉरियर्स आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी एका पाकिस्तानी नागरिकाला अटक केली आहे. अटक केलेल्या घुसखोराची सध्या चौकशी सुरू आहे. तो तरुण नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत का घुसला, यामागे कारण काय आणि त्याचा उद्देश काय होता, हे पोलिस शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. तपास पूर्ण झाल्यावरच सत्यता पुढे येईल. विशेष म्हणजे, या घटनेपूर्वीही सीमावर्ती रहिवाशांच्या सतर्कतेमुळे सुरक्षा दलांनी अनेकदा घुसखोरांना पकडले आहे. या तरुणाचा सीमेपलीकडे कार्यरत असलेल्या कोणत्याही संशयास्पद नेटवर्कशी काही संबंध आहे का, याचाही सुरक्षा यंत्रणा तपास करत आहेत. (वृत्तसंस्था)



उत्तराखंडमधील देहरादून येथील लष्करी अकादमीतून नियमित आणि तांत्रिक पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शनिवारी पासिंग आऊट परेड झाली. दोन्ही तुकडीतील हे जवान आता देशसेवा करण्यासाठी सज्ज झाले आहेत

## चित्रपट वार्ता

### 'काला हिरन'च्या निमात्यांना न्यायालयाची नोटीस

**मुंबई :** दिल्ली उच्च न्यायालयाने अभिनेता सलमान खानच्या अर्जावर नोटीस बजावली आहे. यात त्यांनी 'काला हिरन' चित्रपटाच्या प्रदर्शनावर आणि प्रचारावर बंदी घालण्याची मागणी केली आहे.



न्यायालयाने निर्माता अमित जानी, जानी फायर फॉक्स फिल्म्स, दिग्दर्शक भारत श्रीनेत, अक्षय पांडे आणि प्रकल्पाशी संबंधित इतर लोकांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांनी सलमान खानच्या अर्जावरही विचार केला. ज्यात चित्रपटाच्या प्रदर्शनावर अंतरिम बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. चित्रपटाचा ट्रेलर शुक्रवारी प्रदर्शित करण्यात आला, तर यापूर्वी तो २० जून रोजी प्रदर्शित केला जाईल, असे संकेत देण्यात आल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. यानंतर न्यायालयाने प्रकरणाची पुढील सुनावणी १९ जून रोजी निश्चित केली. ■

### निवृत्तीनंतर अक्षय होणार माळी



**मुंबई :** मुंबईत झालेल्या 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटाच्या ट्रेलर लाँच सोहळ्यात अभिनेता अक्षय कुमारने आपल्या करिअर, मानधन आणि निवृत्तीबाबत सुरू असलेल्या चर्चांवर स्पष्ट भूमिका मांडली. कधीकधी पहाटेच्या शांत वेळेत कामातून दूर होण्याचा विचार मनात येतो. मात्र, काही क्षणांतच शेकडो लोक त्याच्या कामावर अवलंबून असल्याची जाणीव होते आणि पुन्हा कामाकडे वळतो. मागील अनेक दशके हा विचार मनात येत असला तरी प्रत्यक्षात काम सोडण्याचा निर्णय त्यांनी कधी घेतलेला नाही, असे निवृत्तीच्या विषयावर बोलताना अक्षय कुमार म्हणाला. काम थांबवल्यानंतर काय कराल, या प्रश्नावर त्याने विनोदी अंदाजात इलेक्ट्रीशियन, डॉग वॉकर किंवा माळी बनण्याची शक्यता व्यक्त केली. मात्र, निष्क्रिय राहण्यापेक्षा काम करत राहणेच अधिक योग्य वाटते, असे त्यांनी सांगितले. ■

### आरडी बर्मन यांच्या चरित्रपटाचे काम सुरू

**मुंबई :** नीरज पांडे दिग्दर्शित संगीतकार आर. डी. बर्मन यांच्यावरील चरित्रात्मक चित्रपटात (बायोपिक) त्यांची भूमिका साकारण्यासाठी फरहान अख्तरशी संपर्क साधण्यात आला आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेसाठी फरहानला घेण्याबाबत निर्माते उत्सुक आहेत. नीरज मागील काही काळापासून या बायोपिकवर काम करत असून, पटकथेचे काम वेगाने सुरू आहे. आर. डी. बर्मन यांची भूमिका साकारण्याबाबत फरहानची चर्चा सुरू असून, या दिग्गज संगीतकाराचे जीवन पडद्यावर मांडण्यासाठी तो उत्सुक असल्याचे सांगितले जात आहे. निर्मात्यांनी आर. डी. बर्मन यांच्या अशा अनेक गाण्यांचे हक्क मिळवले आहेत, ज्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील एका विशिष्ट कालखंडाची ओळख निर्माण केली होती. ■




### जहाज हल्ल्यावरून इराण-अमेरिकेत जुंपली

**वॉशिंग्टन, १३ जून**

भारतीय जहाजावर अमेरिकेने नव्हे तर, इराणने क्षेपणास्त्राचा मारा केला. जहाजे आणि खलाशांवर होणारे हल्ले अस्वीकारार्ह असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांचे आरोप इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने फेटाळून लावले आहे. भारतीय जहाजांना अमेरिकेच्या नौदलाने लक्ष्य केल्याचा आरोप त्यांनी केला. या आठवड्यात ओमानच्या किनाऱ्याजवळ भारतीय कर्मचारी असलेल्या तीन जहाजांवर हल्ला झाला. त्यापैकी एका हल्ल्यात बुधवारी तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने भारतीय खलाशी असलेल्या जहाजांवर हल्ला केल्याचे म्हटले होते. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून बाहेर पडणाऱ्या भारतीय जहाजांवर इराणने केलेला ड्रोन हल्ला पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे त्यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# चीनच्या सागरी हद्दीत हेरगिरी जीवांचे जाळे

## कासव, माशांच्या माध्यमातून गोळा केली गुप्त माहिती



**बीजिंग, १३ जून**

काही परदेशी गुप्तचर संस्था कासव आणि माशांचा शस्त्र म्हणून वापर करत आहेत. त्या संस्था नवीन हेरगिरी उपकरणांचा (मासे आणि कासव) वापर करून संवेदनशील सागरी माहिती गोळा करत आहेत, असा दावा चीनने केला आहे. हे आमच्या किनारपट्टीभोवतीचे गुप्त युद्ध आहे, असेही चीनने संबोधले आहे. चीनच्या या दाव्यामुळे समुद्रात आपला प्रभाव वाढवण्याच्या प्रयत्नांमुळे तणाव निर्माण होत आहे, असे दिसून येत आहे.

चीनच्या राज्य सुरक्षा मंत्रालयाने दावा केला आहे की, काही परदेशी हेर आणि गुप्तचर संस्था देशाच्या सागरी क्षेत्रांवर पाळत ठेवण्यासाठी नवीन पद्धती वापरत आहेत. यात सेन्सर लावलेल्या प्राण्यांच्या वापराचा समावेश आहे. यावरुन असे दिसून येते की, चीनच्या सभोवतालच्या समुद्रात एक अदृश्य गुप्त युद्ध सुरू झाले आहे, असा तर्कसुद्बा त्यांनी लावला आहे. चीनच्या मंत्रालयाचे पुढे म्हटले की, परदेशी संस्था पाण्याखालील नकाशे तयार करण्यासाठी सागरी जीवांचा वापर करून संवेदनशील माहिती गोळा करत आहेत. ही बाब आमच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी गंभीर धोका आहे. या हेरगिरीच्या तंत्रांत चिनी पाण्यात तरंगणाऱ्या कासव आणि माशांना सेन्सर्स लावण्यात आले आहे, असा दावाही चीनने केला आहे.

मंत्रालयाने सांगितले की, हे प्राणी सागरी पर्यावरणाशी संबंधित संवेदनशील माहिती, जसे की पाण्याचे तापमान, क्षारता आणि सागरी प्रवाह, रिअल-टाइममध्ये गोळा करत होते. ते ही माहिती उपग्रहाद्वारे परदेशी देशांना पाठवत होते. त्यांनी चीनच्या किनारपट्टीवर जाळे पसरले असून ते सातत्याने संवेदनशील सागरी माहिती गोळा करत आहेत. विशेष म्हणजे, हे प्राणी कोठे सापडले किंवा कोणत्या देशाने त्यांना हेरगिरीसाठी प्रशिक्षित केले, हे चिनी मंत्रालयाने उघड केलेले नाही. (वृत्तसंस्था)

### समुद्रात सापडले तरंगते दिवे

चीनच्या राज्य सुरक्षा मंत्रालयाने असाही दावा केला की, त्यांना परदेशी सागरी संशोधन संस्थांनी तैनात केलेले तरंगते दिवे सापडले आहेत, जे हवामानविषयक सेन्सर पॅकेजने सुसज्ज आहेत. यांचा वापर चिनी पाणबुड्यांच्या ध्वनी संकेतांचा रिअल-टाइममध्ये मागोवा घेण्यासाठी केला जाऊ शकतो. चिनी मंत्रालयाने लाटांच्या हालचाली आणि सौर ऊर्जेवर चालणाऱ्या एका नवीन प्रकारच्या वेव्ह ग्लायडरचाही उल्लेख केला. मंत्रालयाच्या मते, परदेशी शक्तींनी लष्करी-संबंधित सागरी पर्यावरणीय माहिती आणि जहाजांच्या हालचाली प्रसारित करण्यासाठी याचा वापर केला आहे. ■

### २०२४ मध्ये समुद्राच्या तळाशी सापडले दीपगृह

चीन वारंवार आपल्या जवळच्या सागरी क्षेत्रांवर—दक्षिण चीन समुद्र, पूर्व चीन समुद्र आणि तैवान सामुद्रधुनीवर हेरगिरी केल्याचा दावा करतो. ही क्षेत्रे जगातील सर्वात संवेदनशील लष्करी क्षेत्रांपैकी आहेत. २०२४ मध्ये, चीनने म्हटले होते की, त्यांना समुद्राच्या तळाशी लपवलेले दीपगृह सापडले आहेत, जे परदेशी पाणबुड्यांच्या हालचालींचा मागोवा घेण्यास मदत करू शकतात. ■

# २०३० पर्यंत पृथ्वीवरील उष्णता काढणार भाजून

## ओलांडणार १.५ अंश सेल्सिअसची मर्यादा ● महासागर, जैवविविधता, अन्नप्रणाली, मानवी आरोग्यावर परिणाम

**जीनेव्हा, १३ जून**

पृथ्वीचे तापमान सतत वाढत आहे. जर उत्सर्जनाचा सध्याचा दर असाच सुरू राहिला, तर जागतिक तापमान लवकरच १.५अंश सेल्सिअसची मर्यादा ओलांडू शकते, असे अलीकडील वैज्ञानिक अभ्यासांतुन स्पष्ट झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, जीवाश्म इंधनाचा वापर, औद्योगिक प्रदूषण आणि जंगलतोड यांनी हे संकट अधिकच गंभीर केले आहे.




वाढत्या तापमानाचा परिणाम महासागर, शेती, जैवविविधता, अन्नप्रणाली आणि मानवी आरोग्यावर जाणवत आहे. हवामान बदलामुळे, पृथ्वी पूर्वीपेक्षा अधिक वेगाने उष्ण होत आहे. जर हरितगृह वायूंचे उत्सर्जन सध्याच्या गतीने सुरू राहिले, तर २०३० पर्यंत १.५ अंश सेल्सिअसची मर्यादा ओलांडली जाऊ शकते. याचे महासागर, शेती, अन्न, सुरक्षा, जैवविविधता, अर्थव्यवस्था आणि मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होतील. 'अर्थ सिस्टीम सायन्स डेटा'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, २०२५ मध्ये पृथ्वीचे सरासरी तापमान औद्योगिक क्रांतीपूर्व पातळीपेक्षा अंदाजे १.३९ अंश सेल्सिअसने जास्त असण्याचा अंदाज आहे. तज्ज्ञांच्या मते, ही संपूर्ण अतिरिक्त उष्णता मानवामुळे निर्माण झाली आहे. जीवाश्म इंधनाचा व्यापक वापर, उद्योगांमुळे होणारे कार्बन प्रदूषण आणि मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड ही मुख्य कारणे आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, मागील दशकांच्या तुलनेत अलिकडच्या वर्षांत तापमानवाढीचा वेग वाढला आहे. यामुळेच १.५ अंश सेल्सिअसची मर्यादा ओलांडण्याचा धोका आता पूर्वीपेक्षा अधिक खरा वाटत आहे. २०१५ च्या पॅरिस हवामान करारामध्ये, जगभरातील देशांनी जागतिक तापमानवाढ २ अंश सेल्सिअसपेक्षा खूप कमी ठेवण्याचे आणि शक्य असल्यास ती १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की या मर्यादेत राहिल्यास हवामान बदलाचे सर्वात विनाशकारी परिणाम मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात.

वेगाने वाढणारी समुद्राची पातळी किनारी भागांसाठी धोका निर्माण करते. अभ्यासानुसार, १९०१ पासून जागतिक समुद्राची पातळी अंदाजे २३ सेंटीमीटरने वाढली आहे. ही वाढ किनारी भागांसाठी मोठा धोका निर्माण करते. समुद्राचे तापमानही सतत वाढत आहे. समुद्राचे पाणी गरम झाल्यामुळे उष्णतेच्या लाटांमध्ये वेगाने वाढ झाली आहे, ज्याचा प्रवाळ, मासे आणि इतर सागरी जीवांवर गंभीर परिणाम होत आहे. अभ्यासानुसार, १९९१ पासून उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या तिप्पटीहून अधिक वाढली आहे. (वृत्तसंस्था)

### जगासमोरील वाढती आव्हाने

**शास्त्रज्ञांच्या मते, वाढती उष्णता, समुद्राच्या पातळीतील वाढ, तीव्र हवामान घटना आणि परिसंस्थांवरील वाढता ताण जगाच्या जवळजवळ प्रत्येक प्रदेशात जाणवत आहे. तज्ज्ञांच्या मते, परिस्थिती हाताबाहेर जाण्यापासून अजूनही रोखता येऊ शकते, परंतु यासाठी देशांनी हरितगृह वायू उत्सर्जनात जलद आणि व्यापक कपात करणे, हवामान निरीक्षण यंत्रणा मजबूत करणे आणि स्वच्छ ऊर्जेकडे वेगाने संक्रमण करणे आवश्यक आहे.** ■

### बस उलटल्याने २५ जण जखमी

**कटिहार, १३ जून**

बिहारच्या कटिहार जिल्ह्यात शनिवारी पहाटे पश्चिम बंगालकडे जाणारी एक बस कारची धडक टाळण्याच्या प्रयत्नात उलटल्याने २५ जण जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

ही घटना पहाटे ३ च्या सुमारास जोराबगंजजवळील राष्ट्रीय महामार्ग-१३ वर घडली. कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कारची पश्चिम बंगालमधील कूचबिहार जिल्ह्याकडे जाणाऱ्या बसला धडक बसली.

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, धडक टाळण्याच्या प्रयत्नात बस उलटली. जखमी २५ जणांना कोढा प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले. त्यापैकी १० जणांची प्रकृती स्थिर आहे, तर १५ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पूर्णिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात हलवण्यात आले आहे, असे वैद्यकीय अधिकारी विनीत कुमार म्हणाले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

# गोपाळगड : उपेक्षेकडून उद्धाराकडे

**दिनेश गुणे**

परिस्थितीमुळे किंवा कळत, नकळत माणसाकडून कितीही मोठी चूक झाली किंवा कोणावर अन्याय झाला, तरीही पश्चात्ताप किंवा संयमाच्या बळावर ती चूक सुधारणे शक्य असते आणि अन्यायग्रस्तास मुक्ती मिळते, असा संदेश देणाऱ्या अनेक रूपक कथा पुराणात आहेत. आताच्या जमान्यात अशा कथांवर किंवा त्यांमागील रूपकांच्या वास्तवावर विश्वास ठेवला जाईलच असे नाही, पण काही गोष्टींचा पुनर्प्रत्यय येतो, तेव्हा रूपकांचा वास्तविक अनुभवदेखील येतो. समाज कोणासही कायमचे दुर्लक्षित ठेवत नाही, प्रत्येक दुर्लक्षित, उपेक्षिताला न्याय मिळतो आणि परिवर्तनाची वाटदेखील सापडते. मात्र, अशा उपेक्षितांस सहानुभूतीच्या आणि आपुलकीच्या भावनेची आणि स्पर्शाची प्रामाणिक गरज असते, हा काही पुराणकथांनीच समाजास दिलेला संस्कार असतो. रामायणातील अहिल्येची कथा ही भारतीय संस्कृतीतील अत्यंत भावुक, संवेदनशील आणि मानवी स्वभावाचे पैलू उलगडून दाखविणारी अशीच एक रूपक कथा आहे. या कथेत केवळ शाप, उःशाप आणि मोक्ष, मुक्तीचा प्रवास नाही, तर त्यामागेही असाच संदेश संस्कृतीने समाजास दिलेला आहे. अहिल्या नावाची एक गुणी स्त्री एका मोहाच्या क्षणी समाजास मान्य नसलेल्या काही गैरप्रकारात नकळत फसली आणि तिच्या संतप्त पतीने दिलेल्या शापामुळे चेतनाहीन अवस्थेत शिळा होऊन दुर्लक्षित झाली, असा या कथेचा सारांश आहे. अर्थात, ही नकळत घडलेली फसगत तिने प्रामाणिकपणे पतीला पटवून दिल्यानंतर माणुसकी आणि संवेदना जिवंत असलेल्या तिच्या पतीने तिला उद्धाराचा उःशापही दिला आणि विष्णूचा अवतार असलेल्या श्रीरामाचा चरणस्पर्श झाल्यास उद्धार होऊन अहिल्येस पूर्वीचे रूप पुन्हा प्राप्त होईल, असा दिलासाही दिला. काही युगांनंतर वनवासाच्या काळात प्रभू श्रीरामांना एका प्रवासात एका निर्जन, उजाड ठिकाणी दुर्लक्षित स्थितीत पडलेली ही शिळा दिसली आणि उत्सुकतेने या पाषाणाची पूर्वकथा जाणून घेत त्यांनी त्या दुर्लक्षित ठिकाणास स्पर्श केला. काही क्षणांतच, त्या शिळेचा उद्धार होऊन ते उजाड ठिकाण पुन्हा चैतन्याने फुलले. अहिल्या नावाच्या रूपकात्मक नायिकेस पुन्हा संजीवनी प्राप्त झाली. ही कथा म्हणजे केवळ चमत्काराच्या अंधविश्वासास खतपाणी घालणारी पुराणकथा नाही, हे त्यामागील रूपके समजावून घेतल्यास स्पष्ट होते आणि त्यामागील मानवी जीवनासाठी अत्यंत मोलाचा असलेला संदेशही समजून येतो. या कथेतील ही नायिका, जिला सामान्यपणे अहिल्या असे म्हटले जाते, ती मुळात 'अहल्या' आहे. नापीक, उजाड, दुर्लक्षित आणि जिथे कधीही कोणतेच पीक घेतले गेलेले नाही, जी कधीच नांगरली गेली नाही, अशा जमिनीस अहल्या म्हटले जाते. (हल म्हणजे नांगर. ज्या जमिनीस नांगराचा स्पर्श झाला नाही, अशी दुर्लक्षित जमीन म्हणजे अहल्या!) श्रीरामांनी वनवासाच्या काळात अशा उपेक्षित जमिनीवर शेती फुलविली, पिके घेतली, म्हणून त्यांच्या स्पर्शाने उजाड रूपातील त्या अहल्येचा उद्धार झाला, असा या कथेचा संदेश आहे असेही मानले जाते. समाजाने नाकारलेल्या किंवा उपेक्षित असलेल्या कोणत्याही गोष्टींचा पुन्हा तिची प्रतिष्ठा प्राप्त करून द्यायची असेल, तर समाजानेच केलेल्या दुर्लक्षातून सुरू झालेल्या उपेक्षेचे प्रायश्चित्त घ्यावे लागते. अहल्येच्या कथेत, तिचा उद्धार करण्यासाठी प्रभू रामाने पुढाकार घेतला.

आजही, कोणते तरी निमित्त घडावे आणि आपला उद्धार व्हावा या अपेक्षेने अशा अनेक उपेक्षित बाबी दीर्घकाळ प्रतीक्षेत असतात. कदाचित, त्यांची दुर्लक्षित स्थिती हा त्यांच्याकडून किंवा अन्य कोणत्या तरी कारणाने कळत नकळत घडलेल्या चुकीसाठी मिळालेला शाप असेल, तर त्यांनादेखील अहल्येप्रमाणे उःशाप मिळालेला असणार, यावर विश्वास ठेवायला हवा. कारण, अशा घटना आजही आसपास घडतात आणि अनेक वर्षे उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेल्या बाबींच्या उद्धारासाठी मुहूर्त मिळतो. तसे नसते, तर केवळ जमिनीवर पडलेले दोन आंबे पर्यटकांनी उचलल्याचे निमित्त होऊन इतिहासातील एका उपेक्षित वास्तूच्या उद्धारासाठी सरकार सरसावले ही बाब कोणास पटली असती का? अहल्येच्या कथेतील त्या दुर्लक्षित जमिनीचा उद्धार करण्यासाठी प्रभू रामचंद्रांच्या स्पर्शाचे निमित्त घडले, त्या पुराणकथेची पुनरावृत्ती वाटावी अशीच घटना आपल्या अगदी आसपास, महाराष्ट्राच्या कोकणप्रांतात, रत्नगिरी जिल्ह्याच्या गुहागरजवळील अंजनवेल नावाच्या एका गावानजीक घडली आहे आणि अनेक वर्षे उपेक्षित अवस्थेत राहिलेल्या एका ऐतिहासिक वास्तूच्या उद्धाराची प्रक्रिया सुरूदेखील झाली आहे. अंजनवेलजवळच्या गोपाळगड नावाच्या एका ऐतिहासिक गडाची ही कहाणी आहे. तटबंदी, बुरूज आणि इतिहासाच्या खाणाखुणा अंगावर स्पष्ट उमटलेल्या असतानाही, कोणाच्या तरी कागदी मालकीच्या ओझ्याखाली दबून राहिलेला हा गड, उद्धाराच्या प्रतीक्षेत वर्षानुवर्षे दुर्लक्षित अवस्थेत पडून राहिलेला होता. त्या ठिकाणी फिरणाऱ्या पर्यटकांच्या भेटीत घडलेल्या एका कारणामुळे गडाच्या इतिहासावर चढलेली उपेक्षेची आणि दुर्लक्षाची पुटे पुसली गेली आहेत. गडाच्या परिसरातील एका झाडावरून जमिनीवर पडलेले दोन आंबे काही पर्यटकांनी उचलले आणि त्या झाडाच्या मालकीचा मुद्दा समोर आला. इतिहासातील या उपेक्षित वास्तूच्या उद्धाराचे हे निमित्त म्हणावयास हवे. गेल्या महिन्यात मुंबईजवळच्या बदलापूरहून पर्यटनासाठी कोकणात गेलेले काही पर्यटक गोपाळगड पाहावयास गेले असताना गडाच्या परिसरातील झाडावरून पडलेले दोन आंबे त्यांनी उचलले. यावरून गडावर मालकीचा हक्क सांगणाऱ्या एका व्यक्तीने त्यांना हटकले. त्यातून काहीशी वादावादीही झाली आणि गडावर हक्क सांगणाऱ्या त्या व्यक्तीने गडाचा दरवाजा बंद करून त्यांना डांबून ठेवण्याचाही प्रयत्न केला, असे सांगण्यात येते. या प्रसंगांचे कोणीतरी मोबाईलवर चित्रीकरण केले आणि समाजमाध्यमांवर ते प्रसारित होताच, जोरदार खळबळ माजली. उपेक्षित अवस्थेतून गडाचा उद्धार होण्याच्या प्रक्रियेचा बहुधा हा प्रारंभ ठरला. दोन आंब्यांच्या वादातूनन आता गडाच्या मालकीचा, इतिहासाचा आणि भविष्याचा संपूर्ण फैसला होणार आहे. कारण, या गडाची जागा सुमारे ६५ वर्षांपूर्वी सरकारी लिलावाच्या प्रक्रियेतून विकत घेतल्याचा संबंधित मालकी सांगणाऱ्या व्यक्तीचा दावा आहे. इतिहासाच्या खाणाखुणा अंगावर मिरविणाऱ्या परंतु सरकारी कागदपत्रांच्या गुंत्यात अडकल्याने लिलावातून कोणाच्या तरी मालकीचे ओझे मिरवण्याची वेळ आलेला हा गड तेव्हा २२० ते ३०० रुपयांत या कुटुंबाने विकत घेतला आणि गडाच्या मालमत्तेच्या सात-बारावर या कुटुंबाचे नाव लागले. त्यानंतर गडावरील जागेत आमराईची लागवड करण्यात आली. ऐतिहासिक पुराव्यांच्या काही खाणाखुणा बुजविल्या गेल्या, अवजड यंत्रसामग्रीची घरघर गडाच्या शांततेला आव्हान देऊ लागली, प्रवेशद्वारावर खाजगी मालकीचा आणि प्रवेशबंदीचे फलक लागले असा दुर्गप्रेमींचा आरोप आहे.



गोपाळगड किल्ला

केवळ जमिनीचा तुकडा किंवा झाडावरच्या आंब्यांच्या मालकीपुरता हा वाद आता मर्यादित राहिलेला नाही. त्याला आता संवेदनशील स्वरूप प्राप्त झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी जवळचे नाते सांगणारा हा किल्ला सरकार लिलावात विकून टाकते आणि एक कुटुंब त्यावर आपली कागदोपत्री मालकी प्रस्थापित करून इतिहासापासून गडाचे वर्तमान पुसून टाकले जाते, याबाबत शिवप्रेमी आणि इतिहासाच्या अभिमानी गटांमध्ये नाराजी आहे. शिवरायांच्या पराक्रमाचे साक्षीदार असलेले गडकिल्ले खाजगी मालकीचे कसे असू शकतात आणि शिवप्रेमींना प्रवेशास मज्जाव कसा केला जातो, हा प्रश्न तेथील दुर्गप्रेमींना उपस्थित केल्यानंतर आता राज्य सरकारने यामध्ये लक्ष घातले आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी या प्रश्नांची पृष्ठभूमी जाणून घेतली. संबंधितांसमवेत एक बैठक घेतली, सद्यःस्थिती जाणून घेतली आणि वास्तवाचा अहवालही मागविला. हा आढावा पूर्ण झाल्यानंतर आणखी काही दिवसांत या वादाचे अन्य काही कंगोरे उघड होतील आणि या उपेक्षित गडाच्या उद्धारासाठी सरकार कोणती पावले उचलणार हेही स्पष्ट होईल. या प्रश्नाचे राजकारणदेखील होईल, आरोप-प्रत्यारोपही होतील आणि सत्ताधारी-विरोधकांमध्ये कलगीतुराही रंगेल. रत्नागिरीच्या पालकमंत्र्यांनी तसेच भाजपचे विधान परिषदेतील नवनिर्वाचित आमदार प्रमोद जठार यांनी या प्रश्नांत लक्ष घातले आहे. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी आणि पुरातत्त्व विभाग यांच्याशी समन्वय साधून किल्ला सरकारच्या ताब्यात घेण्याची ग्वाहीदेखील त्यांनी दिली आहे. कोणत्या तरी प्रशासकीय त्रुटीमुळे दुर्लक्षाचे कारण ठरलेल्या या उपेक्षित वास्तूच्या उद्धाराची वेळ आता आली असून, त्यास कारणीभूत ठरलेल्या चुकांचे प्रायश्चित्त घेण्याची तयारीही सुरू झाली आहे, म्हणून अहल्या उद्धाराच्या पुराणकालीन रूपक कथेशी गोपाळगडाच्या वर्तमानात वास्तव मिळतेजुळते ठरते.

गोपाळगड हा रत्नागिरी जिल्ह्यातील वशिष्ठी नदीच्या खाडीकाठचा इतिहासकालातील एक महत्त्वपूर्ण जलदुर्ग आहे. १६६० च्या सुमारे छत्रपती शिवाजी महाराजांनी तो आदिलशहाकडून विकत घेतला आणि त्याची डागडुजी करून बळकटीकरण केले. पश्चिम किनारपट्टीवरील मराठा आरमाराच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुढे हा किल्ला तुळाजी आंग्रे यांच्या आरमारी व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनला. १६९९ च्या सुमारास हा गड सिद्दी खैरतखानाने जिंकला, परंतु १७४५ मध्ये तो पुन्हा तुळाजी आंग्रे यांनी जिंकून त्याचा ताबा मिळविला. १८१८ च्या सुमारास इंग्रजांनी मराठ्यांकडून हा किल्ला जिंकला, असे इतिहासाचे काही जाणकार सांगतात. सुमारे सात एकर क्षेत्रावर पसरलेल्या या गडावर भक्कम तटबंदी, १५ बुरूज आणि तोफा ठेवण्यासाठी जांभा दगडाचे चौथरे आहेत, असेही सांगितले जाते. राज्य सरकारने यास संरक्षित वास्तू म्हणून घोषित केले आहे, असेही सांगण्यात येते. तरीही, काही स्थानिक कुटुंबांनी १९६० च्या दशकात किल्ल्याची जागा विकत घेतल्याचा दावा केला असून प्रशासकीय दुर्लक्ष, उपेक्षा किंवा अन्य कोणत्याही कारणाने, गडाची कागदोपत्री मालकी या कुटुंबाकडे गेली, असा आक्षेप घेतला जातो. आता तो खाजगी वहिवाटीतून मुक्त करावा आणि सरकारने त्याची देखभाल, डागडुजी, मालकी हाती घ्यावी अशी मागणी केली जात आहे. या गडाच्या मालकीचा वाद थेट न्यायालयाच्या उंबरठ्यावर पोहोचला. आता शासनाने किल्ला ताब्यात घेण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना संबंधित प्रशासनास दिल्या आहेत. प्रशासकीय बेफिकिरीमुळे साडेसहा दशकांपूर्वी कधीतरी एका कुटुंबांच्या खाजगी मालकीमुळे इतिहास हरवलेल्या या गडाच्या मुक्तीचा सोहळा सुरू झाला आहे. त्यासाठी कदाचित कायदेशीररीत्या भूसंपादन करावे लागेल. मालकीचा दावा करणाऱ्यांना मोबदला द्यावा लागेल. आता त्याबाबतच्या कागदपत्रांची तपासणीही सुरू झाली आहे. हा ऐतिहासिक किल्ला म्हणजे शिवकालीन वैभवाचा पुरावा असल्याची बाब येथे मालकीचा दावा करणाऱ्यांनी नाकारलेली नाही. आंबे उचलल्यामुळे झालेल्या वादावादीबद्दल या कुटुंबाने दिलगिरीही व्यक्त केल्याचे सांगण्यात येते. थोडक्यात, हा किल्ल्याच्या राज्य संरक्षित वास्तू दर्जास मान्यता मिळत आहे. याआधीही या किल्ल्याच्या मालकीवरून वाद उफाळले होते, पण न्यायालयीन निकालानंतर त्याचा राज्य संरक्षित स्मारकांचे दर्जा कायम राहिल्याने तो सर्वसामान्य नागरिक, पर्यटकांसाठी खुला असतानाही तेथे प्रवेशबंदही होती. त्या दोन आंब्यांनी झाडावरून पडून या गडाच्या या व्यथेकडे लक्ष वेधले आणि त्यामुळे झालेल्या वादावादीतून उद्धाराच्या प्रतीक्षेचा प्रवास सुरू झाला. हा वाद कायमचा निकाली काढून एका उपेक्षित इतिहासाचा उद्धार करण्याचे पुण्य पदरी पाडून घेण्याची संधी राज्य सरकारला प्राप्त झाली आहे. १९६० मध्ये सत्तेवर असलेल्या तत्कालीन सरकारच्या अखत्यारीतील प्रशासकीय यंत्रणांनी लिलाव केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आता त्याच्या वर्तमान अवस्थेविषयी अनेक बाबी उजेडात येऊ लागल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर ज्या कुटुंबांनी पाकिस्तानात स्थलांतर करण्याचा पर्याय निवडला, त्या कुटुंबांच्या भारतातील मालमत्तांचा लिलाव करण्याची प्रशासकीय बाब असल्याने अशाच काही प्रकारातून त्याचा लिलाव केला गेला असावा, अशी चर्चा आहे. मात्र, ऐतिहासिक वारसा असलेल्या जागेची मालकी अशा खाजगी कुटुंबाकडे कशी गेली, त्या जागेची दुरवस्था का झाली, त्याबाबत कळत नकळत, प्रशासकीय त्रुटीतून किंवा कदाचित कोणत्याही हितसंबंधातून मालकीचे हक्क अन्य कुटुंबास बहाल करण्याचे कागदोपत्री व्यवहार कसे झाले, असे गोपाळगडाच्या प्रकरणातून उभे राहिलेले अनेक प्रश्न भविष्यातील प्रशासकीय चुका टाळण्याचा धडा ठरणार आहेत. या ठिकाणी असलेल्या अनेक ऐतिहासिक पुराव्यांची दुर्दशा झाली आहे. इतिहासकालीन विहिरी, खंदक बुजविले गेले आहेत, नवे रस्ते तयार केल्याने इतिहासाचे पुरावेही गाडले गेले आहेत असा दुर्गप्रेमींचा आक्षेप आहे. ही जागा आता खाजगी मालकीवरून मुक्त करावी आणि तिचा इतिहास पुन्हा अभिमानाने उजळेल अशी कारवाई सरकारने करावी अशीही दुर्गप्रेमींची मागणी आहे. एका उपेक्षेच्या उद्धारासाठी घडलेले निमित्त आता अंतिम टप्प्यावर पोहोचले आहे. आता केवळ सरकारच्या धाडसी निर्णयाची प्रतीक्षा आहे. लवकरच ती पूर्ण होईल आणि उपेक्षित गोपाळगड मुक्ततेचा श्वास घेईल, अशा विश्वासाचे वातावरण गडावर पसरू लागले आहे. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### इस्त्रायलमध्येही आहेत अस्सल 'मराठी' लोक

सोगावकर, कांदळेकर, पिंगळे, बायगावकर, सातमकर, पालकर, तळेगावकर, आक्षीकर, राजापूरकर, वेलणकर, तळवलकर, ढोकळकर ही सर्व नावे महाराष्ट्रीयन लोकांचीच आहेत, यात कुणालाही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र लेबनॉन, जॉर्डन, सीरिया, इजिप्त, इराण या मुस्लिम राष्ट्रांचे मधोमध वसलेल्या इस्त्रायल या देशातील लोकांची ही नावे आहेत, यावर आपला विश्वास बसणार नाही. इस्त्रायल स्वतंत्र झाल्यानंतर १९५७ ते १९६२ या कालावधीत महाराष्ट्रातील ठाणे, अलिबाग, मुंबई येथून गेलेल्या 'बेने इस्त्रायल' (ज्यू) यांची ही नावे आहेत. इस्त्रायलमधील तेलअविव, किर्यात श्मोना, रामले येथे त्या काळात वरील शहरामध्ये गॅस सिलेंडरऐवजी 'महाराष्ट्रीयन मुली' सोबत घेऊन गेलेली मंडळी आता आपल्या वाळवंटातील मायभूमीत स्वच्छंदपणे जगत असून किमान १० ते ११ शहरातून ही मराठमोळी ज्यू मंडळी सर्रास मराठीचा वापर करीत असतात. किमान २५ मराठी नियतकलिके या शहरातून छापून निघतात. यातील एक प्रमुख संपादक माझे मित्र इफ्राईस नाशान सोगावकर हे आहेत. लेखक मिसाबंदी असेपर्यंत नागपूर कारागृहात संपादकाचा नियमित पत्रव्यवहार होता. हे संपादक सोगावकर आता हयात नाहीत. मात्र त्यांनी चालविलेली मराठी मासिके इस्त्रायल मित्र याद, शोफाल, अंकुर, नवज्योत, मेनोरा यातील चित्रकार आहारोन झिराड हे आज इस्त्रायल देशातील प्रसिद्ध चित्रकार आहेत. एवढेच नव्हे, तर या दोघांनी इस्त्रायलमध्ये 'दूरगून याद' नावाच्या मराठी मंडळाची स्थापनाही केली आहे. त्यांच्या शाखा संपूर्ण इस्त्रायलभर पसरल्या आहेत. १९७५ मध्ये मराठी भाषिक 'ज्यू' लोकांनी मोठ्या प्रमाणात मराठी ग्रंथालये सुरू केली असून या ग्रंथालयाकरिता स्वतः लेखकांनी नामांकित मराठी लेखकांची १२ पुस्तके भेट दिलेली आहेत. महाराष्ट्राचे प्रसिद्ध लेखक मोहनराव गवंडी यांनी प्रत्यक्ष इस्त्रायल येथे जाऊन ग्रंथालयांना भेटी दिलेल्या आहेत. स्वाभिमानाने सांगावेसे वाटते की, आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी इस्त्रायलमधील प्रत्येक घरातून एक ते दोन व्यक्ती सैनिक म्हणून राष्ट्राला मदत करीत असतात. नुकतेच झालेले 'हमास' युद्ध आपण पाहतच आहोत. या देशप्रेमी बेने इस्त्रायल (ज्यू) लोकांना त्रिवार वंदन.

**किशोर वैद्य**/पांढरकवडा, ९३७०९९८७०२

* * *

### ऐच्छिक रक्तदात्यांची गरज

रक्तदान ही ऐच्छिक निरोगी आणि व्यापक मानवतावादी चळवळ आहे, जी देशाच्या सार्वजनिक आरोग्यास अबाधित राखण्यास मदत करते. रक्तदान करणे ही एक केवळ शरीराशी संबंधित क्रिया नसून ऐच्छिक सामाजिक चळवळीचा हिस्सा आहे. रक्तदानाचा संबंध थेट एखाद्याच्या प्राणदानाशी होतो. हवामान बदलांच्या संकटामुळे मानवाला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. रक्ताची गरज मानवी रक्तदानातून भागविली जाते. यात ऐच्छिक रक्तदान करण्याचा मोठा वाटा आहे. १८ ते ६० वयोगटातील सदृढ निरोगी व्यक्ती रक्तदानास पात्र ठरते. देशांतर्गत ज्या रक्तपेढी आहेत त्या सर्व ऐच्छिक रक्तदाता आणि केलेल्या रक्तदात्यांच्या सहकार्यांतून कार्य करतात. त्यातूनच गरजू रुग्णांची रक्ताची गरज भागविली जाते. महाविद्यालयीन तरुण-तरुणी, युवा नागरिक मोठ्या संख्येने ऐच्छिक व स्वयंस्फूर्तीने रक्तदान करतात; ज्यात राजकीय पक्षांच्या नेत्यांचे वाढदिवस, गणेशोत्सव मंडळ, शाळा-महाविद्यालयीन कॅम्पस, स्वयंसेवी संस्था, प्रतिष्ठाने, शिवाय इतर सेवाभावी संस्था नजीकच्या शासकीय अथवा खाजगी नोंदणीकृत रक्तपेढींना आमंत्रित करून सामूहिक रक्तदान शिबिरे आयोजित करतात. रक्तदात्यांच्या मार्फत संकलित झालेले रक्त नियमबद्ध चाकोरीत ठेवण्यासाठी देशात राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद व राज्यात राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियंत्रणाखाली रक्तपेढ्या कार्य करतात. गरजूंना रक्तपुरवठा सुलभतेने उपलब्ध होईल, याची खबरदारी घेऊन महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेने 'ई-रक्तकोश' नावाचे आधुनिक पोर्टल तयार केले आहे. स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांच्या सन्मानार्थ उचललेले ठळक पाऊल म्हणजे, रक्तदात्यांची नोंदणी आभा आयडी कार्ड व आधार कार्डशी जोडले जाणार आहे. त्यामुळे रक्तदात्यांना मोफत उपचार सुविधा भविष्यात लाभ घेता येईल. या सुसूत्रीकरणातून रक्तदात्यांचा सन्मान राखून निरपेक्ष पद्धतीने गरजूंना रक्तपुरवठा होण्यास एक प्रकारची मदतच मिळेल. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद व राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या परिपत्रकानुसार रक्तदान शिबिरांमध्ये रक्तदात्यांना भेटवस्तू देण्यास मज्जाव आहे. रक्तदान विनामोबदला आणि स्वेच्छेने करण्यात येईल तसेच प्रतीकात्मक भेटीशिवाय इतर कोणतीही भेटवस्तू दिली जाणार नाही, असे रक्तपेढींना आयोजकाकडून हमीपत्र घ्यावे लागते. स्वयंस्फूर्तीने रक्तदान करणे हा रक्तदात्यांच्या दातृत्वाचा प्रश्न आहे. कुठल्याही आमिषांना बळी न पडता रक्तदात्यांनी रक्तदानासाठी सामोरे आले पाहिजे व त्याची गरज ओळखून नवीन रक्तदाते निर्माण व्हावेत. करिता सामाजिक जनजागृती होणे गरजेचे ठरते. कुठल्याही आमिषांना बळी पडून रक्तदान करणे म्हणजे दातृत्व वृत्तीला कलंक ठरत असतो. कुठल्याही प्रलोभनाविना आज स्वयंप्रेरणे रक्तदात्यांनी पुढे येणे गरजेचे आहे, तरच रक्तदान शिबिरे ही सामाजिक उपक्रमाचा उदात्त हेतू म्हणून अबाधित राहील. यात लोकसहभागही तेवढाच महत्त्वाचा ठरतो.

**शशिकांत तोटे**/दारव्हा/९१३०८३५४५८

* * *

### वृद्धाश्रम : घरापलीकडील घर

'वृद्धाश्रम' म्हटले की अनेकांच्या मनात एकटेपणा, दुःख आणि उपेक्षेचे चित्र उभे राहते. परंतु आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत वृद्धाश्रम हे केवळ राहण्याचे ठिकाण नसून अनेक ज्येष्ठांसाठी 'घरापलीकडील घर' बनले आहे. येथे त्यांना सुरक्षितता, सहवास, आदर आणि आपुलकी मिळते. वृद्धावस्था ही आयुष्याची संध्याकाळ असते. या काळात माणसाला आर्थिक मदतीपेक्षा भावनिक आधाराची अधिक गरज असते. अनेक वेळा मुलांच्या नोकरी-व्यवसायामुळे किंवा बदलत्या जीवनशैलीमुळे ज्येष्ठ नागरिकांना एकटे राहावे लागते. अशा वेळी वृद्धाश्रम त्यांच्यासाठी आधारवड ठरतो. येथे समान वयोगटातील लोक एकत्र राहतात, सुख-दुःख वाटून घेतात आणि नव्या मैत्रीचे धागे विणतात. वृद्धाश्रमातील वातावरण अनेकदा कुटुंबासारखे असते. नियमित आरोग्य तपासणी, पौष्टिक आहार, मनोरंजनाचे कार्यक्रम, सांस्कृतिक उपक्रम आणि आध्यात्मिक वातावरण यामुळे ज्येष्ठांचे जीवन अधिक आनंदी व अर्थपूर्ण बनते. येथे प्रत्येक व्यक्तीच्या अनुभवांचा आणि ज्ञानाचा सन्मान केला जातो. त्यामुळे त्यांना स्वतःचे अस्तित्व आणि महत्त्व जाणवते. आयुष्याच्या प्रवासात कधी कधी अशी काही ठिकाणे भेटतात, जी रक्ताच्या नात्यांनी जोडलेली नसली, तरी मनाच्या नात्यांनी आपली होऊन जातात. अशा ठिकाणाला आपण 'घरापलीकडलं घर' म्हणू शकतो; जिथे आपल्याला सुरक्षित वाटतं, आपलेपणाची ऊब मिळते, मन मोकळं करता येतं आणि दुःख-सुख वाटून घेता येतं. वृद्धाश्रमात राहणाऱ्या ज्येष्ठांसाठी तो केवळ निवारा नसतो; तो त्यांच्या आयुष्याचा नवा परिवार असतो. तिथे एकमेकांच्या सहवासातून एकाकीपणावर मात केली जाते. दुःख वाटून घेतलं जातं आणि आनंदाचे क्षण एकत्र साजरे केले जातात. घरापलीकडलं घर आपल्याला शिकवतं की नात्यांची वीण केवळ जन्माने नव्हे तर प्रेम, आदर आणि सहवासाने विणली जाते. जिथे मनाला शांतता मिळते, जिथे आपलेपणाची जाणीव होते आणि जिथे माणूस माणसाशी जोडला जातो.

**संजय करगुटकर**/नागपूर/९८९०७५९००५

* * *

### 'मला काही सांगायचंय...'

'मला काही सांगायचंय' हे नाटक नुकतंच पाहण्यात आलं. आजच्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या युगात, जिथे माणसे आभासी जगात व्यस्त आहेत आणि प्रत्यक्ष संवाद हरवत चालला आहे, तिथे हे नाटक अधिकच प्रासंगिक आणि अंतर्मुख करणारे वाटले. एका मोठ्या सामाजिक आणि कौटुंबिक समस्येकडे अंगुलिनिर्देश करणार्या या नाटकाची कथा बाबा, यशोधरा आणि राहुल या पात्रांभोवती आणि त्यांच्या कौटुंबिक चौकटीभोवती फिरते. वरकरणी सुखी दिसणाऱ्या या कुटुंबात अंतर्गत पातळीवर विचारांचे प्रचंड वादळ सुरू असते. प्रकर्षाने जाणवते की, यात केवळ 'जनरेशन गॅप' नाही, तर 'कम्युनिकेशन गॅप' कसा घात करू शकतो, याचे जिवंत चित्रण आहे. जुन्या पिढीचे अनुभवजन्य पूर्वग्रह आणि नव्या पिढीच्या आधुनिक आकांक्षा यांच्यातील संघर्षाला केवळ कौटुंबिक स्वरूप न देता एका थरारक रहस्याची किनार दिली आहे. बाबांच्या भूमिकेतील जरब, त्यांचा अधिकार आणि त्याच वेळी मुलांबद्दल वाटणारी काळजी व अंतर्गत अस्वस्थता मोहन जोशी यांनी अत्यंत संयतपणे साकारली आहे. आजच्या तरुण पिढीची होणारी कुचंबणा, स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याची धडपड आणि वडिलांबद्दल असलेला आदरयुक्त आकसही अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आजच्या काळात आपण व्हॉट्सॲप, फेसबुकवर जगाशी जोडलेले आहोत, पण घरातल्या माणसाशी बोलायला आपल्याकडे वेळ नाही. 'मला काही सांगायचंय' हे नाटक थेट या वास्तवावर प्रहार करते. मनात एक प्रश्न शिल्लक राहतो की, 'मी माझ्या माणसांशी खरंच मनापासून बोलतो का?' ■

**प्रमोद तिजारे**/पुणे/ ९७६५०८४४४९

**विदेशात पर्यटनाला गेलेल्या काही भारतीयांनी आनंद व्यक्त करण्यासाठी विविध ठिकाणी केलेली नृत्ये पाहून काही लोकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठविली. त्या टीकेला प्रत्युत्तर म्हणून अज्ञात व्यक्तीने व्हायरल केलेल्या मुक्तछंदात्मक मूळ इंग्रजी कवितेचा हा स्वैर अनुवाद**

## मी भारतीय आहे

**मी भारतीय आहे...**
आणि प्रत्येक जण म्हणतो- माझ्यात नागरिकत्वाच्या जबाबदारीचा अभाव आहे.
ते रस्त्यांवर जाळपोळ करू शकतात,
चॅम्पियनशिपच्या सामन्यानंतर शहराची नासधूस करू शकतात.
मी माझ्या पहिल्या विदेश दौऱ्याच्या उत्साहात विमानतळावर नाचतो,
आणि अचानक मी नागरिकत्वाच्या जबाबदारीच्या अभावाचं प्रतीक बनतो.
**मी भारतीय आहे,**
आणि सगळे म्हणतात की मी नोकऱ्या चोरतो...
ते कारखाने समुद्रापार हलवतात,
आणि कर चुकवण्यासाठीच्या इथून तिथे नफा हस्तांतरित करतात.
मी शिकतो, स्पर्धेत सहभागी होतो,
व्हिसा मिळवतो,
दिवसाचे १८ तास काम करतो,
कधीकधी एकापेक्षा अधिक नोकऱ्या करतो
आणि तरीही नोकऱ्या चोरणारा आणि व्यवस्थेला फसवणारा मीच!
**मी भारतीय आहे,**
आणि सगळे म्हणतात की मी सगळीकडे आढळते...
मी तुमचं सॉफ्टवेअर बनवतो,
तुमच्या आजारांवर उपचार करतो,
तुमच्या मुलांना शिकवतो,
तुमच्या टॅक्सी चालवतो,
आणि तुमची दुकानं उघडतो...
जग म्हणजे खेडं बनलंय आता...तरीही माझं अस्तित्व हीच समस्या ठरते...
**मी भारतीय आहे,**
आणि सगळे म्हणतात की मी खूप गोंधळ-गोंगाट करतो...
संध्याकाळच्या बातम्या नुसता गोंगाट करतात.
इंटरनेटवर रात्रंदिवस द्वेषाचा कल्लोळ घुमतो.
मी लग्न, सण, विजय साजरा करते,
आणि ते म्हणतात की- माझा आनंद फारच गोंगाट निर्माण करणारा आहे
**मी भारतीय आहे,**
आणि प्रत्येक जण म्हणतो की माझ्या अंगाला भाजीचा-रश्शाचा वास येतो.
जगात बंदुकीच्या दारूचा, द्वेषाचा, विभाजनाचा,
आणि वंश व धर्मावरील अंतहीन वादांचा वास येतो...
....माझ्या आजीच्या स्वयंपाकघरातील मसाल्यांचा सुगंध माझ्या अंगात येतो,
आणि तरीही लोकांना तेच खटकते.
**मी भारतीय आहे,**
आणि प्रत्येक जण म्हणतो की मला संस्कृती नाही.
मी अशा संस्कृतीतून आलोय, जिने तारे मोजले होते,
तेव्हा...जेव्हा बहुतेक जग अजूनही जेमतेम नकाशे शिकत होते...
मी अनेक राष्ट्रांच्या वयापेक्षा जुन्या भाषा बोलते.
मी शेकडो परंपरा साजऱ्या करते,
तरीही मलाच सांगितले जाते की मला संस्कृती नाही!
**मी भारतीय आहे,**
आणि प्रत्येकजण म्हणतो की मी मागासलेला आहे.
मी चंद्रावर मोहिमा पाठवतो...
मी लाखो लोकांसाठी लस बनवतो
मी अनेक खंडांत कंपन्या चालवतो
...तरीही एका मूर्खाचा व्हायरल व्हिडिओ अब्जावधी लोकांविरुद्धचा पुरावा बनतो!
**मी भारतीय आहे,**
मी आवडत्या अभिनेत्याच्या यशाचा आनंद फुलांनी,
संगीताने आणि दुधाच्या काही ग्लासांसह साजरा करतो
विद्वेष विकणाऱ्या किंवा मतभेदांच्या लढाया उभ्या करणाऱ्यांच्या पूजा होतात,
तरीही, माझाच उत्सव हेडलाईन बनतो...
**मी भारतीय आहे,**
आणि सगळे म्हणतात की आम्ही गर्दी जमवितो...
आम्ही मिरवणुकीत एकत्र चालतो,
आमची श्रद्धा, आमची संस्कृती, आमच्या परंपरा साजऱ्या करतो...
आमच्याकडे सर्वांचे स्वागत असते
कोणतीही दुकाने लुटली जात नाहीत
कोणतीही वस्ती जाळली जात नाही
वेगळा विचार केल्याबद्दल कोणालाही धमकावले जात नाही.
आम्ही गातो.
आम्ही नाचतो.
आम्ही प्रार्थना करतो.
आणि तरीही, आमचे एकत्र जमणेच समस्या बनते!
**मी भारतीय आहे,**
आणि सगळे म्हणतात की मी माझी संस्कृती सर्वत्र घेऊन जातो
मी परदेशात राहतानाही श्रद्धावान असतो...
प्रदेश कितीही थंड असला तरी पारंपरिक वेश धारण करतो...
माझ्या मुलांना त्यांच्या आजी-आजोबांची भाषा शिकवतो
इतर लोक शेजाऱ्यांमध्ये द्वेषाच्या भिंती उभारतात,
तुम्ही कोण-कुठले यावर अंतहीन वाद घालतात,
आणि आपण कुठून आलो हे विसरतात...
तरीही मलाच सल्ला दिला जातो की, की मी माझी संस्कृती विसरावी!
**मी भारतीय आहे,**
आणि प्रत्येक जण म्हणतो की मी भूतकाळात जगतो.
माझ्या भूतकाळाने मला योग, गणित, तत्त्वज्ञान, ध्यान,
आणि जग हे एक कुटुंब आहे ही भावना दिली.
भविष्य माझ्या भूतकाळाकडून सतत उधार घेत असते,
आणि मला त्याबद्दल जाणीव ठेवायला सांगितले जाते...
**मी भारतीय आहे,**
प्रत्येक जण म्हणतो की मला लाज वाटली पाहिजे.
माझ्या उच्चारांची लाज...
माझ्या जेवणाची लाज...
माझ्या सणांची लाज...
माझ्या परंपरांची लाज...
माझ्या अस्तित्वाची लाज...
...पण मला लाज वाटत नाही.
मी शेतकरी आणि तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ आणि संत, कामगार आणि स्वप्न पाहणाऱ्यांचे अपत्य आहे
मी अशा भूमीतून आलोय, जिने जगाला शिकवले की, सत्याचे अनेक पैलू असू शकतात...
त्यामुळे सर्व मार्गांचा आदर केला पाहिजे,
आणि संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे.
होय, आमच्यात उणिवा आहेत.
त्या प्रत्येक राष्ट्रात असतात.
पण मला माझ्या कृतींवरून पारखा,
तुमच्या पूर्वग्रहांवरून नाही.
कारण मी भारतीय आहे...
आणि माझ्या चुका सांगण्यापूर्वी, तुमच्या साचेबद्ध विचारशैलीची प्रामाणिक तपासणी करा...
**कारण मी भारतीय आहे...**
जग माझ्या उच्चारांची चेष्टा करू शकते,
माझ्या चालीरीतींवर प्रश्न विचारू शकते,
माझ्या उत्सवांवर व्यंग करू शकते,
आणि पूर्वग्रहांच्या चश्म्यातून मला पारखू शकते...
तरीही मी ताठ मानेने उभा आहे.
कारण मी अनेक साम्राज्यांपेक्षा जुन्या संस्कृतीचा,
पूर्वग्रहांपेक्षा समृद्ध असलेल्या परंपरेचा
आणि कधीही न झुकणाऱ्या लोकांपैकी आहे...
कारण मी एक भारतीय आहे! ■

**-अज्ञात**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






# वाचनामुळे संस्कृती घडू शकते : खेडगीकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

वाचन संस्कृतीचे महत्त्व, प्रिसिजन वाचन अभियानाची सुरुवात त्याची वाटचाल आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. चांगले साहित्य वाचनामुळे व्यक्तिमत्त्व घडते, विचारांना चालना मिळते आणि समाजात सकारात्मक संस्कृती निर्माण होऊ शकते, असे श्रीधर खेडगीकर यांनी सांगितले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या पन्नासाव्या साप्ताहिक बैठकीनिमित्त मेसॉनिक हॉल येथे 'वाचन अभियान आणि आपण' या विषयावर वाचकदूत श्रीधर खेडगीकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबच्या अध्यक्षा धनश्री केळकर होत्या. सोलापुरात प्रिसिजन बुक क्लबची स्थापना कशी झाली, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, शाळांना पुस्तक भेट, बुकमार्क स्पर्धा तसेच वसतीगृहांमध्ये सुरू असलेल्या वाचन चळवळीची माहिती त्यांनी दिली. मागील वर्षभरात वाचकदूत म्हणून दररोज एक पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केल्याचेही त्यांनी नमूद केले.

मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे कमी होत चाललेल्या वाचन संस्कृतीला नवसंजीवनी देण्यासाठी समाजातील विविध घटकांनी पुढाकार घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शहरातील चौक, रुग्णालये आणि पोलीस ठाण्यांमध्ये पुस्तकांचे कोपरे निर्माण करण्याची संकल्पनाही त्यांनी मांडली.

यावेळी अध्यक्षा धनश्री केळकर यांनी व्याख्यानाबद्दल समाधान व्यक्त करत वाचन चळवळीसाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूरकडून सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सहसचिव पार्थ दावडा यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी खेडगीकर यांनी रोटरी क्लबच्या अध्यक्ष व सचिवांना पुस्तके भेट दिली. कार्यक्रमास ॲड. धनंजय माने, अण्णासाहेब कोतली, डॉ. ज्योती चिडगुपकर, डॉ. नेहा जोशी, परशुराम कोकणे, सलाम शेख, राजेंद्र गांधी, भरत अय्यंगार, शिवाजी उपरे, विकास धांडोरे, अच्युत काटीकर, नरहरी अघोर, पोळ व रघुनाथ क्षीरसागर उपस्थित होते.

# दीपक खटकाळे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ जून-**

सांगोला युवा सेना तालुकाप्रमुख दिपक उर्फ गुंडादादा खटकाळे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दि.१५ जून रोजी समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत माजी आ. शहाजी पाटील यांचे संपर्क कार्यालय येथे महारक्तदान शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक व नागरिक उपस्थित राहणार असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन गुंडादादा खटकाळे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## टी. सी. हरवली आहे

दिनांक २५/५/२६ रोजी खुदावाडी ते अणदूर प्रवासा दरम्यान, दत्तात्रय अजय चिंचोले या नावाची जवाहर महाविद्यालय अणदूर या संस्थेची १२ वी पास टी.सी.हरवली आहे, ज्यांना सापडली असेल त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**दत्तात्रय अजय चिंचोले**
मु.पो.-खुदावाडी ता.- तुळजापूर
जि.- धाराशिव

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे गावडेवाडी या जाहीर नोटीतीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

डिाा व सब डिाा सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर मौजे गावडेवाडी येथील शेतजमीन गट नं. १०५ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर चंद्राबाई गंगाराम हाके या नावाची नोंद आहे. तसेच मौजे ग्रामपंचायत गावडेवाडी ता. दक्षिण सोलापूर च्या मृत्युदाखल्यावर चंदाबाई गंगाराम हक्के अशा नावाची नोंद आहे. चंद्राबाई गंगाराम हाके आणि चंदाबाई गंगाराम हक्के तसेच चंद्राबाई व चंदाबाई दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.

सदर दोन्ही नावाबाबत कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली दि. १४/०६/२०२६.

सही/-
**केदार एम. डोळळे**
बी.ए.(ऑ.) जी.डी.सी.ॲण्ड., एल.एल.बी.,
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲडव्होकेट
मो.नं. ७९७२५८०१४९
कार्यालय. हवा ट्रेडर्स जवळ, लेबर फेडरेशन कार्यालया जवळ, सिध्देश्वर पेठ, सोलापूर.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे शावळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील रहिवासी लोकांना आमचे अशील सुरजसिंह सुनिलसिंह चौहान, रा. सज्जन हाईट्स कैलाश नगर, नांदेड, जि. नांदेड - ४३१६०२ यांच्यावतीने या जाहीर नोटीतीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे -
मौजे शावळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर खालील प्रमाणे

| अ. क्र. | गट नं | हे.आर पो.ख. सहीत एकूण क्षेत्र | आकार रु.पै. | यापैकी विक्री क्षेत्र हे.आर | खातेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०५/१/अ | १.६२ | ४.७४ | संपूर्ण | नागेश शंकर तडवळ |
| २ | १०५/१/ब/१ | १.६२ | ४.७४ | संपूर्ण | नागेश सिध्दराम कारले |
| ३ | १०५/१/ब/२ | १.२९ | ३.७७ | संपूर्ण | ओमप्रकाश अण्णप्पा दोड्याळ |
| ४ | १०५/२/अ | १.६२ | ४.७७ | संपूर्ण | शिवानंद शंकर तडवळ |
| ५ | १०५/१/ब<br>१०५/१/ब | १.२८<br>१.६० | ३.७७<br>४.७१ | संपूर्ण | शंकर बसण्णा तडवळ<br>हेमा भिमराव पवार |
| एकूण क्षेत्र | | ९.०३ | २६.५० | | |

त्यातील असणाऱ्या तदंगभूत वस्तुसह व सर्व हक्कासह, या मिळकती वर नमूद खातेदारांची स्वसंपादित/ स्वतंत्र मालकी वहिवाटीच्या मिळकती असून सदर मिळकती आमचे अशिलांना करार नाम्याने विकण्याचे निश्चित केले आहेत. सदरील मिळकतीच्या विद्यमान मालकांनी सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा व सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून वर नमूद खातेदारांनी आमच्या अशिलांना विकण्याचे निश्चित करून करारनामा लिहून देवून इसारापोटी काही रक्कम आमच्या अशिलानांकडून स्विकारलेले आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विद्यमान मालक खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

सबब या जाहीर नोटीतीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी, विक्री, साठेखत, तारण, लिज, लीन, दान, पोटगी, कोर्टजप्ती, बक्षीस, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आवश्यक त्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आमचे खालील पत्त्यावर आमच्याशी संपर्क साधून त्या बाबत खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरील मिळकतीवर वरील नमूद विद्यमान मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही. अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशील खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाची, कसलीही तक्रार याबाबत चालणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.
ता. १४/०६/२०२६

**(सही)**
**अशिल**

**(सही)**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**(ॲड ए.के. पीरजादे, ॲड. ए.एस. पाटील)**
**रा. जुना राजवाडा जवळ, टिळक गल्ली, अक्कलकोट जि. सोलापूर**
**मोबा :- ९८८१३६२६५६ / ९९२११२०९९२९**

## Classifieds

### विकणे आहे

**विजापूर रोड, माशाळे नगर माता लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये 2BHK फ्लॅट विकणे आहे. पार्किंग व पाण्याची मुबलक सुविधा आहे.**
**--- संपर्क ---**
**7498948451**
**9579030937**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# साताऱ्याच्या समर्थ विद्यापीठाच्या परीक्षेत सोलापूरकरांचे यश

## आराध्ये, माढेकर, जोशी, प्रा. निमकर विविध परीक्षेत उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

सातारा जिल्ह्यातील सज्जनगड येथील समर्थ सेवा मंडळ संचलित समर्थ विद्यापीठाच्यावतीने समर्थ रामदास स्वामी यांच्या साहित्यावर आधारित विविध वयोगटासाठी विविध परीक्षा घेण्यात येतात. या परीक्षेमध्ये सोलापुरातील चौघांनी प्रौढ गटातील परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश मिळिवले आहे.

या परीक्षांमध्ये देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये हे समर्थ बोध ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. भारत पेट्रोलियम मधील निवृत्त अधिकारी सुनील माढेकर हे मनोबोध विशारद ही परीक्षा विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले. सेवासदन शाळेतील शिक्षिका योजनगंधा जोशी या मनोबोध विशारद ही परीक्षा विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. तर दयानंद महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक दीपक निमकर हे मनोबोध विशारद ही परीक्षा विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या विद्यापीठाचा पदवीदान समारंभ नुकताच सज्जनगड येथे कुलपती समर्थ भक्त शेंबेकरबुवा रामदासी, सचिव समर्थ भक्त






कुलसचिव योगेशबुवा रामदासी आणि उपकुलसचिवा प्राची भिडे यांच्या हस्ते नुकताच पार पडला. यावेळी या चौघांचाही उपकुलसचिव प्राची भिडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच या परीक्षार्थींना मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. या चौघांच्याही यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंगचे काम**

टेंडर नोटीस क्र. SUR-N-T-2026-27-16 दिनांक : ११.०६.२०२६ डीआरएम (एसॲंडटी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ऑनलाईन ई-टेंडर्स मागवित आहेत: टेंडर क्रमांक : SUR-N-T-2026-27-16. कामाचे नाव आणि ठिकाण : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील दौंड-वाडी सेक्शनमध्ये आपत्कालीन नियंत्रण सर्किट TSS/SP/SSP कम्युनिकेशन आणि केबल जॉइंट्ससह खराब झालेल्या केबल पॅच बदलणे. कामाची अंदाजीत किंमत : ३,१२,१४,८९२.०४, बयाणा रक्कम - ईएमडी : ६,२४,३००/- टेंडर फॉर्म फी : निरंक, काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ www.ireps.gov.in वर ०६.०७.२०२६ रोजी दुपारी १५.३० वाजता. सविस्तर तपशील आयरेप्स वेबसाईटवर उपलब्ध आहे. सुधारणा/बदल काही असल्यास ते फक्त वरील ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईटवरच अपलोड केले जातील. फक्त ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट मिळवावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in वर करावी. बयाणा रक्कम नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारली जाईल. मूळ बँक गॅरंटी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे बोली सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याच्या अंतिम तारखेव्यतिरिक्त) वैयक्तिकरित्या सुपूर्द केली जावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

EXP-28 **डीआरएम (एसॲंडटी), सोलापूर**

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**साहित्य पुरवठा**

विभागीय भंडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ऑनलाईन ई-टेंडर्स मागवित आहेत: टेंडर क्रमांक : ९६२६५०७६A वर्णन : जॉइंटलेस ग्रूव्हड कॉपर कॉन्टॅक्ट वायर, १०७ चौ.मी.मी., जी आरडीएसओ तपशील क्र. TI/SPC/OHE/CW/00971 किंवा अद्ययावत नुसार सलग कास्ट कॉपर वायर रॉड्सपासून बनवलेली असावी. प्रमाण/संख्या : १७.५ किमी बयाणा रक्कम - ईएमडी : ३,११,६९०.०० टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ www.ireps.gov.in वर ०६.०७.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजेनंतर. संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी या टेंडरबाबत जारी केलेले कोणतेही बदल/सुधारणा पाहण्यासाठी टेंडर बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाईटला वारंवार भेट द्यावी. वेबसाईट: www.ireps.gov.in

EXP-30 **वरिष्ठ डीएमएम, सोलापूर**

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**साहित्य पुरवठा**

विभागीय भंडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ऑनलाईन ई-टेंडर्स मागवित आहेत: टेंडर क्रमांक : ९६२६५०७८A वर्णन : अन-इन्सुलेटेड कॅडमियम कॉपर कॅटेनरी वायर ६५ चौ.मी.मी. (१९/२.१० मिमी). तपशील: TI SPC OHE CAT Cu-Cd- 0971, STR : TI STR 020 Rev 02 किंवा अद्ययावत नुसार. प्रमाण/संख्या : २१.५ किमी बयाणा रक्कम - ईएमडी : २,४३,५९०.०० टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ www.ireps.gov.in वर ०६.०७.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजेनंतर. संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी या टेंडरबाबत जारी केलेले कोणतेही बदल/सुधारणा पाहण्यासाठी टेंडर बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाईटला वारंवार भेट द्यावी. वेबसाईट: www.ireps.gov.in

EXP-31 **वरिष्ठ डीएमएम, सोलापूर**

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**साहित्य पुरवठा**

विभागीय भंडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ऑनलाईन ई-टेंडर्स मागवित आहेत: टेंडर क्रमांक : ९६२५५८५३B वर्णन : लाईट वेट लिथियम बॅटरी टॅम्पिंग मशीनचा पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग. जोडलेल्या अनुलग्नक-ए मधील तपशिलानुसार, एक सेट ज्यामध्ये २ नॉक टॅम्पर्स समाविष्ट आहेत (८ बॅटऱ्या, ४ चार्जर्स, ०४ टॅम्पिंग टूल्स, ०२ ट्रान्सपोर्टेशन ट्रॉलीसह). प्रमाण/संख्या : १५ सेट, बयाणा रक्कम - ईएमडी : ४,६८,१३०.०० टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ www.ireps.gov.in वर ०२.०७.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजेनंतर. संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी या टेंडरबाबत जारी केलेले कोणतेही बदल/सुधारणा पाहण्यासाठी टेंडर बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाईटला वारंवार भेट द्यावी. वेबसाईट: www.ireps.gov.in

EXP-29 **वरिष्ठ डीएमएम, सोलापूर**

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

## जाहिर प्रगटनाद्वारे समन्स
## तुळजापूर येथील दिवाणी न्यायाधीश व.स्तर, तुळजापूर ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांच्या न्यायालयात

हिंदु विवाह अर्ज. क्र. २२०/२०२५
मिना / चंद्रमोहन
नि.नं. १५

प्रति,
गैरअर्जदार --
**चंद्रमोहन शिवाजी कांबळे,**
रा. २४ बँक कॉलनी, ज्ञानेश्वर नगर, जुळे सोलापूर, पोस्ट डिकेकरवाडी, ता.जि. सोलापूर,ह.मु. लाता ज्ञानदेव वाघमारे, रा. धारूर, ता.जि. धाराशिव

ज्या अर्थी अर्जदार मिना चंद्रमोहन कांबळे, रा.२४ बँक कॉलनी, ज्ञानेश्वर नगर, जुळे सोलापूर, पोस्ट डिकेकरवाडी, ता.जि. सोलापूर, ह.मु. पांडुरंग नगर, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्या अर्थी या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दि. १६/०७/२०२६ रोजी दिवसा १०.३० वा. तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नाची उत्तर देऊ शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर जाहिर जाहिर प्रगटनाद्वारे समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असे निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेंट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्त आधारालेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्त ऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेंट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम) पृष्ठर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्त ऐवजावर विसंबून असाल तर दस्तऐवजाचे एक सुची करून ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदानास जोडावे. तुम्हाला जाहिर प्रगटनाद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यात कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

सदरहू बद्दल काही तक्रार किंवा हरकत असल्यास या जाहिर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत तुम्ही स्वतः किंवा तुमच्या विधिज्ञामार्फत ह्या कोर्टात हजर होऊन तुमचे म्हणणे सादर करावे, अन्यथा तुम्हा विरुद्ध योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सबब ह्या प्रकरणाची जाहिर नोटीस देण्यात आली.

पुढील नेमलेली तारीख १६/०७/२०२६

**(सही)**
**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर , तुळजापूर**

शिक्का

**(सही)**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर , तुळजापूर**

## महाराष्ट्र शासन
## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
## जिल्हा परिषद सोलापूर
## ई-निविदा सूचना क्रमांक ०८ सन २०२६-२७ (ऑनलाइन)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर ४१३००१ निविदा पत्रात नमूद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत असलेल्या पुरवठादार यांचेकडून खालील कामाकरिता विहित नमुन्यातील निविदा पद्धतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) मागवीत आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर ४१३००१ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नाव:- आषाढी वारी पालखी सोहळा २०२६ करिता भाडेतत्त्वावर मोबाईल चार्जिंग व्हॅन वाहन पुरविणे बाबत.**

**सदर ई-निविदा कालावधी:- दि. १३/०६/२०२६ ते दि. २०/०६/२०२६ राहील.**

**निविदा सूचना बाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

1. http://mahatenders.gov.in 2. https://www.zpsolapur.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर ४१३००१ यांचे कार्यालयातील सूचना फलक

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सोलापूर**

## OFFICE OF THE RETURNING OFFICER
## DOMBIVLI NAGARI SAHAKARI BANK LTD. (MULTI STATE SCHEDULED BANK)

"Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204.

**Programme for the Election of the Board of Directors of Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank)**

In the exercise of the powers conferred by the Section 45 of Multi State Co-operative Societies Act 2002 read with the Rule 19 of the Multi State Scheduled Societies Act 2002 & Election schedule there. District Collector, Thane Districts returning Officer and District Deputy Registrar Co- operative Societies, Thane appointed to conduct the Elections of Board of Directors of Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), having its registered Office at "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204.
Office of the Returning Officer: District Collector Magistrate Thane, opp. Thane District Court Naka, Thane (West) Tal- & Dist.- Thane 400 601.
Office of the Assistant Returning Officer: Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204.

**1) Post for which Election being held - Board Members-**

| Sr. No. | Particulars | No of Seats |
|---|---|---|
| 1 | General | 8 |
| 2 | Women | 2 |
| 3 | SC/ST | 1 |
| | **Total** | **11** |

**2) The Election program for seeking name of Representative/ Delegate -**

| Election programme of Delegates | Date |
|---|---|
| Handing over names of Societies by CEO to RO | 15th June, 2026 (Monday) |
| Publication of List of Members (LLP & Partnership Firms) by RO on the website and on the Notice Board of the Bank | 16th June, 2026 (Tuesday) |
| Sending of Letters to LLPS & Partnership Firms requesting to send names of representatives by RO | On or before 19th June, 2026 (Friday) |
| Last Date of receiving of resolution of delegates from Members Societies by RO | 27th June, 2026 (Saturday) |

**3) The Election program for the Board of Directors**

| Sr. No. | Particulars | Date | Time | Place |
|---|---|---|---|---|
| 1 | Publication of Provisional List of Members / Representatives Eligible to Vote (Constituency-wise as per the Bye-Laws of Bank) | 29th June, 2026 (Monday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)- 421 204. |
| 2 | Time window for raising Objection to the Provisional List | 30th June, 2026 To 03rd July, 2026 (Tuesday to Friday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204. |
| 3 | Scrutiny of Objection received to the Provisional List (if any) | 06th July, 2026 To 09th July, 2026 (Monday To Thursday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421204. |
| 4 | Publication of Final Voters List of Members eligible to Vote | 09th July, 2026 By Evening (Thursday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421204 |
| 5 | Issue & filing of Nominations | 10th July To 15th July, 2026 (Friday to Wednesday) (Except Sunday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj", Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421 204 |
| 6 | Publication of List of Nominations received | 15th July, 2026 (Wednesday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli(East)-421 204 and on Banks web-site. |
| 7 | Scrutiny of received Nomination forms | 16th July, 2026 (Thursday) | Till the Scrutiny is complete | Office of the Returning Officer & District Collector, Thane, 1st floor, Collector Office, Court Naka, Thane (West)-400 601. |
| 8 | Publication of List of Valid Nominations | 16th July, 2026 (Thursday) | After Scrutiny | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)-421 204 and on Banks web-site. |
| 9 | Withdrawal of Nominations | 17th July, 2026 (Friday) | 11.00 a.m. to 03.00 p.m. | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road,Sonarpada,Dombivli(East)-421 204 |
| 10 | Publication of Final List of Contesting Candidates | 17th July, 2026 (Friday) | By Evening | Office of the Assistant Returning Officer, Dombivli Nagari Sahakari Bank Ltd. (Multi State Scheduled Bank), "Madhukunj",Plot No. P-52, MIDC Phase-2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East)- 421 204. |
| 11 | Date of Polling (if necessary) | 26th July, 2026 (Sunday) | 08.00 a.m. to 04.00 p.m. & All those who have entered polling station at 04.00 p.m. or before will be allowed to cast the vote | Place will be declared later. |
| 12 | Counting of Votes | 29th July, 2026 (Wednesday) | 08.00 a.m. onwards | Place will be declared later. |
| 13 | Submission of Form 19M with recommendation for seeking approval of CEA before declaration of result of BOD. | 30th July, 2026 (Thursday) | --- | --- |
| 14 | Declaration of Result of Board of Directors | 05th August, 2026 (Wednesday) | | |
| 15. | Election program of Office Bearers | | | |
| (1) | Announcement of Election Schedule | 12th August, 2026 (Wednesday) | | --- |
| | i) Time window for filing nominations | 09.30 am to 11.30 am | After declaration of Result of Board Members Election | Office of Returning Officer and District Collector, Thane 1st Floor Collector Office, Court Naka, Thane (W) 400 601. |
| | ii) Scrutiny of nomination papers | 12.30 p.m. to 02.00 p.m. | | |
| | iii) Time and Date for withdrawal | 02.00 p.m. to 04.00 p.m. | | |
| | iv) Display of list of the contesting candidate and schedule of election. | 04.00 p.m. | | |
| (2) | Meeting of Newly constituted Board & Publication of list of Valid Nominations, Polling (if required) | 13th August,2026 (Thursday) | 11.00 a.m. onwards | Office of Returning Officer and District Collector, Thane 1st Floor Collector Office, Court Naka, Thane (W) 400 601. |
| (3) | Declaration of Result of Election of Office Bearers | On or before 20th August, 2026 (Thursday) | --- | --- |

**Notes:**
1. A copy of Voters List will be supplied by the Bank to any Regular Member on payment of fees of Rs. 4,000/- + GST 18% as decided by the Bank.
2. Nomination form may be presented in person by the candidate himself or by any person authorized by him in this behalf as per Election Programme.
3. A regular Member who gets disqualified, under any of the provisions specified in section 43 & 44 of the Multi State Co-operative Societies Act 2002 & or Bye-Laws of the Bank, shall not be eligible for being nominated for a seat on the Board.
4. The candidate filling the Nomination must comply prerequisites as per provisions of Bye- Laws of the Bank.
5. The Candidate filling Nomination Form under the category of reserved seat for Scheduled Caste or Scheduled Tribe, should attach copy of caste certificate duly attested by Gazetted Officer / Notary with his Nomination Form.
6. Withdrawal of Nomination (if any) shall be made by a Notice in writing by candidate himself and submitted in person by the candidate or by person authorized by him in this behalf as per Election Programme. A Notice of withdrawal of Nomination once given shall be irrevocable.

**Place: Dombivli.**
**Date: 14-06-2026.**

**Sd/-**
**Assistant Returning Officer & District Deputy Registrar, Co-operative Societies, Thane.**

SEAL

**Sd/-**
**Returning Officer & District Collector/Magistrate, Thane District.**



## महत्त्वाचे

### तन्वी, अभिनवकडे कनिष्ठ संघाचे नेतृत्व

**नवी दिल्ली :** जपानमधील यात्सुशिरो येथे २६ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत होणाऱ्या 'बॅडमिंटन आशिया कनिष्ठ (१९ वर्षांखालील) स्पर्धेसाठी अखिल भारतीय कनिष्ठ मानांकन स्पर्धेत पदक विजेते ठरलेले तन्वी पात्री आणि अभिनव गर्ग भारतीय संघाचे नेतृत्व करतील. संघीय स्पर्धा २६ ते ३० जून दरम्यान होणार असून, त्यानंतर वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन केले जाईल. गत महिन्यात बंगळुरू येथे झालेल्या अ.भा. १९-वर्षांखालील मानांकन स्पर्धेत विजय मिळविल्यामुळे तन्वी पात्री आणि अभिनव गर्ग यांची, तसेच विविध प्रकारांमधील अव्वल दुहेरी जोड्यांची थेट संघात निवड करण्यात आली.

# अमेरिकेची घरच्या मैदानावर विजयी सुरुवात

### बालोगुनचे दोन गोल; पॅराग्वेवर ४-१ ने मात

**इंग्लड, १३ जून**

फोलेरिन बालोगुनने दोन गोल करत अमेरिकन संघाच्या ऐतिहासिक अशा 'तीन-गोल'च्या पहिल्या सत्रात मोलाचा वाटा उचलला. पॅराग्वेविरुद्ध ४-१ असा शानदार विजय नोंदवित अमेरिकेने ३२ वर्षांनंतर आपल्या भूमीवर आयोजित फिफा विश्वचषकाची सुरुवात स्पर्धेतील सर्वात मोठ्या विजयाने केली.

ख्रिश्चन पुलिसिकने पहिल्या सत्रात उत्कृष्ट व्यूहरचना करत एका गोलसाठी मदत केली. आक्रमक खेळाच्या जोरावर अमेरिकन संघाने मध्यंतरापर्यंत ३-० अशी आघाडी घेतली आणि दक्षिण कॅलिफोर्नियातील चाहत्यांची मने जिंकली; कोणत्याही विश्वचषक सामन्यातील संघाची पूर्वार्धात मिळविलेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी आघाडी ठरली.



उत्तरार्धातील 'इंज्युरी टाइम'च्या अगदी शेवटच्या क्षणी जिओ रेना याने आणखी एक गोल केला, त्यामुळे अमेरिकन संघाने विश्वचषक सामन्यात पहिल्यांदाच चार गोल करण्याचा पराक्रम केला.

चार वर्षांपूर्वी कतार विश्वचषकांत अमेरिकेने आपल्या चार सामन्यांत मिळून केवळ तीन गोल केले होते आणि यापूर्वी कोणत्याही विश्वचषक सामन्यात त्यांनी तीनपेक्षा जास्त गोल केले नव्हते.

मात्र, नवीन प्रशिक्षक मॉरिसिओ पोचेटिनो यांच्या अधिक सर्जनशील खेळपद्धतीनुसार खेळताना अमेरिकन संघ पूर्णपणे बदललेला आणि प्रभावी वाटला.

पॅराग्वेसाठी उत्तरार्धात मॉरिसिओने गोल केला, परंतु १६ वर्षांनंतरच्या आपल्या पहिल्याच विश्वचषक सामन्यात पॅराग्वे संघ सुरुवातीलाच खूप पिछाडीवर पडला होता. पुलिसिकच्या उत्कृष्ट खेळामुळे मिळालेल्या सुरुवातीच्या 'आत्मघाती-गोल'मुळे (प्रतस्पिर्धी खेळाडूने स्वतःच्याच गोलपोस्टमध्ये केलेला गोल) अमेरिकेने आघाडी घेतली. त्यानंतर बालोगुनने ३१ व्या मिनिटाला आणि पुन्हा 'इंज्युरी टाइम'मधील पाचव्या मिनिटाला गोल केले.

न्यूयॉर्कमध्ये जन्मलेल्या आणि लंडनमध्ये वाढलेल्या बालोगुनने आपल्या विश्वचषक पदार्पणाच्या सामन्यात एकाच सामन्यात अनेक गोल करण्याची कामगिरी केली; १९३० नंतर अशी कामगिरी करणारा तो पहिलाच अमेरिकन खेळाडू ठरला. बालोगुनने तीन वर्षांपूर्वी इंग्लंडच्या फुटबॉल प्रणालीत राहण्याऐवजी अमेरिकेचे प्रतिनिधत्वि करणे पसंत केले होते .आता २४ वर्षीय आणि 'मोनाको' क्लबकडून व्यावसायिक फुटबॉल खेळणाऱ्या या खेळाडूने अमेरिकन संघात ऐतिहासिकदृष्ट्या अभाव असलेल्या उच्च-स्तरीय स्ट्रायकरची भूमिका समर्थपणे निभावली आहे.

(वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**जर्मनी वि. कुराकाओ**
रविवारी रात्री १०.३० वाजतापासून
**एनआरजी स्टेडियम, हॉस्टननेदरलँड्स वि. जपान**
रविवारी मध्य रात्री १.३० वाजतापासून
**एटी अँड टी स्टेडियम, डल्लास आयव्हरी कोस्ट वि. इक्वाडोर**
सोमवारी पहाटे ४.३० वाजतापासून
**लिंकन फील्ड, फिलाडेल्फियस्वीडन वि. ट्युनिशिया**
सोमवारी सकाळी ७.३० वाजतापासून
एस्तादियो बीबीव्हीए, मॉन्टेरी
**थेट प्रसारण युनायटेड स्पोर्ट्सवर**

# कॅनडा-बोस्निया-हर्झगोव्हिना लढत १-१ ने बरोबरीत

### लारिनचा ७८ व्या मिनिटाला महत्त्वपूर्ण गोल

**टोरोंटो, १३ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉलच्या सर्वात मोठ्या मंचावर सात सामन्यांनंतर कॅनडाने आपला पहिला विश्वचषक गुण मिळविला. मायदेशात झालेल्या बोस्निया-हर्झ-गोव्हिना विरुद्धच्या पर्दापणाच्या सामन्यात सुरुवातीला पिछाडीवर राहिल्यानंतर कॅनडाने जोरदार मुसंडी मारून सामना १-१ गोलने बरोबरीत राखला.

बदली खेळाडू म्हणून उतरलेल्या काईल लारिनने ७८ व्या मिनिटाला गोल करून कॅनडाला १-१ अशी बरोबरी मिळवून दिली आणि त्यानंतर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. लाल कपडे परिधान केलेले आणि



कॅनडाचा राष्ट्रीय ध्वज फडकवणारे चाहते सतत गो कॅनडा ! अशा घोषणा देत होते, त्यांच्या प्रोत्सहनामुळेच हे शक्य झाले, असे प्रशिक्षक जेसी मार्श यांनी नमूद केले. टोरोंटोच्या प्रसिद्ध 'सीएन टॉवर'च्या सावलीत खेळताना आणि प्रेक्षकांमध्ये हॉकीपटू कॉनर मॅकडेव्हिड तसेच अभिनेते रायन रेनॉल्ड्स व माइक मायर्स उपस्थित असताना, लारिनने मैदानात उतरल्यानंतर अवघ्या दोन मिनिटांतच 'प्रॉमिस डेव्हिड'चा पास गोलमध्ये रूपांतरित केला.प्रेक्षकांनीच आम्हाला सामन्यात परत आणले; कारण उत्तरार्धात खेळाडूंना ती ऊर्जा आपल्या बाजूने झुकताना जाणवत होती, असे मार्श म्हणाले. लारिनसाठी ही भावना अधिकच खास होती; कारण तो सहसा सुरुवातीच्या संघात खेळतो, पण या सामन्यात त्याला उत्तरार्धापर्यंत बाकावर बसून वाट पाहावी लागली होती. मायदेशात मी लहानाचा मोठा झालो, तिथेच आपल्या चाहत्यांसमोर विश्वचषकात गोल करणे आणि चाहत्यांसोबत आनंद साजरा करणे ही एक रोमांचक भावना होती, असे लारिन म्हणाला. तो टोरोंटोच्या उपनगरातील ब्रॅम्प्टनचा रहिवासी आहे. १९८६ मध्ये मेक्सिकोमध्ये आणि चार वर्षांपूर्वी कतारमध्ये झालेल्या विश्वचषकात कॅनडाने आपले तिन्ही सामने गमावले होते; त्यानंतर विश्वचषकातील सामन्यात कॅनडाने नोंदवलेला हा केवळ दुसराच गोल होता. दुखापतग्रस्त खेळाडूच्या जागी खेळणाऱ्या जोव्हो लुकिच याने २१ व्या मिनिटाला कॉर्नर किकवर हेडरद्वारे गोल करत बोस्निया-हर्झगोव्हिनाला आघाडी मिळवून दिली. (वृत्तसंस्था)

## विश्व मुष्टियुद्ध स्पर्धेसाठी ज्योती, आकाशची निवड

**नवी दिल्ली, १३ जून**

भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने ज्योती गुलिया आणि आकाशचा 'विश्वचषक मुष्टियुद्ध दुसरे चरण' स्पर्धेतील सहभाग निश्चित केला. चीनमधील गुईयांग येथे सोमवार-पासून सुरू होणाऱ्या 'विश्वचषक मुष्टियुद्ध दुसरे चरण' स्पर्धेसाठी, अनुक्रमे ४८ किलो आणि ७५ किलो वजनी गटात ज्योती गुलिया आणि आकाश यांचा शनिवारी भारतीय संघात समावेश करण्यात आला. हे दोन्ही बॉक्सर सुरुवातीला सरकारच्या मंजुरी मिळालेल्या अंतिम पथकाचा भाग नव्हते.

भारतीय मुष्टियुद्ध महासंघाचे अध्यक्ष अजय सिंग यांच्या हस्तक्षेपानंतर त्यांचा सहभाग निश्चित झाला. (वृत्तसंस्था)

# सिंधूचा जेतेपदाचा दुष्काळ कायम

### ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीत पराभव

**सिडनी, १३ जून**

दोनदा ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या पी. व्ही. सिंधूची बीडब्ल्यूएफ जेतेपदाची प्रतीक्षा कायम राहिली आहे. शनिवारी ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत जपानच्या अव्वल मानांकित अकाने यामागुचीकडून सरळ गेम्समध्ये पराभव झाल्यामुळे तिला स्पर्धेतून बाहेर पडावे लागले.

स्पर्धेत तिसरे मानांकन असलेल्या आणि एकेकाळी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी राहिलेल्या सिंधूने पहिल्या गेममध्ये जोरदार झुंज दिली. तिने 'गेम पॉइंट'ही मिळविला होता, परंतु अखेरीस जागतिक क्रमवारीत



तिसऱ्या स्थानावर असलेल्या यामागुचीकडून तिला २०-२२, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला. हा सामना ४३ मिनिटे चालला.सिंधूच्या या पराभवामुळे बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ५०० स्पर्धेतील भारताचे आव्हानही संपुष्टात आले. अतिशय चुरशीच्या ठरलेल्या पहिल्या गेममध्ये सिंधूने यामागुचीला प्रत्येक फटक्याला चोख प्रत्युत्तर दिले. दोन्ही खेळाडूंनी सलग सहा गुण मिळविण्याची कामगिरी केली, परंतु सिंधूला तिचा 'गेम पॉइंट' जिंकता आला नाही; याउलट यामागुचीने संयम राखत पहिला गेम आपल्या नावे केला.

दुसऱ्या गेममध्ये सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले. यामागुचीने सलग आठ गुण मिळवत १३-६ अशी मोठी आघाडी घेतली आणि त्यानंतर सामन्यावर पूर्ण वर्चस्व राखत सहज विजय मिळवला. आता महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात यामागुचीचा सामना थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगशी होईल.या पराभवामुळे यामागुचीविरुद्ध सिंधूचा अलीकडील संघर्ष कायम राहिला आहे. डिसेंबर २०२४ मधील 'सय्यद मोदी इंटरनॅशनल' स्पर्धेतील विजयानंतर सिंधूला अद्याप कोणतेही बीडब्ल्यूएफ टूर जेतेपद मिळवता आलेले नाही. या हंगामातील सिंधूची ही दुसरी उपांत्य फेरीतील कामगिरी होती. या वर्षाच्या सुरुवातीला तिने 'मलेशिया ओपन'मध्ये उपांत्य फेरी गाठली होती, जिथे तिला चीनच्या वांग झियीकडून पराभव पत्करावा लागला होता. (वृत्तसंस्था)




# भारत-पाकिस्तान सामना आज

**बर्मिंगहॅम, १३ जून**

आयसीसी टी-२० महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे भारत आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान यांच्यादरम्यान सलामीचा साखळी सामना खेळला जाणार आहे. गत वर्षी एकदिवसीय विश्वचषक जिंकून आयसीसी ट्रॉफीचा दीर्घ दुष्काळ संपविल्यानंतर, भारतीय संघ आता तोच सकारात्मक प्रवाह टी-२० विश्वचषकातही कायम राखण्याचा आणि अलीकडच्या काळात या स्पर्धेत पदकापासून किंवा विजयापासून थोडक्यात हुकल्याची परंपरा मोडीत काढण्याचा प्रयत्न करेल.

भारतीय महिला संघाने आतापर्यंत पाच वेळा टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे आणि एकदा अंतिम फेरी गाठली आहे, परंतु



हरमनप्रीत कौर



फातिमा सना

त्यांना अद्याप विजेतेपद मिळवता आलेले नाही. भारतीय टी-२० संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि तिची उपकर्णधार स्मृती मंधाना या दोघींनाही स्पर्धेच्या आगामी आवृत्तीत जेतेपद पटकावण्याची आशा असेल.

तथापि, जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेला भारतीय संघ काहीसा अस्थिर फॉर्म घेऊन २०२६ च्या टी-२० विश्वचषकात उतरत आहे; कारण त्यांना अलीकडेच दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. तसेच, स्पर्धेपूर्वी खेळल्या गेलेल्या दोन सराव सामन्यांपैकी त्यांना केवळ एका सामन्यात विजय मिळवता आला. तरीही, भारतीय महिला क्रिकेट संघ कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात आत्मविश्वासाने उतरेल.

जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असलेल्या पाकिस्तानलाही या वर्षी टी-२० प्रकारात सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात अडचणी आल्या आहेत आणि त्यांनी गत पाच सामन्यांपैकी केवळ एक सामना जिंकला आहे.

पाकिस्तानविरुद्ध भारताची कामगिरी अत्यंत प्रभावी राहिली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील टी-२० सामन्यांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, भारताने १६ पैकी १३ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानला केवळ तीन वेळा विजय मिळाला आहे. पाकिस्तानच्या त्या तीन विजयांपैकी दोन विजय टी-२० विश्वचषकात मिळाले आहेत. दुसरीकडे, भारताने या स्पर्धेत पाकिस्तानचा सहा वेळा पराभव केला आहे.

### आजचे टी-२० सामने

**बांगलादेश वि. नेदरलँड्स**
**स्थळ:** बर्मिंगहॅम
**वेळ :** दुपारी ३:०० वाजतापासून
००
**भारत वि. पाकिस्तान**
**स्थळ :** बर्मिंगहॅम
**वेळ :** सायंकाळी ७:०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

### सामन्याच्या पूर्वसंध्येला पाकिस्तान संघाला धक्का

शनिवारी सराव सत्रादरम्यान पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिला दुखापत झाली. सराव सत्रात गोलंदाजी करत असताना फातिमाच्या उजव्या पायाच्या नडगीवर चेंडू लागला आणि सपोर्ट स्टाफने तिला त्वरित मैदानाबाहेर नेले. त्यानंतर फातिमा उर्वरित सत्रासाठी परतली नाही आणि पाकिस्तानच्या संघ व्यवस्थापनाने तिच्या दुखापतीबाबत कोणतीही माहिती दिली नाही. टी-२० प्रकारात भारताचे पाकिस्तानविरुद्ध १३-३ अशी मोठी आघाडी आहे. दुबईत झालेल्या २०२४ च्या टी-२० विश्वचषकातील त्यांच्या मागील सामन्यात भारताने सहा गडी राखून विजय मिळविला होता.

(वृत्तसंस्था)

# श्रीलंका 'अ' ८ गडी राखून विजयी

**डाम्बुला, १३ जून**

श्रीलंका 'अ' संघ एकदिवसीय तिरंगी मालिकेत पावसाच्या व्यत्ययाखाली खेळल्या गेलेल्या सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार श्रीलंका 'अ' संघाने अफगाणिस्तान 'अ' संघावर ७७ चेंडू शिल्लक ठेवित ८ गड्यांनी विजय नोंदविला. शतकवीर अविष्का फर्नांडो सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

श्रीलंकेने नाणेफेक जिंकून अफगाणिस्तानला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. अफगाणिस्तानने ४९.४ षटकांत सर्वबाद २४५ धावा उभारल्या. परंतु पावसाच्या व्यत्ययामुळे श्रीलंकेला डकवर्थ लुईस नियमानुसार श्रीलंकेसमोर विजयासाठी सुधारित लक्ष्य ठेवण्यात आले. श्रीलंकेला विजयासाठी ४१ षटकांत २३१ धावांचे आव्हान ठेवले होते व ते त्यांनी २८.१ षटकांत २ गडी गमावित गाठले.

अफगाणिस्तानकडून हसन ऐसाखिल (४६), बहीर शाह (४६), फरमानुल्ला ( ३५) व मोहम्मद इशाकने (३०) बहारदार फलंदाजी केली. श्रीलंकेकडून



चामिका गुणाशेखरने ३ बळी, कुगाथस मथुलान व विजयकांतने प्रत्येकी २ बळी टिपले.

विजयासाठी २३१ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या निरोशान डिकवेला (४९) व अविष्का फर्नांडोने ७८ धावांची सलामी भागीदारी करून दमदार सुरुवात केली. निरोशानचे अर्धशतक हुकले, त्याने १९ चेंडूंत ९ चौकार व एका षटकारसह ४९ धावांची खेळी केली. पुढे अविष्काने सदिरा समवरविक्रमाच्या मदतीने नाबाद खेळी करत श्रीलंका अ संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. अविष्का फर्नांडोने ७९ चेंडूंत १४ चौकार व ३ षटकारसह नाबाद १०८ धावांची शतकी खेळी केली, तर समरविक्रमाने ७० चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने नाबाद ६० धावांची खेळी केली. (वृत्तसंस्था)

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय बॅडमिंटन संघाची घोषणा

**नवी दिल्ली, १३ जून**

जपानमधील आइची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील बॅडमिंटन स्पर्धांसाठी भारताचा दमदार संघ जाहीर करण्यात आला आहे. या संघाचे नेतृत्व आशियाड क्रीडा स्पर्धेत दोनदा पदक जिंकणारी पी. व्ही. सिंधू आणि २०२२ च्या स्पर्धेत पुरुष दुहेरीत सुवर्णपदक जिंकणारे सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी हे करतील.

आशियाई क्रीडा स्पर्धा ही जगातील सर्वात प्रतिष्ठित बहु-क्रीडा स्पर्धांपैकी एक आणि आशियाई क्रीडा विश्वातील सर्वोच्च सन्मानांपैकी एक मानली जाते; यात आशिया खंडातील सर्वोत्तम खेळाडू देशाच्या गौरवासाठी एकत्र येतात. 'बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडिया'च्या निवड समितीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील अलीकडील कामगिरी तसेच २६ मे २०२६ रोजीची बीडब्ल्यूएफ क्रमवारी यांचा आढावा घेऊन या संघाची अंतिम निवड केली.

(वृत्तसंस्था)

# स्कॉटलंडचा टी-२० विश्वचषकांत पहिला विजय

### कॅथरीन ब्राईसची अष्टपैलू कामगिरी

**मॅन्चेस्टर, १३ जून**

सारा ब्राईस आणि कॅथरीन ब्राईस यांच्यातील शतकी भागीदारी आणि त्यानंतरच्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर स्कॉटलंडने मॅन्चेस्टर येथे आयर्लंडचा ४० धावांनी पराभव करून टी-२० विश्वचषकातील आपला पहिला विजय नोंदविला.

प्रथम फलंदाजीची संधी मिळाल्यावर ब्राइस भगिनींनी स्कॉटलंडची धावसंख्या ५ बाद १६१ पर्यंत पोहोचवली; त्यानंतर फिरकी गोलंदाज कॅथरीन फ्रेझर आणि कर्स्टी गॉर्डन यांनी मिळून सहा बळी टिपले, ज्यामुळे आयर्लंडचा डाव १२१ धावांत आटोपला. टी-२० विश्वचषकातील १८ सामन्यांनंतरही आयर्लंडला अद्याप एकही विजय मिळवता आलेला नाही.

सारा व कॅथरीनने तिसऱ्या गड्यासाठी १०६ धावांची धावांची भागीदारी करून स्कॉटलंडचा पाया मजबूत केला. कॅथरीन ब्राईसने ३९ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कारसह ६० धावांची, तर सारा ब्राईसने ३५ चेंडूंत ४ चौकार व एका षट्कारसह ४९ धावांची खेळी केली. आयर्लंडला डाव १२१ धावांत गुंडाळताना कर्स्टी गॉर्डनने १६ धावांत ३ बळी, कॅथरीन फ्रेझरने १९ धावांत ३ बळी, तर कॅथरीन ब्राईसने १९ धावांत २ बळी टिपलेत.

(वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सोलापूर जिल्हा क्रिकेट संघ निवड चाचणी २० व २१ जून रोजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या वतीने १४ वर्षांखालील मुलांची क्रिकेट निवड चाचणी शनिवार, २० जून आणि रविवार, २१ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही निवड चाचणी येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सकाळी ९:३० वाजता सुरू होणार आहे. या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी खेळाडूंची जन्म तारीख १ सप्टेंबर २०१२ किंवा त्यानंतरची असणे आवश्यक आहे. सर्व इच्छुक खेळाडूंनी चाचणीपूर्वी आपले खेळाडू रजिस्ट्रेशन पूर्ण करून निवड चाचणी फी भरणे बंधनकारक आहे. निवड चाचणीच्या दिवशी खेळाडूंना सकाळी ११ वाजेपूर्वी मैदानावर रिपोर्टिंग करावे लागेल. सकाळी ११ वाजेच्या आधी उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंचीच निवड चाचणी घेतली जाईल, असे असोसिएशनने संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सो यांनी कळविली आहे. ही निवड प्रक्रिया चेअरमन राजेंद्र गोटे, सत्यजित जाधव, विक्रांत पवार, डॉ. ढेंबरे आणि राजू रंगम यांची समिती पार पाडणार आहे.

## अवैध प्रवाशी वाहतूक करणाऱ्या तीन वाहनावर दंडात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.१३ जून-**

मंगळवेढा बसस्थानक २०० मिटर परिसरात अवैध प्रवाशी वाहतूक करणाऱ्या तीन वाहन चालकांना पोलीसांनी २ हजार ५०० रुपयाचा दंड केला आहे. शुक्रवार (दि.१२) मंगळवेढा बसस्थानकावर सोलापूर विभागाचे सहाय्यक सुरक्षा निरीक्षक पितांबर घोडके, मंगळवेढा बसस्थानक प्रमुख शरद वाघमारे, वाहतूक पोलीस संभाजी यादव आदींनी संयुक्त कारवाई केली. यामध्ये अचानक केलेल्या कारवाईमध्ये अवैध प्रवाशी वाहतूक करणारी तीन वाहने आढळून आली. एका वाहनास १ हजार ५०० व अन्य दोन वाहनास प्रत्येकी ५०० रुपये प्रमाणे अडीच हजार रुपये दंड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.यापुढे ही कारवाई अधिक तीव्र करणार असल्याचे आगार प्रमुख गुरुनाथ रणे यांनी सांगीतले.

## निधन वृत्त...

### अणविरप्पा कोडले

**सोलापूर, दि. १३ जून-**



वळसंग येथील ज्येष्ठ व प्रतिष्ठित किराणा व्यापारी अणविरप्पा करबसप्पा कोडले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी शुक्रवार रात्री ११.२० वाजता निधन झाले. ते कै. शिवलिंगप्पा क. कोडले (माजी जिल्हा परिषद सदस्य) यांचे ज्येष्ठ बंधू होते.

### कृष्णाहरी कुरापाटी

**सोलापूर, दि. १३ जून-**



रविवार पेठेतील ज्येष्ठ नागरिक तथा कृष्णा हार्डवेअरचे मालक कृष्णाहरी यल्लप्पा कुरापाटी यांचे दि.१२ जून २०२६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा परिवार आहे. पद्मशाली समाजातील थोर स्वातंत्र्यसैनिक कै.मल्लप्पा पुली यांचे ते जावई होत.

### संजय मोरे

**बार्शी, दि. १३ जून -**



भातंबरे (ता. बार्शी) येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संजय मोरे (वय ५९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. संजय मोरे हे श्री शिवाजी महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांचे ज्येष्ठ चिरंजीव होते. त्यांच्या पश्चात आई,वडील, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठ येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विनोद गायकवाड

**सोलापूर, दि. १३ जून**



सोलापूर : गीता नगर, लोटस अपार्टमेंट, पूर्व भाग येथील रहिवासी विनोद गायकवाड (वय ५०) यांचे शनिवार दि.१३ जून रोजी दुपारी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अक्कलकोट रस्त्यावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, २ भाऊ, २ बहिणी असून पोलिस खात्यातील बाळासाहेब गायकवाड यांचे ते लहान बंधू होते.

# चेतक स्केटिंग स्पर्धेत साडेचार वर्षांच्या स्मार्त घायाळची बाजी

### विविध वयोगटातील विजेत्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

येथील चेतक स्केटिंग क्लबच्या स्केटिंग स्पर्धेत अवघ्या साडेचार वर्षांच्या स्मार्त घायाळ या चिमुरड्याने साध्या स्केट्सवर अप्रतिम कौशल्य दाखवत ६ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रथम क्रमांक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

क्लबच्या वतीने आयोजित ८४व्या ७५ दिवसीय स्केटिंग प्रशिक्षण शिबिराचा नुकताच समारोप झाला. या शिबिरात सोलापूरसह परिसरातील अनेक गावांमधील मुला-मुलींनी स्केटिंगचे धडे गिरवले. या शिबिराचाच एक भाग म्हणून नुकतीच होम मैदानालगत स्केटिंग स्पर्धेचे दिमाखात आयोजन करण्यात आले होते. एकूण ९ वेगवेगळ्या वयोगटात पार पडली.

शिबिरादरम्यान सर्व खेळाडूंना दिव्यकांत गांधी यांनी स्पीड स्केटिंगचे विशेष प्रशिक्षण दिले आणि स्पर्धेचे यशस्वी संयोजन केले. या स्पर्धेचे परीक्षण दिव्यकांत यांच्यासह मयुर सोलनकर, जयदेव बाहेरमठ, प्रितेश गांधी आणि ध्रुवेश गांधी यांनी चोखपणे पार पाडले.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल**
**(अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय):**

६ वर्षांखालील गट: मुले: स्मार्त घायाळ, सार्थक खताळ, जैन अली शेख. मुली: उर्वी गांधी, प्रेक्षा शिंदे.

९ वर्षांखालील गट: मुले: सालीफ सुहेल इनामदार, अ. सत्तार शेख, अहद शेख.मुली: अस्मायरा नदाफ, सिमराह इनामदार.

१२ वर्षांखालील गट: मुले: अहद शेख, अर्थव मोरे, निखिल उपळाइकर. मुली: अलेक्या सानम, उमेरा शेख, झकीया शेख.

१५ वर्षांखालील गट: मुले: श्लोक खताळ, अंशुक कांबळे. मुली: लतीका मोरे.

१९ वर्षांखालील गट: मुले: मयुर सोलनकर, जयदेव बाहेरमठ.




## निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी ब्लू आणि रेड संघांची अंतिम फेरीत धडक

### आपटे चषक क्रिकेट स्पर्धा : अर्जुन चटके, संस्कार गवळी सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**




साउथ सोलापूर आपटे ग्रुप चषक १४,१६ व १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी (एनजीसीए) ब्लू आणि रेड या दोन्ही संघांनी आपापल्या उपांत्य फेरीच्या सामन्यांत शानदार विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे.

दयानंद महाविद्यालयाच्या महिला मैदानावर असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात एनजीसीए (ब्लू) संघाने युनायटेड सी.सी. चा ४ गडी राखून, तर दुसऱ्या सामन्यात एनजीसीए (रेड) संघाने साऊथ सोलापूरचा ७ गडी राखून पराभव केला. पहिल्या उपांत्य सामन्यात युनायटेड सी.सी. संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. मात्र, एनजीसीए (ब्लू) च्या भेदक गोलंदाजीसमोर त्यांचा संपूर्ण डाव १३७ धावांवर आटोपला. युनायटेडकडून विराटने २३ तर निहार पोळने २२ धावा केल्या. एनजीसीए (ब्लू) कडून संस्कार गवळीने ३ तर ईश्वरने २ बळी घेतले.विजयासाठी मिळालेले १३८ धावांचे आव्हान एनजीसीए (ब्लू) संघाने ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. यश पवारच्या ६८ धावांच्या धडाकेबाज अर्धशतकी खेळीने आणि सुजलच्या ३७ धावांच्या साथीने संघाचा विजय सुकर केला. युनायटेडच्या निहार पोळने ३ आणि सम्राट बोबडेने २ बळी घेतले, पण ते अपुरे पडले. ३ बळी घेणाऱ्या संस्कार गवळीला सामनावीर घोषित करण्यात आले.

**साऊथ सोलापूर पराभूत**

दुसऱ्या उपांत्य सामन्यात एनजीसीए (रेड) संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना साऊथ सोलापूर संघाची सुरुवात खराब झाली आणि संपूर्ण संघ ११० धावांत गारद झाला. तन्मय वाघमोडेने २८ तर प्रथमेश मिट्ठाने २७ धावा केल्या. एनजीसीए (रेड) कडून अर्जुन चटकेने ३ बळी घेतले, तर ऋग्वेद पाटील आणि दर्शिल फाळके यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.१११ धावांचे सोपे लक्ष्य एनजीसीए (रेड) संघाने केवळ ३ गडी गमावून सहज गाठले. फलंदाजीत अर्जुन चटकेने २३ तर ऋग्वेद पाटीलने नाबाद २१ धावांचे योगदान दिले. साऊथ सोलापूरच्या जय गुंडने ३ बळी घेतले. गोलंदाजीत ३ बळी आणि फलंदाजीत २३ धावा करणाऱ्या अर्जुन चटकेला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

## वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये सोलापूरच्या प्रांजल व्हन्ना हिला २ सुवर्ण

### वयाच्या १५व्या वर्षी ४0हून अधिक पदके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

अहमदाबाद येथे झालेल्या पहिल्या ऐतिहासिक वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना येथील प्रांजल रुपाली सोमनाथ व्हन्ना हिने दोन सुवर्णपदकांना गवसणी घातली आहे. जगभरातील ७१ देशांच्या बलाढ्य खेळाडूंनी यात सहभाग घेतला होता.



ध्रुव ग्लोबल स्कूल संगमनेर (जि. अहमदनगर) येथे १० वीत शिकत असलेली प्रांजल ही मूळची सोलापूरची आहे. तिने वयाच्या पाचव्या वर्षापासूनच रिदमिक जिम्नॅस्टिक खेळायला सुरुवात केली. २०१६ ते २०२१ या काळात तिने पुणे येथे रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर पदके जिंकली.

तिच्या याच अफाट क्षमतेमुळे २०१८-१९ मध्ये महाराष्ट्र मंडळातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त तिची संपूर्ण महाराष्ट्रातून सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली होती. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी प्रांजलने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, खेलो इंडिया, राज्य आणि जिल्हा पातळीवर मिळून ४0 पेक्षा जास्त पदके (ज्यामध्ये बहुतांश सुवर्णपदके आहेत) जिंकण्याचा पराक्रम केला आहे. यापूर्वी तिचे प्राथमिक शिक्षण माऊंट कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल, लुल्लानगर, पुणे येथे झाले होते.

प्रांजलच्या या ऐतिहासिक यशाबद्दल तिचे प्रशिक्षक मंगेश खोपकर, ध्रुव ग्लोबल स्कूलचे संगमनेरचे चेअरमन डॉ. संजय मालपाणी यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अरण्येश्वर प्रभात शाखेत 'फुटबॉल' पर्व उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १३ जून-**

वेगवेगळ्या उपक्रमांची जणु प्रयोगशाळाच ठरलेल्या सहकारनगर भागातील अरण्येश्वर प्रभात शाखेचं मैदान शुक्रवारी उत्साहाने फुललं होतं. फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धाच्या निमित्ताने या शाखेत होणा-या 'फुटबॉल पर्वा'चा शुभारंभ झाला.

उद्घाटनाच्या प्रदर्शनीय सामन्यासाठी कार्यवाह संघ आणि मुख्यशिक्षक संघ सज्ज होते. निळे आणि पिवळे टी शर्ट घातलेले स्वयंसेवक मैदानात उतरण्यास आतूर होते. सर्व खेळाडू व्हेटरन गटातले म्हणजे ६५ वर्षांच्या पुढचे उत्साहाने सळसळणारे 'तरुण' होते.

या सराव पर्वाचं उद्घाटन पत्रकार, फुटबॉलचे माजी राष्ट्रीय खेळाडू आणि 'व्हिवा फुटबॉल' या मासिकाचे संपादक आशीष पेंडसे आणि ज्येष्ठ क्रीडा पत्रकार संजीव शाळगावकर यांच्या हस्ते झाले. आशीष पेंडसे यांनी प्रास्ताविक केले. श्री. शाळगावकर यांनी फुटबॉलमधील पदलालित्य आणि राजकारणातल्या लाथाळ्या यांच्यातील साधर्म्य शोधत गंमतीदार वात्रटिका सादर केली. प्रारंभी भगवान दातार यांनी पाहुण्यांचे स्वागत करतांना २०१० च्या जोहानसबर्ग इथल्या स्पर्धेच्या 'वाका वाका' या गाजलेल्या गीताचा उल्लेख केला. हा सराव १९ जुलै पर्यंत रोज चालणार असून २० जुलै रोजी या दोन्ही संघात अंतिम सामना होणार आहे. हा सराव सहकारनगर येथील अरण्येश्वर शाखेच्या मैदानावर रोज सकाळी ७.१५ ते ८.१५ या वेळात होईल. कार्यवाह नितीन करंबेळकर आणि मुख्यशिक्षक अमित आपटे यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी ४० दिवसांच्या या सरावाचे आव्हान स्वीकारले आहे. ज्यांना फुटबॉलमध्ये रस आहे त्या कोणालाही या महोत्सवात सहभागी होता येईल. अधिक माहितीसाठी भगवान दातार ९८८१०६५८९२ यांच्याशी संपर्क साधावा.





## श्रीराम इलेव्हन संघास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १३ जून-**

बचेरी (ता. माळशिरस) येथील श्रीराम इलेव्हन संघाने स्पार्क करंडक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. स्पार्क क्रिकेट ग्राउंड पुणेचे मालक योगेश तांबवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पुणे येथे पार पडली. कर्णधार जगदीश गोडसे, उपकर्णधार गणेश पाटील, गणेश देशमुख, सुहास चव्हाण, रोहित पाटील, अनिल यादव, समाधान कुंभार, रुषीकेश सावळजकर, रुत्वीक पाटील, वेदराज गोडसे, प्रशांत पाटील, अमर दडस आदी खेळांडुंनी आपल्या उत्कृष्ट कामगीरीच्या जोरावर विजय खेचून आणला. बचेरी सारख्या ग्रामीण भागातील संघाने पुणे येथे हा करंडक जिंकल्यामुळे गावगाड्यात संघाचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

# क्रिकेट स्पर्धा पत्रकारांना मानसिक, शारीरिकदृष्ट्या ऊर्जादायी : किरण साळी

### लोकनाथ मीडिया क्रिकेट चषक स्पर्धेस युवा सेना राज्य सचिवांची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून-**

पत्रकारितेच्या व्यवसायात निश्चित वेळ नसते. सततच्या धकाधकीत आरोग्याकडे दुर्लक्ष होते. अशा परिस्थितीत लोकनाथ मीडिया क्रिकेट चषक यासह फुटबॉल, हॉकीसारख्या स्पर्धांमुळे पत्रकारांना मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या ऊर्जा मिळते. त्यामुळे अशा स्पर्धा आरोग्य संवर्धनाचे प्रभावी माध्यम ठरतात. पत्रकारांसाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने व्हावे, असे प्रतिपादन युवा सेनेचे राज्य सचिव किरण साळी(पुणे) यांनी येथे केले.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील सेवालय फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे यांच्या सहकार्याने पत्रकार बांधवांसाठी १२ ते १४ जून या तीन दिवसात रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात लोकनाथ मीडिया चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेस सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मंचावर सेवालय फाऊंडेशनचे प्रमुख मनीष काळजे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, डिजिटल मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष विजयकुमार बाबर आदींसह मान्यवर उपस्थित होते. श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांच्या हस्ते साळी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी किरण साळी यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विविध लोकाभिमुख योजनांचा उल्लेख करत पत्रकारांसाठी राबविण्यात आलेल्या सुरक्षा आणि कल्याणकारी उपक्रमांची माहिती दिली. तसेच स्पर्धेचे संयोजन करणारे शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. आपण स्वतः पत्रकार कुटुंबातील असल्याचे सांगताना त्यांनी भावनिक आठवणींना उजाळा दिला. माझे वडील आणि आजोबा पत्रकार होते. पत्रकारांच्या आयुष्यातील धावपळ, तणाव आणि जबाबदाऱ्या मी जवळून पाहिल्या आहेत. त्यामुळे पत्रकारांसाठी आयोजित होणाऱ्या क्रीडा स्पर्धांचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो, असे ते म्हणाले.

सूत्रसंचालन शंकर पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन आप्पासाहेब पाटील यांनी केले. सोलापुरात होत असलेल्या लोकनाथ मीडिया स्पर्धेत लोकमत, संचार, दिव्य मराठी, सकाळ, तरुण भारत संवाद, डिजिटल मीडिया, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघ, मेट्रो सोलापूर या संघांनी सहभाग नोंदविला.

यावेळी मैदानावर विविध वृत्तवाहिनी वृत्तपत्रांचे पत्रकार व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**स्पर्धेचा आज अंतिम सामना**

रेल्वे मैदानावर रविवार १४ जून रोजी दुपारी ३ वाजता लोकनाथ मीडिया चषक क्रिकेट स्पर्धेतील उपांत्य सामने लोकमत विरुद्ध डिजिटल मिडिया आणि तरुण भारत संवाद विरुद्ध राज्य मराठी पत्रकार संघ यांच्यात होणार आहेत. त्यानंतर अंतिम सामना होणार आहे. याच ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

## साऊथ सोलापूर ब्ल्यू संघ अंतिम फेरीत

### विजय चषक क्रिकेट : सोलापूर स्पोर्ट्सला नमवले; अजय कोळी सामनावीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून-**

विजय चषक क्रिकेट स्पर्धेत अजय कोळीच्या अष्टपैलू कामगिरीच्या आणि आदर्श व स्वप्नीलच्या अर्धशतकांच्या जोरावर साऊथ सोलापूर ब्लू संघाने सोलापूर स्पोर्टस इन्स्टिट्यूट ब संघाचा ९५ धावांनी पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.



येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम वर झालेल्या या सामन्यात साऊथ सोलापूर ब्लू संघाने प्रथम फलंदाजी करताना ३८.१ षटकांत सर्वबाद २१० धावांचे आव्हान उभे केले होते. यामध्ये आदर्श राठोडने ६७ चेंडूत ६२ धावांची, तर स्वप्नील हंचाटेने ५८ चेंडूत ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली. सोलापूर स्पोर्ट्सकडून गोलंदाजी करताना निखिल दोरनालने घातक मारा करत ७.१ षटकांत ३६ धावा देऊन तब्बल ७ बळी मिळवले.

२११ धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना सोलापूर स्पोर्ट्सचा संघ अवघ्या २५ षटकांत ११५ धावांवर सर्वबाद झाला. सोलापूर स्पोर्ट्सकडून निखिल दोरनालने फलंदाजीतही ४४ चेंडूत ४९ धावांची झुंजार खेळी केली, मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. साऊथ सोलापूर ब्लूचा गोलंदाज अजय कोळीने ६ षटकांत २५ धावा देत ४ महत्त्वाचे बळी घेत सामन्याचा नूर बदलला. निखिल दोरनालच्या अष्टपैलू कामगिरीवर अजय कोळीची कामगिरी भारी पडल्याने, साऊथ सोलापूर ब्लू संघाला मोठा विजय मिळवून देणाऱ्या अजय कोळीला गुणांसह सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दोन कारची समोरासमोर धडक; एकाचा जागीच मृत्यू

▶▶ पाच जण किरकोळ जखमी

▶▶ मृतामध्ये कुर्डुवाडी बँक इन्स्पेक्टर बाबरचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. १३ जून-**

क्रेटा व आय टेन कारच्या झालेल्या समोरा समोर धडकेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तालुका सिनियर बँक इन्सपेक्टर अनिल कोंडीबा बाबर वय ५८ यांचा जागेवरच मृत्यू झाला. तर क्रेटा गाडीतील पाच जण किरकोळ जखमी ही घटना दि.१३ रोजी दु. ३ वा. सुमारास कुर्डुवाडी - टेंभुर्णी रस्त्यावर कुर्डू ता.माढा शिवारात माळी पाटीजवळ घडली.



जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कुर्डुवाडी शाखेतील कामकाज पूर्ण करुन तालुका सिनियर बँक इन्सपेक्टर अनिल कोंडीबा बाबर हे आपली आय १० कार गाडीने ( एम एच ४५ एन ४०६७ ) टेंभुर्णीच्या दिशेने जात असताना अकलूजहून नातेवाईकांना भेटून डोमगाव ता. परांड्याकडे जाणाऱ्या चारचाकी क्रेटा कारगाडी( एम एच ४५ बीडी ७००८) ची कुर्डू ता.माढा शिवारात माळी पाटीजवळ समोरासमोर जोराची धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की आय १० मधील तालुका सिनियर बँक इन्सपेक्टर अनिल कोंडीबा बाबर हे जागीच ठार झाले. तर क्रेटा गाडीतील निशा अनिल गायकवाड ३५,सांची कुमार गायकवाड १२, पल्लवी कुमार गायकवाड ३५, आरोही अनिल गायकवाड सर्व रा. डोमगाव ता.परंडा व विकास महेश शिंदे ३१ रा.अकलूज ता.माळशिरस हे पाच जण किरकोळ जखमी झाले आहेत.

जखमींवर कुर्डुवाडी येथील खासगी दवाखान्यात उपचार सुरु आहेत. याबाबत विकी जितेंद्र गायकवाड रा.अकलूज याने कुर्डुवाडी पोलिसांत खबर दिली असून पुढील तपास पो.ह.अमर लिमकर हे करीत आहेत.

# म्हशीच्या दुधात जर्शी गायीचे दूध; भेसळ करण्याचे प्रमाण वाढले

## अन्न भेसळ प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दिनांक १३ जून-**

शहर व ग्रामीण भागात म्हशीच्या दुधात जर्शी गायीचे दूध भेसळ करुन दूध डेअऱ्यामधून त्याची विक्री करीत ग्राहकांच्या माथी मोठ्या प्रमाणात मारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. या भागात मोठ्या संख्येने दुध डेअऱ्या असून या डेअरीमध्ये पशू पालकाकडून येथे दुध घातले जाते. म्हशीच्या दुधाचा दर जास्त असून जर्शी गायीच्या दुधाचा दर कमी असल्यामुळे म्हशीच्या दुधाचा दर गायीच्या दुधाला मिळावा यासाठी चक्क जर्शी गायीचे दुध भेसळ करुन ते ग्राहकांच्या माथी मारले जात असल्याचा प्रकार दिसून येत आहे.

जर्शी गायीचे दुध हे पिवळसर रंगाचे तर म्हशीचे दुध पांढरे शुभ्र असते. ग्राहकांनी डेअरीमधून नेलेले दुध तापविल्यानंतर ते पिवळसर रंगाचे भेसळयुक्त असल्याचे गृहिणींना निदर्शनास येत असून त्याची चवही वेगळीच लागत असल्याच्या तक्रारी आहेत. मध्यंतरी बोराळे येथे दुधात भेसळ होत असल्याचा प्रकार वरिष्ठांच्या कानावर गेल्यानंतर तेथील पथकाने सदर डेअरीवर धाड टाकून कारवाई केली होती. त्यानंतर जिल्ह्याच्या अन्नभेसळ पथकाने अद्यापही कोणतीच कारवाई न केल्याने भेसळ करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्याचे चित्र आहे.

मोठमोठ्या डेअऱ्यामधूनही भेसळ होत असल्याच्या तक्रारीचा सूर निघत असल्याने अन्न भेसळचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मंगळवेढ्यात अचानक पथके पाठवून शहरातील व ग्रामीण भागातील डेअरीमधील दुधांची तपासणी करुन संबंधीतावर कारवाई करावी अशी मागणी नागरिक व ग्राहकांमधून होत आहे.



पांढरे शुभ्र दिसणारे म्हशीचे दूध



दूध डेअरीमधून आणलेले पिवळसर भेसळयुक्त दूध

# आ. रोहित पवारांची तब्येत ठीक; ज्युस, पाणी घेण्याचा सल्ला

## अन्नत्याग आंदोलनाचा दुसरा दिवस, सत्ताधाऱ्यांकडून उपोषणाची खिल्ली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ जून -**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी या तसेच अन्य मागण्यांसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस ( शरद पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार हे शुक्रवार (ता.१२) पासून अन्नत्याग आंदोलनास बसले आहेत. त्यांच्या आंदोलनाचा आज दुसरा दिवस असून त्यांची तब्येत ठिक आहे. मात्र येथील वैद्यकीय अधिक्षकांनी रोहित पवार यांची तपासणी करुन ज्युस व पाणी घेण्याचा सल्ला दिला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार पवार हे सरसकट कर्जमाफीसाठी आग्रही भूमिका घेऊन आंदोलनास बसले आहेत. वास्तविक तीर्थक्षेत्र पंढरपूरात सध्या अधिक मास सुरु आहे. शेवटचे दोन ते चार दिवस राहिले असून भाविकांची मोठी गर्दी येथे होवू लागलेली आहे. दर तीन वर्षातून एकदा हा महिना येत असल्यामुळे सहाजिक भाविकांची विठ्ठल रखुमाईच्या दर्शनासाठी गर्दी होताना दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाकडून आमदार पवार यांना आंदोलन करु नये अशी विनंती केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनीही भाविकांचे हाल होवू नयेत यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकाऐवजी अन्य जागेवर उपोषण करावे अशी सूचना त्यांना केली होती. मात्र प्रशासनाला न जुमानता त्यांनी आपले आंदोलन सुरु केले आहे.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी सकाळपासून चौकात गर्दी वाढत आहे. दुसरीकडे सत्ताधारी मंडळींकडून रोहित पवार यांच्या आंदोलनाची खिल्ली उडविली जात आहे. एवढाच त्यांना शेतकऱ्यांचा कळवळा असेल तर शेतकऱ्यांच्या मालकीचे ढापलेले कारखाने पुन्हा शेतकऱ्यांच्या ताब्यात देण्यासाठी आंदोलन करावे अशी खरमरीत टिका शेतकरी नेते सदाभाऊ खोत यांनी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी रोहित पवार यांच्या बाजूला कडकोट पोलिस बंदोबस्त लावून त्यांना अन्नपाण्याचा कण देखील देवू नये म्हणजे शेतकऱ्यांसाठीचे आंदोलन म्हणजे काय असते हे त्यांना समजेल असे टिकास्त्रही खोत यांनी सोडले आहे.

आंदोलनस्थळावर येथील प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, तहसीलदार सचिनलंगोटे हे आमदार पाटील यांच्याशी संपर्क साधुन आहेत. त्यांच्यामागण्या वरिष्ठ पातळीवर मंत्रीमहोदयां पर्यंत पोहचिवण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु आहे. कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्याशी देखील आमदार पवार यांच्याशी त्यांनीसंपर्क साधुन चर्चा घडवून आणली आहे. मात्र शासनाकडून अद्यापहीतोडगा निघत नसल्याचे दिसून येत आहे.

### राज्य सरकारकडून आंदोलनाची दखल

पंढरपुरातील अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या मागण्यांची राज्य सरकारने दखल घेतल्याचे संकेत कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी दिले आहेत. रोहित पवार यांच्याशी दोन वेळा फोनवरुन चर्चा झाल्याचे सांगत भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही याबाबत चर्चा झाल्याची माहिती दिली. रोहित पवार यांच्या कर्जमाफीसंदर्भातील मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी मंगळवारी बैठक बोलावण्यात आली असून त्यातून सकारात्मक मार्ग निघेल, असा विश्वासही ना.दत्ता भरणे यांनी व्यक्त केला.



माझ्या मुलाला मी शेतकऱ्यांच्या पदरात टाकले आहे. शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी तो लढत आहे. शासनाने त्यांच्याउपोषणाची दखल गांभिर्याने घ्यावी. त्यांच्या आंदोलनाला आपला देखील पाठिंबा आहे.

- राजेंद्र पवार
(आ.रोहित पवार यांचे वडील)

पवार कुटुंब चक्क शेतकऱ्यांसाठी उपोषण करीत आहे. त्यामुळे राज्य शासनाने दहा ते बारा दिवस या आंदोलनाकडे लक्ष देवू नये.आत्ता पर्यंत पवार परिवारांनी शेतकऱ्यांची लईच लूट केलेली आहे.आमदार पवार हे शेतकऱ्यांसाठी उपोषण करीत असतील तर ते चांगलेच आहे.या उपोषणाकडे शासनाने लक्ष देवू नये. उपोषण कायअसते हे एकदा त्यांना माहिती होवू द्या.

**- लक्ष्मण हाके (ओबीसी नेते)**

विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वरमहाराज जळगावकर यांनी उपोषणस्थळी येवून आमदार रोहित पवार यांची भेट घेतली. त्यावेळी आमदार रोहित पवार यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी जळगावकर यांनी आपले आणि आमदार पवार यांचे वैयक्तीक संबंध असल्याने त्यांच्यातब्येतीची विचारपूस करण्यासाठी आलो.

**ज्ञानेश्वर महाराज जळगावकर (मंदिर समितीचे विद्यमान सदस्य)**

# केंद्रप्रमुख भरतीसाठी पात्र-अपात्र यादी जाहीर; हरकतींसाठी आजची मुदत

## सोलापूर जिल्ह्यातील उमेदवारांची कागदपत्र पडताळणी पूर्ण; १५ जूनला समुपदेशन प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून -**

केंद्रप्रमुख (समूह साधन केंद्र समन्वयक) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२५ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीनंतरची तात्पुरती पात्र व अपात्र यादी जिल्हा परिषदेने प्रसिद्ध केली आहे. या यादीवर उमेदवारांना १४ जून रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत हरकती व आक्षेप नोंदविण्याची संधी देण्यात आली असून, त्यानंतर अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार केंद्रप्रमुख पदांसाठी जाहिरातीत नमूद पदसंख्येच्या अडीचपट उमेदवारांची निवड करून त्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. यासाठी ९ जून रोजी सोलापूर येथील जवाहरलाल नेहरू मुलांचे वसतिगृह येथे विशेष पडताळणी मोहीम राबविण्यात आली.

मराठी माध्यमासाठी ९२ पदांच्या तुलनेत २३० उमेदवारांना पडताळणीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यापैकी १८६ उमेदवार उपस्थित राहिले. दिव्यांग प्रवर्गासाठी चार पदांच्या तुलनेत १० उमेदवारांना संधी देण्यात आली होती. तसेच उर्दू माध्यमासाठी शासन निर्णयानुसार तीन पदे निश्चित करण्यात आली असून त्यासाठी गुणवत्ता यादीतील पात्र उमेदवारांची स्वतंत्र पडताळणी करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, ही पात्र-अपात्र यादी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विविध याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित उमेदवारांनी आपल्या नावाबाबत काही आक्षेप किंवा हरकत असल्यास ती निर्धारित मुदतीत ई-मेलद्वारे सादर करणे आवश्यक आहे. अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या हरकती स्वीकारल्या जाणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा परिषदेच्या वेळापत्रकानुसार १३ जून रोजी तात्पुरती यादी प्रसिद्ध करण्यात येणार आली असून, १४ जूनपर्यंत हरकती स्वीकारल्या जातील. त्याच दिवशी अंतिम यादी जाहीर केली जाणार आहे. तर १५ जून रोजी दुपारी ४ वाजता जिल्हा परिषद सोलापूरच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पात्र उमेदवारांचे समुपदेशन होणार आहे.

केंद्रप्रमुख पदाच्या प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांसाठी ही प्रक्रिया निर्णायक ठरणार असून, अंतिम निवडीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भेसळयुक्त खतांची विक्री केल्याप्रकरणी दोघा विरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १३ जून-**

पाठखळ येथे एका कृषी केंद्र दुकानातून १० लाख ४६ हजार ७८० रुपयाची भेसळयुक्त रासानिक खते शेतकऱ्यांना विक्री करुन शेतकऱ्यांची व शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी सतिश मनोहर भोसले (रा.पाठखळ),रविराज शंकर कणसे (रा.सातारा) या दोघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,पाठखळ येथील मे.प्रहार उद्योग समुह व कृषी केंद्र दुकान व गोडाऊन येथे जिल्हा कृषी अधिकारी व मंगळवेढ्यातील कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारीवरुन सदर ठिकाणी छापा टाकला होता. यावेळी सदर दुकानदाराने खत म्हणून मिठाची विक्री केल्याचे निदर्शनास आले होते. याबाबत हरिदास बोंगे यांनी फिर्याद दिली असून दि.८ जून रोजी सायंकाळी ७ च्या पुर्वी वरील आरोपींनी बेकायदेशीर भेसळयुक्त रासायनिक खतांचा साठा करुन त्याची विक्री केली आहे. सदर विक्रीबाबतची बिले सादर करण्यास सांगीतले असता त्यांनी असमर्थता दर्शवून बिले सादर केली नाहीत. याचे उल्लंघन करुन १० लाख ४६ हजार ७८० रुपयाची भेसळयुक्त रासानिक खते तयार करुन शासनाची व शेतकऱ्यांची दिशाभूल करुन फसवणूक केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे करीत आहेत.

# भररस्त्यात महिलेच्या गळ्यातील २ तोळे सोन्याचे गंठण लंपास

## महिलेच्या गळ्याला किरकोळ दुखापत

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १३ जून -**

शहरात भररस्त्यात महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना पुन्हा एकदा समोर येऊ लागल्या असून, ऐनापुर मारुती मंदिर परिसरात एका महिलेच्या गळ्यातील ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार १२ जून रोजी फिर्यादी महिला आपल्या आई व मुलीसह घरगुती साहित्य खरेदीसाठी पायी जात असताना ही घटना घडली. संध्याकाळी ७.३४ च्या सुमारास त्या ऐनापुर मारुती मंदिर परिसरात पोहोचल्या असता, मागून दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण जोरात हिसकावून घेतले आणि क्षणार्धात घटनास्थळावरुन पसार झाले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला घाबरून गेल्या असून त्यांनी आरडाओरडा केला. या झटापटीत त्यांच्या गळ्याला किरकोळ दुखापतही झाली. घटनेनंतर परिसरात आणि रस्त्याच्या बाजूला शोधाशोध करण्यात आली, मात्र चोरीस गेलेले दागिने अथवा आरोपींबाबत कोणतीही माहिती मिळू शकली नाही. चोरीस गेलेल्या दागिन्यामध्ये अंदाजे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण असल्याचे फिर्यादीच्या तक्रारीत नमूद आहे.

बार्शी शहर पोलिसांनी अज्ञात दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, तसेच आरोपींचा शोध सुरु आहे. शहरात वाढत्या साखळी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी कारवाई करून आरोपींना तातडीने जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सांगोल्यातील ५८२ बाधित लाभार्थ्यांना २३ लाखांचे अनुदान मंजूर

## आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ जून-**

गतवर्षी सांगोला तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. बहुतांश गावांमध्ये राहत्या घरांवरील पत्रे उडून गेली, घरांच्या भिंती कोसळल्या तसेच अनेक कुटुंबांना उघड्यावर राहण्याची वेळ आली होती. या नैसर्गिक आपत्तीनंतर बाधित नागरिकांना शासनाची मदत मिळावी यासाठी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरिष महाजन यांच्याकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे.

शासनाच्या नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगोला तालुक्यातील ७५ गावांतील ५८२ पात्र लाभार्थ्यांना एकूण २३ लाख १६ हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर ही मदत संबंधित बाधित खातेदारांच्या बँक खात्यावर लवकरच जमा होणार असल्याची माहिती तहसीलदार बाळुताई भागवत यांनी दिली.

सदरचे अनुदान मंजूर केल्याबद्दल आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरिष महाजन यांचे आभार मानले.

बाधित नागरिकांना न्याय मिळावा आणि नुकसानभरपाई लवकर मिळावी यासाठी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी महसूल विभाग तसेच शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न करून विषय मार्गी लावण्याचे काम केले. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून पात्र लाभार्थ्यांना मदत मिळवून देण्यावर त्यांनी भर दिला होता.






# आज जागतिक रक्तदान दिन

# मानवी रक्ताला नाही कृत्रिम पर्याय

▶▶ दरवर्षी ३५० ते ४०० रक्तदान शिबीरे

▶▶ ३० ते ३५ हजार पिशव्या रक्तसंकलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश देत दरवर्षी १४ जून हा दिवस जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. सोलापूर शहर-जिल्ह्यात दरवर्षी ३५० ते ४०० रक्तदान शिबीरे होतात. याद्वारे सुमारे ३० ते ३५ हजार पिशव्यांचे रक्तसंकलन होते. मानवी रक्ताला कृत्रिम पर्याय अजिबात नाही. अपघातातील जखमी, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, गर्भवती माता आणि थॅलेसेमियासारख्या आजारांशी लढणाऱ्या बालकांसाठी रक्तदात्यांनी दिलेले रक्तच जीवनदायी ठरते, असे सांगण्यात येते.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात १२ ते १५ प्रमुख अधिकृत रक्तपेढ्या कार्यरत आहेत. यामध्ये सिव्हील हॉस्पीटल अर्थात शासकीय छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील रक्तपेढी, दमाणी रक्तपेढी, डॉ.हेडगेवार रक्तपेढी, सिध्देश्वर रक्तपेढी, इरपप्णा बोल्ली रक्तपेढी, अश्विनी आदी रक्तपेढ्यांचा समावेश आहे.



ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय रक्तपेढी

या रक्तपेढ्यांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यासह कर्नाटक, तेलंगणा आदी राज्यातील रुग्णांना रक्तपुरवठा केली जाते.

मानवी रक्ताचे प्रामुख्याने ४ मुख्य गट पडतात. आरएच फॅक्टरनुसार त्यांचे ८ उपप्रकारांत वर्गीकरण होते. ते याप्रमाणे; ए ग्रुप : पॉझिटिव्ह (+) आणि निगेटिव्ह (-) बी ग्रुप : पॉझिटिव्ह (+) आणि निगेटिव्ह (-) एबी ग्रुप : पॉझिटिव्ह (+) आणि निगेटिव्ह (-) ओ ग्रुप : पॉझिटिव्ह (+) आणि निगेटिव्ह (-). निगेटिव्ह (-) हा सर्वयोग्य दाता मानला जातो. पॉझिटिव्ह (+) या गटाचा रुग्ण कोणत्याही गटाचे रक्त स्वीकारु शकतो.

दरवर्षी एप्रिल ते जून या महिन्यात म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसात रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवतो. याकाळात रक्तदानातील विद्यार्थ्यांचा अभाव, उन्हाळी सुट्ट्यांमुळे नागरिकांचे सहकुटुंब गावी किंवा पर्यटनसाठी जाणे, कडक उन्हाळ्यामुळे नागरिकांमध्ये डिहायड्रेशन किंवा अशक्तपणा जाणवणे यांसह अन्य काही कारणांमुळे उन्हाळ्याच्या काळात रक्तदान शिबीरे म्हणावी तशी घेतली जात नाहीत. दरम्यान, सणासुदीच्या दिवसातही रक्तदान शिबीरे भरविली जात नाहीत, असेही सांगण्यात येते.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT





## अल्पवयीन मुलीच्या अपहरणाला धक्कादायक वळण; आईवडिलांनी लावले 'त्या' मुलीच्या इच्छेविरुध्द लग्न

- तब्बल १६ नातेवाईकांवर गुन्हा दाखल
- यातील ३ आरोपींना करण्यात आली अटक
- 'त्या' पिडीतेचे एका तरुणावर होते प्रेम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ जून-**

एका पित्याने आपल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार नोंदवली होती. मात्र, पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवताच या प्रकरणाला पूर्णपणे वेगळे आणि धक्कादायक वळण मिळाले आहे. 'त्या' मुलीच्या आई-वडिलांसह नातेवाइकांनी तिचा छळ करुन तिचा जबरदस्तीने बालविवाह लावल्याचे आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेने नातेसंबंध आणि माणुसकीला काळीमा फासली गेली असल्याची चर्चा होत आहे. याप्रकरणी पीडितेच्या आई-वडिलांसह एकूण १६ नातेवाईकांवर 'पोक्सो' आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल तर यातील ३ मुख्य आरोपींना अटक करण्यात आली.

याबाबतचे वृत्त असे की, दि.१० जून २०२६ रोजी बार्शी तालुक्यातील एका रहिवाशाने पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती की, त्याची १६ वर्षीय मुलगी मामाच्या गावी उन्हाळ्याच्या सुट्टीत गेली असता, एका काळ्या रंगाच्या 'थार' जीपमधून आलेल्या अज्ञात इसमाने आमिष दाखवून तिचे अपहरण केले. यावरुन पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम १३७ (२) अन्वये गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपास करत पीडित मुलीला शोधून काढले. दि.११ जून २०२६ रोजी पीडित मुलगी पोलिसांसमोर हजर झाली. महिला पोलिस अधिकाऱ्यांसमोर तिने दिलेल्या कायदेशीर जबाबाने पोलिसांनाही धक्का बसला.

पीडितेचे गावातील एका तरुणावर प्रेम होते, ज्याला तिच्या घरच्यांचा तीव्र विरोध होता. पीडितेचे वय कमी असताना आणि तिला पुढे शिकायचे असतानाही, तिच्या आई-वडिलांनी तिच्या इच्छेविरुध्द नात्यातील एका तरुणाशी तिचा विवाह ठरवला.

दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी नातेवाइकांच्या घरी पीडितेचा साखरपुडा आयोजित करण्यात आला होता. पीडितेने लग्नाला विरोध केला असता, तिला फसवून 'फक्त साखरपुडा करत आहोत' असे सांगण्यात आले, मात्र प्रत्यक्षात त्याच दिवशी तिचा जबरदस्तीने बालविवाह लावून देण्यात आला. पीडितेला कथित पतीसोबत राहण्यास भाग पाडण्यात आले, जिथे तिच्या इच्छेविरुध्द वारंवार शारीरिक संबंध ठेवून लैंगिक अत्याचार करण्यात आला.

पीडितेने या छळाबाबत आपल्या आई-वडील आणि सासरच्या लोकांना सांगितले, परंतु त्यांनी तिच्या तक्रारीची दखल न घेता तिलाच गप्प राहण्यास सांगितले. या रोजच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून पीडितेने तिच्या एका मित्राला मदतीसाठी फोन केला. तो मित्र काळ्या रंगाच्या थार गाडीतून आला आणि पीडिता स्वतःच्या मर्जीने सासरहून निघून गेली.

पीडित मुलगी अल्पवयीन असून तिचा बालविवाह लावल्यामुळे आणि लैंगिक छळ केल्यामुळे 'पोक्सो' आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

### मित्र, वडील, सासरा यांना अटक

पीडितेला वाहनातून घेऊन जाणारा तिचा मित्र, तिचे कायदेशीर वडील आणि सासरा या तीन मुख्य आरोपींना पोलिसांनी दि.१२ जून २०२६ रोजी पहाटे अटक केली. दरम्यान, तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सी.जी. घोळवे यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, 'फरार असलेला कथित पती आणि बेकायदेशीर बालविवाह लावून देणारा पुरोहित यांचा शोध घेणे, गुन्ह्यात वापरलेली थार गाडी जप्त करण्यासाठी आरोपींची कोठडी मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार न्यायालयाने ही मागणी मान्य करत त्या ३ आरोपींना दि.१५ जून २०२६ पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.




## 'प्राध्यापक भरती'त आर्थिक व्यवहाराचा वास?

### संस्थाऐवजी राज्य वा केंद्रीय पध्दतीने भरती करावी

### -मागासवर्गीय प्राध्यापक संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये संस्था स्तरावर प्राध्यापकांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र यात आर्थिक व्यवहाराचा वास येत आहे, असा आरोप करत ही भरती प्रक्रिया संस्थाऐवजी राज्य वा केंद्रीय पध्दतीने करण्यात यावी, अशी मागणी मागासवर्गीय प्राध्यापक संघटनेने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली.

महाविद्यालयांतील प्राध्यापक भरतीचे अधिकार संस्थास्तरावर असल्याने, गुणवत्तेपेक्षा आर्थिक व्यवहारांना प्राधान्य दिले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात डोनेशन घेतले जात असल्याने पात्र व गुणवत्ताधारक उमेदवारांवर मोठा अन्याय होत आहे. नव्या पिढीला घडविणाऱ्या प्राध्यापकांची निवड ही केवळ गुणवत्ता आणि पात्रतेच्या निकषांवरच होणे आवश्यक आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे.

संघटनेचे अध्यक्ष प्रा.डॉ. सिध्दाराम सलवदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाद्वारे हे निवेदन देण्यात आले. यात डॉ.मनोज कसबे, प्रा.परमेश्वर हटकर, प्राचार्य डॉ.दिगंबर झोंबाडे, डॉ.रेखा ओहोळ, डॉ.अरुण सोनकांबळे, डॉ.संजय गायकवाड, डॉ.अभिमन्यू ओहोळ, डॉ.पंडित बन्ने, डॉ.बालाजी गंगावणे, डॉ.परमेश्वर हाटकर, डॉ.बापू राऊत, डॉ. दीपक देडे, डॉ.वैभव गायकवाड, डॉ.नागेश गायकवाड, प्रा.राजेश काळे, प्रा.आर.पी. उंब्रजकर आदींचा समावेश होता.

### सकारात्मक भूमिका

कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर, कुलसचिव डॉ.लक्ष्मीकांत दामा यांच्यासह विद्यापीठाच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी मागासवर्गीय विद्यार्थी व प्राध्यापकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका घेण्यात येणार असल्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

## शाळा प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयाची पाहणी

### उपमहापौर देवकर यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

शाळांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याने जन्म प्रमाणपत्रासाठी नागरिकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी महापालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयाची पाहणी करत तेथील कामकाजाचा आढावा घेतला. नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध व्हावीत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जून महिन्यात शाळा सुरु होत असल्याने जन्म प्रमाणपत्रासाठी पालक आणि नागरिक जन्म-मृत्यू कार्यालयात मोठ्या संख्येने येत असतात. या पार्श्वभूमीवर कार्यालयातील सेवा, कर्मचारी व्यवस्था आणि नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधा यांसह कार्यालयातील अडचणी जाणून घेतल्या. यावेळी नगरसेवक किसन जाधव, नगरसेवक मेहत्रे, भाजपाचे मंडल अध्यक्ष महेश देवकर, शिवराज गायकवाड उपस्थित होते.



सोलापूर : इयत्ता ११ वी प्रवेशाच्या अनुषंगाने शनिवार, दि.१३ जून २०२६ रोजी तिसरी यादी जाहीर झाली. वालचंद महाविद्यालयातील यादी पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अशी गर्दी केली होती.

## संकेत पवार यांचे एमबीबीएस परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**



येथील संकेत सदाशिव पवार यांनी एमबीबीएस परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेडच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव पवार यांचे चिरंजीव असलेले संकेत पवार यांनी वैद्यकीय क्षेत्राद्वारे समाजासाठी योगदान द्यावे, असे प्रशांत पाटील यांनी सांगितले. जिद्द, प्रयत्न, अभ्यासातलं सातत्य यामुळे हे यश संपादन करता आले. एमबीबीएसनंतर पुढे शिक्षण चालू ठेवण्याचा मानस आहे, असे संकेत पवार यांनी सांगितले. यावेळी सूर्यकांत पाटील, संभाजी भोसले, प्रकाश ननवरे उपस्थित होते.

## ...अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयाला कुलुप ठोकू

### 'मंद्रुप'च्या नागरिकांनी दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१३ जून-**

वारंवार ग्रामपंचायतीला निवेदन देऊन व पाठपुरावा करूनही मंद्रूपच्या नागरिकांच्या समस्या सुटण्याऐवजी त्यामध्ये भरच पडत असल्यामुळे अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने हलगी आंदोलन करण्यात आले. यावेळी हद्दवाढ भागातील विविध समस्या सोडवण्यासाठी सरपंच अनिता कोरे व उपसरपंच भगवान व्हनमाने यांना निवेदन देण्यात आले. येत्या चार दिवसात समस्या न सुटल्यास मंद्रूपच्या ग्रामपंचायत कार्यालयाला कुलुप ठोकण्याचा इशारा अखिल भारतीय किसान सभेने दिला आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुपमधील बंद पाणीपुरवठा, पावसाळ्यातील चिखलमय रस्ते, गावातील अस्वच्छता, आठवडा बाजारातील गैरसोय, विविध वित्त आयोगातील निधी खर्च व कर वसूली चौकशी, बंद दिवाबत्ती यांसह विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेने हलगी बजाओ आंदोलन करण्यात आले. दरम्यान, येत्या चार दिवसात समस्या सोडवू, असे लेखी आश्वासन सरपंच अनिता कोरे व उपसरपंच भगवान व्हनमाने यांनी दिल्याने आजचे आंदोलन मागे घेण्यात आले.

अखिल भारतीय किसान सभेचे तालुकाध्यक्ष जावेद आवटे याबाबत बोलताना सांगितले की, मंद्रुपमधील विविध समस्यांबाबत आजरोजी आंदोलन करण्यात आले. सरपंच व उपसरपंच यांनी चार दिवसात समस्या सोडवण्याचे लेखी पत्र दिले आहे. यावेळी भीमाशंकर झळके, सिकंदर मकानदार, मल्लिकार्जून कांबळे, हारुन मकानदार, यासीन मकानदार, पैगंबर नदाफ, मळिसध्द जाधव, राजकुमार कुमठेकर, फारुक शिकलगार, सद्दाम मकानदार, इक्बाल आवटे, मजम्मिल शेख, श्रीशैल मुंजे, षडाक्षरी स्वामी आदी उपस्थित होते.

## बुध्देहाळ तलावातून विद्युत मोटारींच्या केबलांची चोरी

### शेतकऱ्यांना बसला सुमारे ६ लाखांचा आर्थिक फटका

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१३ जून-**



सांगोला तालुक्यातील बुद्धेहाळ तलावातून चोपडी, सोमवाडी, बुद्धेहाळ या गावातील व परिसरातील शेतकरी शेतीसाठी उचल पाणी घेऊन शेती करीत आहेत. शुक्रवार दि.१२ जून रोजी रा.११ ते पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान बुद्धेहाळ तलावातून उचल पाणी घेणाऱ्या २५ ते ३० शेतकऱ्यांच्या सुमारे २ हजार ५०० मीटर लांबीच्या मोटारींच्या केबल तोडून चोरी करून त्या तलाव परिसरात जाळून त्यातील तांब्याची वायर काढून घेतली आहे. चोरट्यांनी धाडसी चोरी करीत शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटात टाकले आहे. या सर्व केबलची किंमत सुमारे ६ लाख रुपये इतकी आहे. तलाव परिसरात रात्रीच्या वेळी कोणी फिरकत नसल्याने याचाच फायदा घेऊन चोरट्यांनी ही चोरी केली आहे. याबाबत शेतकऱ्यांनी सांगोला व कोळा पोलीस स्टेशनला माहिती दिली असून पोलीसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली आहे. सध्या तांब्याच्या केबलचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने चोरट्यांनी केबल चोरून त्यातील तांब्याची वायर काढून सुमारे ६ लाख रुपये किमतीच्या केबलची चोरी केल्याने तलावातील उचल पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस प्रशासनाने या केबल चोरी करणाऱ्या चोरट्यांचा कसोशीने

## सत्ताधारी आणि विरोधकांमधील वादावादी; सभागृहातून चक्क रस्त्यावर आली

### नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके, नगरेसवक लक्ष्मण शिरसट यांच्यात तू तू मै मै

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ जून-**




पंढरपूर नगरपरिषदेत भाजपाची सत्ता आहे. मात्र नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके शिवसेना गटाच्या आहेत. यामुळे सभागृहामध्ये सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये खडाजंगी होत असते. मात्र आता सभागृहातील खडाजंगी चक्क रस्त्यावरदेखील होवू लागल्याचे चित्र नुकतेच समोर आले आहे. क्षुल्लक गोष्टीवरुन नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके व ज्येष्ठ नगरसेवक लक्ष्मण शिरसट यांच्यात भर रस्त्यात तू तू मै मै चा सिलसिला रंगल्याचे दिसून आले.

शहरातील प्रभाग क्रमांक ९ जूनीपेठ या ठिकाणी ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याचेकाम सुरु आहे. यावेळी नगरसेवक लक्ष्मण शिरसट (पापरकर) यांना पाईपलाईन करताना आणखी खोलीकरण्यात यावी अशी मागणी केली होती. मात्र याकडे नगरसेवक शिरसट यांनी दुर्लक्ष केलेम्हणून त्या भागातील काही नागरिकांनी नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके यांच्याशी संपर्क साधला.

दरम्यान, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नगराध्यक्षा भालके त्याकामाच्या ठिकाणी पोहचल्या. त्यावेळी त्या ठिकाणी नगरसेवक शिरसट यांचेदेखील कार्यकर्ते उपस्थित होते. त्यामुळे नगराध्यक्षा स्टंटबाजी करीत असल्याची शेरेबाजी शिरसट यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आल्याची तक्रार नगराध्यक्षा भालके यांनी केली. त्यावरुन वादास सुरुवात झाली. पाहता पाहता दोन्ही गटाचे कार्यकर्ते यांच्यामध्ये खडाजंगी सुरु झाली.

एवढ्यावरच हे प्रकरण थांबले नाही तर यामध्ये नगरसेवक लक्ष्मण शिरसट आणि नगराध्यक्षा भालके हे देखील हमरीतुमरीवर आले. परिसरातील काही ज्येष्ठ नागरिकांनी दोघांनाही शांत राहण्याची विनंती केली. मात्र दोन्ही गटाचे कार्यकर्ते वादावादीत माघार घेण्यास तयार नव्हते. नगरपरिषदेच्या सभागृहामध्ये नेहमीच दोन गटामध्ये खडाजंगी उडत असते. आतापर्यत ही खडाजंगी सभागृहापुरतेच सिमीत असावयाचे. मात्र आता रस्त्यावर देखील दोन्ही गटाचे कार्यकर्त्यांमध्ये खडाजंगी होताना दिसत असल्याबद्दल नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## ॲडव्होकसी बैठकीतून उमटला निर्धार; ऊसतोड महिला कामगारांच्या कल्याणासाठी दृढ संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**




ऊसतोड महिला कामगारांचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे कार्यरत असलेल्या ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य व कल्याणासाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने ॲडव्होकसी बैठकीचे आयोजन करण्यात आले. ऊसतोड महिला कामगारांना अद्ययावत आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा दृढ संकल्प व्यक्त करण्यात आला.

एन.एस.एल. साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून बैठकीचे उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा.डॉ.श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा.डॉ.एन.बी. तेली, मानव संसाधन विभागाचे वरिष्ठ अधिकारी देवाप्पा जोगरे, जी.एम.केनचे ॲडव्होकसी विभाग प्रमुख पारसनाथ जयस्वाल, डॉ.सावित्री घाटोळ, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, फिल्ड को-ऑर्डिनेटर शहाबुद्दीन शेख, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी उपस्थित होते.

डॉ.येळेगावकर म्हणाले की, एन.एस.एल. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसतोड महिला कामगारांसाठी प्रजनन आरोग्य, कुटुंब कल्याण सेवा, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांची कारणमीमांसा व प्रतिबंधात्मक उपाय, मासिक पाळी स्वच्छता आणि सॅनिटरी नॅपकिनच्या वापराविषयी जनजागृती केली जात आहे. तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रकल्प प्रभावीपणे कार्यरत आहे.

के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांनी 'ग्रो प्रकल्पा'च्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ऊसतोड महिला कामगारांपर्यंत प्रजनन आरोग्यविषयक सेवा घरपोच पोहोचविणे, अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांपासून त्यांना परावृत्त करणे आणि प्रभावी समुपदेशन करणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य प्रकल्पामार्फत होत आहे. या उपक्रमाच्या भविष्यातील वाटचालीसाठी एन.एस.एल. साखर कारखान्याकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी एफ.पी.ए.आय. मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ.कल्पना आपटे, ॲडिशनल डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू, डायरेक्टर ग्रो प्रोजेक्ट डॉ.निलेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. दिलीप पाटील, किस्किंदा चवरे आणि आकाश गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

या बैठकीस २५ वैद्यकीय अधिकारी, १५ एनएसएल साखर कारखान्याच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता. स्वागत शहाबुद्दीन शेख यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले. आभार प्रा.डॉ.एन.बी. तेली यांनी मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४७१

**आशाबध्द जन। काय जाणे नारायण।।**

काविळ झालेल्या व्यक्तीला सर्व कांही पिवळेच दिसते. त्याप्रमाणे माया, मोहाचे, ईर्षा, द्वेषाचे पांघरुन घेतलेल्या व्यक्तीला प्रत्येक ठिकाणी स्वार्थ, मीपणाच दिसत असतो. आशा, अपेक्षा करणारा माणूस मोह, स्वार्थाला सोबत घेऊन जगत असतो. आशा ठेवून केलेली भक्ती, पूजा-पाठ हे व्यावहारिक भक्तिला जन्म देतात. व्यावहारिक भक्ति आत्मबलास तडा देते. ज्या ठिकाणी आत्मबल शिल्लक राहात नाही, त्या ठिकाणी नि:स्वार्थ, आपुलकी, प्रेम याबाबी अगोदरच संपलेल्या असतात. याचाच अर्थ असा आहे की, ज्याच्याजवळ नि:स्वार्थ भाव नाही, आपुलकी, प्रेम नाही, त्या ठिकाणी नारायण/ भगवंताचे आगमन होत नाही. भगवंत हा केवळ मूर्तीत नसून तो सर्व जीवमात्रात आहे, असे संत म्हणतात. संतांचा हा प्राणीमात्रातील भगवंतही स्वार्थी लोकांच्या जवळ येत नाही. ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, स्वार्थ, लोभ, माया, मोहाला जन्म देणारी आशा बाळगणाऱ्याच्या जवळ हे जीवरुपी भगवंत जात नाहीत. हा नित्याचा अनुभव आहे. या जीवमात्रांना जाणायचे असेल तर आशारहितपणा जोपासायलाच हवा. आशा गेली म्हणजे नि:स्वार्थ प्रेमाची उत्पत्ती होते. ही उत्पत्ती भगवंताचा व स्वत:चा खरा परिचय करुन देते. आशा,अपेक्षेच्या जाळ्यात अडकलेल्या जीवाला नारायणाचा परिचय होत नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, **आशाबध्द जन। काय जाणे नारायण।।**



आशारहित कर्म करण्याची परिभाषा मानवाच्या मनाला सहज पटणे शक्य नाही. आशा न ठेवता कर्म करायचेच का? या प्रश्नापासून मानवाच्या विचाराची सुरुवात होते. आपला खरा परिचय करुन द्यायचा असेल, भगवंताची खरी प्रचिती घ्यायची असेल तर आशारहितच कर्म करायला हवे. आशारहितपणा हा आत्मज्ञानाच्या मार्गाचा आधारस्तंभ आहे. आत्मज्ञानाचा मार्ग हा सांगण्याचा विषय नसून तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहे. या विषयाचा अनुभव तेव्हाच येतो, जेव्हा जिज्ञासू आशारहित होऊन या मार्गाचा शोध घेऊ लागतो. जनसेवा तर दूरच गेली. पण माणूस साक्षात भगवंताची सेवाही आशेशिवाय करीत नाही. यात्रा, वारी, उपवास, व्रत आदीसुध्दा माणूस आशेपोटीच करतो. आपल्या मनात इच्छेला जम देऊनच माणूस भगवंत भक्तीकडे वळतो. मला:हे, हे प्राप्त झाले तर मी तुला :ते ते देईन, अशी भगवंतालाही माणूस आशा, लालूच दाखवितो. आपल्या आशा पूर्ण झाल्या नाहीत तर लागलीच भगवंत भक्तीला, उपवास व्रताला माणूस बगल देतो. दानपेटीत चार आण्याचे दान टाकणारा किंवा पाच-दहा रुपयाचे नारळ, फूल वाहणारा माणूस किती तरी पटीने भगवंताकडून प्राप्तीची आशा करतो. भक्ती, प्रेमात आशेला स्थान दिल्यास तो व्यवहार होतो, हे माणूस स्वार्थापोटी विसरुन जातो. व्यवहार म्हटला की, मोबदला आलाच, आणि जिथे मोबदल्याची अपेक्षा आली तिथे स्वार्थ हा असतोच. अर्थात, जिथे स्वार्थ आहे तिथे माया, मोह, अहंकार, काम, क्रोध, लोभ, मत्सर हे सर्व असतात. अशा नको त्यांची उपस्थिती आहे त्याला घालवण्याची कार्यवाही करते. अर्थात, माणसातील ममता, नि:स्वार्थता, भक्ती या सर्वांवर यांच्याकडून गंडांतर येते. म्हणजेच आपण कोण आहोत? आपण काय करायला हवे? या प्रश्नांची उत्तरे सापडणे कठीण होते. हे सर्व केवळ आशा, अपेक्षेमुळे घडते, हे लक्षात ठेवावे. अवास्तव आशा अपेक्षा हया आनंदलहरीतील मोठा अडसर असतात हेही याप्रसंगी लक्षात असू दयायला हवे. खरे म्हणजे चांगलेच वागायचे हे ठरवले तर चांगले वागणे किंवा अन्य काहीही अवघड नसते. सर्व काही आपल्यावर अवलंबून असते. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# शाळा प्रवेशोत्सव : ४३ वरिष्ठ अधिकारी जाणार शाळांमध्ये




### नवागत विद्यार्थ्यांचे होणार उत्साहात स्वागत; शैक्षणिक गुणवत्ता, सुविधा आणि प्रवेशवाढीवर विशेष भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात व्हावी आणि प्रत्येक बालक शाळेच्या मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे, यासाठी जिल्हा परिषद सोलापूरच्या प्राथमिक शिक्षण विभागाने व्यापक नियोजन केले आहे. 'शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७' अंतर्गत जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळांना भेट देण्यासाठी तब्बल ४३ वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, हे अधिकारी १५ जून रोजी प्रत्यक्ष शाळांमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश केवळ नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणे एवढाच मर्यादित नसून शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि अध्यापन प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा घेणे हाही आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने विविध विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या शाळांची जबाबदारी दिली आहे. यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, कृषी विकास अधिकारी, समाजकल्याण, उद्योग, जलसंधारण, पाणीपुरवठा, क्रीडा, महिला व बालविकास तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

शासनाच्या निर्देशानुसार शाळा प्रवेशोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता समाज आणि पालकांचा शिक्षणावरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी राबविला जात आहे. याच पार्श्वभूमीवर अधिकारी विद्यार्थ्यांशी संवाद साधतील, त्यांच्या अध्ययन क्षमतेचा आढावा घेतील आणि शिक्षकांना शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन करतील.

या भेटीदरम्यान शाळेतील पायाभूत सुविधांचीही तपासणी केली जाणार आहे. वर्गखोल्यांची स्थिती, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालयांची उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मूलभूत सुविधा, डिजिटल शिक्षण साधने तसेच शालेय परिसराची देखभाल याबाबत अधिकारी प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देखील दिल्या जाणार आहेत.

जिल्ह्यातील कणबस, तळहिप्परगा, होटगी, कोंडी, नान्नज, बोकडदरवाडी, शिवणी, कारंबा, डोणगाव, हळदुगे, नेवरे, तिर्थ, चिंचपूर, रामपूर, बाणेगाव, वडापूर, आहेरवाडी, पाथरी, वळसंग, तिहे, कासेगाव, तांदूळवाडी, लवंगी, एकरुख, उळे, मार्डी, हिरज, बेलाटी, होटगी स्टेशन, हगलूर, फताटेवाडी, नांदणी, बंकलगी, वडकबाळ, बोरामणी, सिंदखेड, अंत्रोळी, मार्कंडेय नगर, प्रतापनगर, तेलगाव आणि कवठे यांसारख्या शाळांमध्ये अधिकारी भेटी देणार आहेत.

प्राथमिक शिक्षण विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना भेटीनंतरचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अहवालाच्या आधारे शाळांमधील गरजा, समस्या आणि सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींचा आढावा घेऊन पुढील नियोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि पालकांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण करणे या दृष्टीने शाळा प्रवेशोत्सव महत्त्वाचा मानला जातो. यंदा जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी थेट शाळांमध्ये पोहोचणार असल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रवेशोत्सवासोबतच शैक्षणिक गुणवत्तेला नवी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**शाळा प्रवेशोत्सवाचा मुख्य उद्देश**

- इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत
- शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे
- पालकांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणेशैक्षणिक गुणवत्ता आणि शालेय सुविधांचा आढावा घेणे प्रशासन, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संवाद वाढविणे

यंदाच्या प्रवेशोत्सवात जिल्हा प्रशासनातील ४३ वरिष्ठ अधिकारी थेट शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार असल्याने हा उपक्रम केवळ स्वागत समारंभ न राहता शाळांच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेणारा उपक्रम ठरणार आहे.



## आमदारांचे विशेष जनसंपर्क अभियान अंतर्गत वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या विकासात्मक, जनकल्याणकारी व ऐतिहासिक कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी 'आमदारांचे विशेष जनसंपर्क अभियान' अंतर्गत शनिवारी हनुमान नगर येथे आ. विजय देशमुख यांच्या नेतृत्वाखाली वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी नगरसेविका पुनम काशिद, नगरसेवक अविनाश पाटील, नगरसेवक गौतम कसबे, माजी नगरसेवक प्रभाकर काशिद, प्रेमनाथ सलगर, शंकर भिसे, विठ्ठल नवगिरे, माऊली वाघचौरे, हरी नलवडे, पोपट पवार, अजय हूच्चे, किरण जगताप, तम्मा जडगे, मल्लिनाथ जाधव, बापू अपराध, संग्राम काशिद, युर्वराज दिंडोरे, सत्यम पोरे, सुनिल गायकवाड, बाळू शिंदे उपस्थित होते.

## आदिला नाला प्रश्नावर विधानसभा उपाध्यक्षांची प्रत्यक्ष पाहणी

### आचारसंहितेनंतर विधिमंडळात विषय मार्गी लावण्याचे अण्णासाहेब बनसोडे यांचे आश्वासन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

अदिला नदी (नाला) परिसरातील रेड व ब्ल्यू लाइनमुळे निर्माण झालेल्या नागरिकांच्या अडचणींची दखल घेत महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. आचारसंहितेनंतर हा विषय विधिमंडळात मांडून मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

अदिला नाल्यालगतच्या वसंत विहार, गायत्रीनगर, व्यंकटेश्वर सिटी, स्वराज्य विहार, गोकुळ विहार, समर्थ रेसिडेन्सी आणि वैष्णवी हाइट्स परिसरातील नागरिकांना रेड व ब्ल्यू लाइनमुळे विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. बांधकाम परवानग्या, मालमत्ता व्यवहार तसेच विकासकामांवर त्याचा परिणाम होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासन आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत सुमारे हजार ते बाराशे एकर क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या या प्रश्नाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नाल्याचे गाळ काढणे, खोलीकरण व रुंदीकरण झाल्यानंतर संबंधित विभागांकडून पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच अदिला नाल्याचे रेखांकन आणि व्याप्ती यासंदर्भातही महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी या प्रश्नाबाबत निवेदन सादर करून नागरिकांच्या अडचणींकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी ही पाहणी आयोजित करण्यात आली.

स्थळ पाहणीनंतर नागरिक, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांशी चर्चा करताना अण्णासाहेब बनसोडे म्हणाले, अदिला नाला परिसरातील नागरिकांच्या समस्या गांभीर्याने घेतल्या जातील. प्रत्यक्ष पाहणीचा अहवाल आणि संबंधित माहितीच्या आधारे हा विषय विधिमंडळात मांडून योग्य तो निर्णय होण्यासाठी प्रयत्न केले जातील.

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रेड-ब्ल्यू लाइनच्या प्रश्नावर सकारात्मक निर्णय होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली.

पाहणी दौऱ्यानंतर अदिला नाला संघर्ष समितीच्या वतीने अण्णासाहेब बनसोडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी आनंद चंदनशिवे, दशरथ कसबे, गणेश पुजारी, गौतम कसबे, योगी काटकर, तुकाराम गायकवाड यांच्यासह संघर्ष समितीचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार,
दि. १४ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, कृ. चर्तुदशी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- रोहिणी (२२.१४)
योग - धृती (१३.१५)
करण - चतुष्पाद (२२.२३)
राहू काल : रविवार
सायं. ०४.३० ते ०६.००

दिनविशेष : * जागतिक रक्तदान दिन.
१४४४:प्राचीन भारतातील सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ निळकंथा सोमायाजी यांचा जन्म.
१९५५: प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेत्री आणि राजकारणी किरण खेर यांचा जन्म.
१९६७: सुप्रसिद्ध भारतीय उद्योगपती आणि 'आदित्य बिर्ला समूहाचे' अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांचा जन्म.



## विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**माळिशरस, दि. १३ जून-**

सदाशिवनगर येथे महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री शंकर सहकारी साखर कारखाना यांच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यकारी संचालक स्वरूप देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत डूबल उपस्थित होते.

## घंटा वाजणार, शाळा सजणार

उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्या की घरातल्या चिमुकल्यांपासून पालकांपर्यंत सगळ्यांनाच शाळेच्या पहिल्या दिवसाची उत्सुकता लागून राहते. नव्या वर्गाची ओढ, नव्या पुस्तकांचा सुगंध, नव्या गणवेशाची गंमत आणि मित्रमैत्रिणींना भेटण्याचा आनंद काही वेगळाच असतो. यंदा तर जिल्हा परिषद प्रशासनाने शाळेचा पहिला दिवस आणखी खास करण्याचा निर्धार केला आहे.

येत्या १५ जूनपासून जिल्ह्यातील तब्बल २ हजार ७६८ शाळांमध्ये पुन्हा एकदा विद्यार्थ्यांचा किलबिलाट घुमणार आहे. मात्र यावेळी केवळ शाळा सुरू होणार नाहीत, तर प्रत्येक गावात छोटेखानी उत्सवच रंगणार आहे. फुलं, फुगे, चॉकलेट, रांगोळ्या आणि स्वागत गीतांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्याची तयारी करण्यात आली आहे.




एकेकाळी शाळेचा पहिला दिवस म्हणजे वर्गात जाऊन शांत बसायचं आणि शिक्षकांचं ऐकायचं एवढाच कार्यक्रम असायचा. पण आता काळ बदलला आहे. मुलांना शाळा ही आनंदाची जागा वाटावी, त्यांना शिक्षणाची गोडी लागावी आणि पहिल्याच दिवशी त्यांच्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी यासाठी प्रवेशोत्सवाला सणाचे स्वरूप देण्यात आले आहे. विशेषतः पहिल्यांदाच शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांसाठी यंदा खास व्यवस्था करण्यात आली आहे.

अनेक शाळांमध्ये फुग्यांची सजावट, स्वागत कमानी, रंगीबेरंगी रांगोळ्या आणि आकर्षक फलक लावण्यात येणार आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी होणार आहे, तर काही शाळांमध्ये गुलाबपुष्प आणि चॉकलेट देऊन स्वागत करण्यात येणार आहे. शाळेत येताना मुलांच्या मनात भीती नव्हे तर आनंद असावा, हाच यामागचा मुख्य हेतू आहे.

दरम्यान, शिक्षकांनीही तयारीला वेग दिला आहे. वर्गखोल्या स्वच्छ करण्यात येत आहेत, परिसराची साफसफाई सुरू आहे आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा तयार केल्या जात आहेत. पहिल्याच दिवशी मुलांना नीटनेटके, स्वच्छ आणि आनंदी वातावरण मिळावे यासाठी शिक्षक आणि शिक्षण विभागाची यंत्रणा मेहनत घेताना दिसत आहे. यंदा विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके आणि गणवेशाचेही मोठे नियोजन करण्यात आले आहे. लाखो पाठ्यपुस्तके शाळांपर्यंत पोहोचली असून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य वेळेत मिळावे यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. शिक्षणाचा प्रवास पहिल्या दिवसापासूनच सुरळीत सुरू व्हावा, यासाठी ही तयारी महत्त्वाची ठरत आहे. प्रवेशोत्सवाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे समाजाचा सहभाग. गावागावातील लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य, पालक, अधिकारी आणि कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. त्यामुळे शाळा ही केवळ विद्यार्थ्यांची नाही, तर संपूर्ण गावाची जबाबदारी आहे, हा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचणार आहे. खरं तर शाळेचा पहिला दिवस हा केवळ शैक्षणिक वर्षाची सुरुवात नसते. तो मुलांच्या नव्या स्वप्नांचा, नव्या आशांचा आणि नव्या ध्येयांचा प्रारंभ असतो. फुलांच्या सुगंधात, फुग्यांच्या रंगात आणि चॉकलेटच्या गोडीतून मुलांच्या मनात शिक्षणाविषयी प्रेम निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे.

१५ जूनला जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत आनंदाचा हा सोहळा रंगणार असून, पुन्हा एकदा शाळांची घंटा वाजणार, वर्ग भरतील आणि चिमुकल्यांच्या हास्याने शाळांचे अंगण फुलून जाणार आहे. शिक्षणाच्या या नव्या प्रवासाला शुभारंभ करताना प्रवेशोत्सवाचा हा जल्लोष निश्चितच संस्मरणीय ठरणार आहे.

**जिल्हा परिषदेतून**



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

## १३७८ कोटींच्या विस्तारित पाणीपुरवठा प्रकल्पात लोकसहभागाला प्राधान्य

### नागरिकांच्या सूचनांनंतरच अंतिम आराखडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

शहरातील विस्तारित पाणीपुरवठा योजनेच्या आराखड्यात नागरिकांच्या सूचना व हरकतींचा समावेश करण्यात येणार असून त्यानंतरच सविस्तर प्रकल्प अहवाल जागतिक बँकेकडे मंजुरीसाठी पाठविला जाईल, अशी माहिती महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा)चे नोडल अधिकारी रमेश पेटकर यांनी पत्रकारांना दिली. जागतिक बँकेची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष कामाला प्रारंभ होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सोलापूर महानगरपालिकेने १३७८ कोटी रुपयांच्या विस्तारित पाणीपुरवठा योजनेला यापूर्वीच मान्यता दिली आहे. या प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी ५० टक्के निधी जागतिक बँकेकडून कर्जस्वरूपात उपलब्ध होणार असून २५ टक्के निधी राज्य शासन आणि उर्वरित २५ टक्के निधी महापालिकेकडून उभारला जाणार आहे. राज्यातील पहिल्या टप्प्यातील चार महत्त्वाच्या महापालिकांमध्ये सोलापूरचा समावेश करण्यात आला आहे.




या प्रकल्पासाठी नागरिकांच्या सहभागाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शहरातील आठही झोन कार्यालयांमध्ये नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधण्यात आला. या बैठकीत प्राप्त झालेल्या सूचना आणि हरकतींचा अंतिम आराखड्यात विचार करण्यात येणार असल्याचे पेटकर यांनी सांगितले.वाढती लोकसंख्या, सातत्याने वाढणारी पाण्याची मागणी आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटी लक्षात घेऊन ही महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली आहे. सध्या उजनी धरण आणि भीमा नदी प्रणालीवर अवलंबून असलेल्या शहराला वितरणातील गळती, जुन्या जलवाहिन्या आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रकल्पांतर्गत नवीन जलवाहिन्या टाकणे, जलशुद्धीकरण केंद्रांचे आधुनिकीकरण, नवीन जलसाठा टाक्यांची उभारणी तसेच गळती नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याची नासाडी कमी होऊन नागरिकांना अधिक नियमित, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, पाणीपुरवठा योजनेबाबत झालेल्या बैठकींना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे रमेश पेटकर यांनी सांगितले. लोकांना दररोज सुरळीत पाणीपुरवठा हवा आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध विभागांचे सहकार्य मिळत आहे. जलवाहिन्या टाकताना काही अडचणी येतील, मात्र त्यावर समन्वयातून मार्ग काढला जाईल. पुढील पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे पेटकर यांनी स्पष्ट केले.

**शहराची जलसुरक्षा अधिक मजबूत होणार : नरेंद्र काळे**

महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी सांगितले की, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूरकरांना दाबासह नियमित पाणीपुरवठा मिळेल. भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहराची जलसुरक्षा अधिक मजबूत होणार असून आधुनिक जलव्यवस्थापनामुळे पर्यावरणीय शाश्वततेलाही हातभार लागेल.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करण्याची मागणी

**माळशिरस, दि. १३ जून-**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात माळशिरस तहसीलदारांना तालुकाध्यक्ष देविदास ढोपे यांनी निवेदन दिले. नव्या कर्जमाफी योजनेमुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांची मर्यादा न ठेवता सर्वांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. तसेच एकरकमी समायोजन योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही सवलतीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय कर्जमाफीसाठी चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अट रद्द करावी, २०१७ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या लाखो शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि पीकविमा योजनेतील जाचक अटी हटवून योजना पूर्ववत सुरू करावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देखील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऐतिहासिक कामगिरीनिमित्त महाआरती, वृक्षारोपण

**सोलापूर, दि. १३ जून-**

जनतेतून सलग निवडून येत देशाच्या पंतप्रधानपदाची सर्वाधिक काळ यशस्वी धुरा सांभाळण्याचा ऐतिहासिक विक्रम करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी भाजपा प्रभाग क्र. २ तसेच उमेश कोळेकर व धरीराज रमणशेट्टी मित्र परिवारातर्फे शेळगी येथील योगीनाथ मंदिरात महाआरती व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमानंतर वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, संगीता कोळेकर, सरस्वती उपासे, संगीता खेमाणी, श्रीदेवी वागदरे, शांता तानवडे, गौरा हविनाळ, लक्ष्मी पटणे, जगदेवी तानवडे, जगदेवी पटणे, संगीता पाटील, देविका काते, कस्तुरा नरोणे, अनु धरणे, वरनाळे, कोटीवाले, महादेवी तानवडे, मिनाक्षी अंकलगी, पुष्पा कोटीवाले, ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष बाबुराव नरोणे, वीरभद्र उपासे, तानवडे, विश्वनाथ होसाळे, उमेश कोळेकर, धरीराज रमणशेट्टी उपस्थित होते.



### सोलापूरचे गायक मोहम्मद अयाज यांचा भारत भूषण पुरस्काराने सन्मान

**सोलापूर, दि. १३ जून-**

नुकतेच महाराष्ट्र महागायक विजेते मोहम्मद अयाज यांना भारतभूषण राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा मुंबई येथील मेयर सभागृहात आयोजित पुरस्कार सोहळ्यात सन्मान करण्यात आला. मंद्रुपपासून ते मलेशिया, सिंगापूर, दुबई, आफ्रिका, सौदी अरेबियासारख्या देशात जाऊन आपली कला सादर करून सोलापूरच नांव सांस्कृतिक क्षेत्रात उज्ज्वल केले. सिध्दरामेश्वर भजन, आई तुळजाईचा गोंधळ, स्वामी समर्थ महिमा, देशभक्ती, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा देवी-देवता व महापुरुषांवर आधारित अनेक ध्वनिचित्रफीतीतून मोहम्मद अयाज यांनी आपली सेवा बजावलेली आहे.

### अ.भा.म.सा.परिषदेच्या सांगोला महिला तालुकाध्यक्षपदी ठोंबरे

**सांगोला, दि. १३ जून-**

**उपाध्यक्षपदी प्रा. डॉ. शीतल घोंगडे**



सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्य क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाची दखल घेऊन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या सांगोला महिला तालुकाध्यक्षपदी मनीषा राजेंद्र ठोंबरे यांची तर उपाध्यक्षपदी प्रा.डॉ. शीतल अविनाश घोंगडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याबाबत परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शरद गोरे, उपाध्यक्ष शुभांगी काळभोर यांनी नियुक्तीपत्रे बहाल केली. त्यांचा हा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत असणार आहे. या निवडीबद्दल बोलताना नूतन पदाधिकारी यांनी मिळालेल्या नवीन जबाबदारीच्या माध्यमातून सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील नवोदित लेखिका, कवयित्री आणि विद्यार्थिनींना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी अविरत कार्यरत राहण्याचा मानस व्यक्त केला. या दोन्ही निवडींबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार मूर्तींचे संवर्धन

**सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर**

**दि. २२ ते २४ जून दरम्यान प्रक्रिया**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जून -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे दीर्घकालीन जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. प्राप्त तांत्रिक मार्गदर्शन आणि शिफारशींच्या आधारे दिनांक २२ ते २४ जून या कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे संवर्धनाचे काम करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात ११ जून रोजी झालेल्या बैठकीत विविध तज्ज्ञ, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, स्थानिक महाराज मंडळी, मंदिर समितीचे पदाधिकारी, सल्लागार परिषद सदस्य आणि संबंधित अधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. संवर्धनाच्या कामासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया सुरक्षितपणे पूर्ण करता यावी तसेच मूर्तींच्या पावित्र्य आणि सुरक्षेचे रक्षण करता यावे यासाठी दि. २३ व २४ जून या दोन दिवसांमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचे केंद्रस्थान असून, पुरातत्त्व विभाग व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत काळजीपूर्वक संवर्धनाचे कार्य केले जाणार आहे. यापूर्वी सन १९८८, २००५, २०१२ आणि २०२० या कालावधीत मूर्तींचे संवर्धन केले होते. मागील संवर्धनास सुमारे पाच वर्षांचा कालावधी झाल्याने मूर्तींच्या काही भागांमध्ये नैसर्गिक झीज दिसून येत आहे. त्यानुषंगाने मूर्तीतील सूक्ष्म छिद्रे व झिजलेल्या भागांची दुरुस्ती तसेच मूर्तींचे आयुष्यमान वाढविण्यासाठी संरक्षक आवरण देण्यात येणार आहे. सदरची संपूर्ण प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर व राज्य पुरातत्त्व विभाग पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर २३, २४ जून रोजी बंद**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मुर्तींच्या संवर्धनकामी दि. २३ व २४ जून रोजी मंदिर दर्शनासाठी बंद राहणार आहे. वारकरी, भाविक व नागरिकांनी नोंद घ्यावी व प्रशासनास सहकार्य करावे.

**राजेंद्र शेळके,** कार्यकारी अधिकारी, मंदिर समिती.

### अधिक मासनिमित्त नामगजर सोहळा व महासत्संग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने नामगजर सोहळा व महासत्संग कार्यक्रम दी. १४ जून, रविवार सकाळी ९ वाजता जुने विठ्ठल मंदिर, बागेवाडीकर हॉस्पिटल जवळ येथे आयोजित करण्यात आला आहे.

सोलापूर शहर-जिल्ह्यातील भक्त-शिष्य आदी भाविकांनी उपस्थित राहून नामस्मरण, संतसंग या आध्यात्मिक सोहळ्यात सहभाग होऊन या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रामनंदाचार्य संप्रदाय सोलापूर शहर व जिल्हा सेवा समितीकडून करण्यात आले आहे.

कार्यक्रमामध्ये महासत्संग, भव्य नामगजर सोहळा, जिल्हा कमिटी मीटिंग, महाप्रसाद, विविध स्पर्धा, बक्षीस वितरण यांचा समावेश असणार आहे. अधिक माहितीसाठी ९८३४०९६२१८, ९३२६३४७३७७, ७०५८०७०९१६ या नंबरवर संपर्क साधावा.

## चिमुकल्यांना वारकरी संस्कारांची शिदोरी

**महिनाभराच्या बालसंस्कार शिबिराचा समारोप; गीता पठण, हरीपाठ, टाळ-पखवाज प्रशिक्षणातून घडले संस्कारक्षम बालपण**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून**

मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी जाणाऱ्या बालपिढीला वारकरी संप्रदायाच्या संस्कारांची जोड देण्याचा स्तुत्य प्रयत्न श्री संत सावता महाराज वारकरी मृदंग वादन प्रशिक्षण संस्था आणि हरीपाठ परिवार, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आला. अधिक मासानिमित्त आयोजित महिनाभर चाललेल्या वारकरी सांप्रदायिक बालसंस्कार शिबिराचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

कार्यक्रमाची सुरुवात ह.भ,प. सदाशिव चवरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. शिबिरात सहभागी मुला-मुलींनी आत्मसात केलेल्या सांप्रदायिक कला आणि संस्कारांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. शिबिरामध्ये तब्बल ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. महिनाभराच्या कालावधीत विद्यार्थ्यांना भजनामध्ये टाळ कसा वाजवायचा, पखवाज वादनाचे प्राथमिक धडे, वारकरी दिंडीतील पारंपरिक पावले, श्रीमद्भगवद्गीतेचा बारावा आणि पंधरावा अध्याय, पांडुरंगाष्टक तसेच संप्रदायातील नित्य नमन यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

सदाशिव चवरे यांनी यावेळी वारकरी संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. गीतेच्या अध्यायांचे नियमित पठण केल्याने मुलांची स्मरणशक्ती आणि पाठांतर क्षमता वाढण्यास मदत होते, असे सांगितले. आजच्या काळात मुलांना मोबाईलच्या अतिरेकापासून दूर ठेवून संस्कारक्षम वाटेवर नेण्याचे कार्य करणाऱ्या बळीराम महाराज जांभळे यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

शिबिरात श्रीमद्भगवद्गीतेच्या अध्यायांचे मार्गदर्शन ह.भ.प. गोविंद महाराज माने यांनी केले. पखवाज वादनाचे प्रशिक्षण अनिकेत जांभळे यांनी दिले. टाळ, पाऊल आणि हरीपाठाचे प्राथमिक शिक्षण बळीराम महाराज जांभळे यांनी विद्यार्थ्यांना दिले. शिबिरासाठी अंजली लोखंडे, स्वराज केसरे, तन्वी गोसावी, शौर्य भोसले आणि समर्थ कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बळीराम महाराज जांभळे यांनी केले.



### मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ३०० बांधकाम कामगारांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स, सोलापूर व एन्व्हायरोसेफ कन्सल्टंट यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अशोक चौक येथील पोलीस मुख्यालय परिसरात झालेल्या शिबिरात सुमारे ३०० कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते झाले. यावेळी वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर प्रमुख उपस्थित होते. तसेच असोसिएशनचे अध्यक्ष इंजि. बी. एम. जाधव, सचिव संतोषकुमार बायस उपस्थित होते. यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी बांधकाम कामगारांसाठी राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील विविध घटकांसाठी अशा प्रकारच्या आरोग्यविषयक उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रास्ताविक असोसिएशनचे अध्यक्ष इंजि. भगवान जाधव यांनी केली. सूत्रसंचालन कणकी यांनी तर गोकुळ चितारी यांनी आभार मानले. शिबिरासाठी इंजि. इफ्तिकार नदाफ, प्रशांत मोरे, गणेश इंदापूरे, मनोज महेंद्रकर, सुनील दूधगुंडी, जवाहर उपासे, नितीन पवार, बोगासर, मनोज आणि नामदेव म्हेत्रे यांनी परिश्रम घेतले.

### लायन्स क्लब बार्शी रॉयलच्या अध्यक्षपदी मंगेश बागुल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जून-**



लायन क्लब बार्शी रॉयलच्या अध्यक्षपदी मंगेश बागुल यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सेक्रेटरी म्हणून दयानंद रेवडकर, मुख्याध्यापक उपळे दुमाला व ट्रेझरर म्हणून उमेश जाधव, इंजिनियर यांची निवड करण्यात आली.

लायन क्लब बार्शी रॉयलचे गेले दहा वर्षापासून मंगेश बागुल हे सभासद आहेत. दोन वर्षांपूर्वी लायन्स क्लब बार्शी रॉयलचे सेक्रेटरी म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या कार्यकाळात बार्शी तालुका व्यसनमुक्ती अभियान पूर्ण तालुक्याभर राबविण्यात आले होते. बागुल हे तिरुपती ॲग्रो एजन्सीजचे संचालक व ग्रोटेक ॲग्री सायन्सचे रिजनल मॅनेजर म्हणून काम बघत आहे. तिरुपती ॲग्रो एजन्सीजमधून दरवर्षी गरजवंत शेतकऱ्यांना मोफत बियाणं किंवा औषधाचा वाटप केले जाते. आतापर्यंत त्यांच्यामार्फत तालुक्यातील व जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना कृषीचे मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे. निवड प्रक्रियेत नॉमिनेशन कमिटी चेअरमन ला. वर्षा खांडवीकर, माजी अध्यक्ष ला. एम.जे.एफ. संतोष गुळिमरे, ला. अमित कांकरिया यांनी काम पाहिले. ही सर्व निवड प्रक्रिया ला. डॉ. तेजस लाड यांच्या उपस्थितीत झाली. क्लबचे आयकॉन व मार्गदर्शक जितेंद्र दोशी, राहुल दोशी, गणेश भंडारी, संजय खांडवीकर, सुनिल पाटील, मनोज पाटील, शशिकांत बारबोले, राजेश खाडे, राजेश चांगभले, डॉ. निनाद माढेकर, मनिष रुगले, अमोल गुंडेवार उपस्थित होते.

### खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून**

सोलापर येथील पद्माकर देव सभागृहात एनएम फाउंडेशन व नागेश म्हेत्रे मित्र परिवाराच्या वतीने खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला.

सामान्य कामगाराची मुलगी ते राज्यसभा खासदारकी अशी प्रचंड मोठी भरारी घेत्याबद्दल या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी माजी आमदार प्रकाश यलगूलवार, माजी महापौर सुधीर खरटमल, संजय हेमंगड्डी, समाज शहराध्यक्ष सैदप्पा जंगडेकर, माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, नूतन नगरसेवक नरसिंह आसादे, ऋषिकेश म्हेत्रे, यल्लाप्पा बुगले आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात खासदार डॉ. वाघमारे यांच्या हस्ते समाजातील नूतन नगरसेवक व अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश पल्लोलू यांचाही सत्कार करण्यात आला.

### अक्कलकोट परिसरात जांभूळ विक्री जोमात



**शहरवासीय व पर्यटकांकडून मागणीत मोठी वाढ**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १३ जून-**

पावसाळ्याच्या चाहुलीसोबत अक्कलकोट परिसरात जांभळांची विक्री जोमाने सुरू झाली आहे. शहरवासीयांसह पर्यटकांकडून या फळाला मोठी पसंती मिळत आहे. रस्त्यांच्या कडेला, पर्यटनस्थळांच्या प्रवेशद्वारांवर तसेच स्थानिक बाजारांमध्ये जांभूळ विक्रेत्यांची लगबग वाढली आहे.

नैसर्गिक चव, आकर्षक रंग आणि आरोग्यवर्धक गुणधर्मांमुळे जांभूळ हे फळ ग्राहकांच्या पसंतीचे ठरत आहे. विशेषतः मधुमेह नियंत्रणासाठी जागरूकता वाढल्याने मागणी वाढली आहे. शेतकरी व वनक्षेत्रातून जांभूळ गोळा करणाऱ्या कुटुंबांना चांगला रोजगार मिळत आहे. सुट्टीच्या दिवसांत पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत असल्याने जांभूळ विक्रीत आणखी भर पडत आहे. पर्यटक जांभळांचा आस्वाद घेण्याबरोबरच घरी नेण्यासाठीही मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत. अवकाळी व मान्सूनच्या पावसाने हजेरी लावल्याने यंदा दर्जेदार आणि रसाळ जांभूळ उपलब्ध झाल्याने विक्रीत समाधानकारक वाढ झाली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. सध्या आठवडा बाजारासह भाजी मंडईत शेतकरी आणि व्यापारी वर्ग जांभूळ विक्री करीत आहे.

**प्रतिकिलो २५० रुपयांपर्यंत दर**

सालाबादप्रमाणे यंदाही जांभूळ विक्री जोमाने सुरू आहे. त्याचा दर प्रति किलो २५० ते १५० रुपये इतका आहे.

**- अथर्व म्हेत्रे, शेतकरी.**

## अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसादगृहाचे काम प्रगतीपथावर



**दुसऱ्या मजल्यावरील काम वेगाने सुरु**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जून-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसादगृहाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. सध्या दुसऱ्या मजल्यावरील काम वेगाने सुरु आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामीभक्तांची सेवा व सामाजिक बांधिलकी जोपासली जात आहे.

सध्याचे महाप्रसादगृह भविष्यात अपुरे पडू शकते याचा विचार करुन मंडळाने पाच मजली वातानुकुलित महाप्रसादगृहाच्या निर्मीतीचा संकल्प केला. मागील वर्षी गुरु पौर्णिमेच्या मुहूर्तावर बांधकामाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. १,१९,३९८ चौरस फुट इतक्या विशाल जागेवर महाकाय बांधकाम सुरु आहे. महाप्रसादगृह हे संपुर्णपणे वातानुकुलित असणार आहे.

नियोजित महाप्रसादगृहात एकाच वेळी २५०० भक्त जेवणासाठी तर त्याच वेळी ५००० भाविक वातानुकुलित प्रतिक्षालयगृहात बसण्याची व्यवस्था असणार आहे. छतावर जवळपास ५१ फुटांची स्वामी समर्थांची मूर्ती, मेघ डंबरीसह अक्कलकोटच्या बाहेरून कोणत्याही दिशेने येणाऱ्या भाविकांचे लांबुनच लक्ष वेधून घेणार आहे.शेकडो वर्षे टिकेल असे मजबुत बांधकामात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही यादृष्टीने येथील काम सुरू आहे.

अत्याधुनिक साहित्य व अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर याठिकाणी सुरु आहे. एप्रिल २०२७ पर्यंत बांधकाम पुर्ण करण्याच्या उद्दीष्टाने काम सुरू आहे. बांधकामात ब्लॅक जपान पेंटचा वापर केला आहे. यामुळे झालेल्या बांधकामात कुठेही पाणी लागत नाही. जीआरसी (ग्लास रेनफोर्सड कॉंक्रीट) तंत्रज्ञानामुळे तीनही ऋतुपासुन बांधकामाचे शेकडो वर्षे रक्षण होते. तसेच बांधकामात २५ एमएम लेन्थच्या स्पेशल (५१ फुट अखंड) स्टीलमुळे मजबुती मिळाली आहे. मुख्य महाप्रसादगृहात ६६ फुट रुंदीपर्यंत कुठेही सपोर्ट नसताना स्लॅब आहे, ही खासीयत म्हणावी लागेल.

सर्व बाबींची कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे या शासकीय संस्थेकडून चाचणी करत आहेत. बांधकामासाठी ५ टन क्षमता, १०० फुट उंच व १५० फुटी बुम असलेल्या क्रेनचा वापर करत आहे. ही क्रेन सर्व बाजुंनी काम करते. तसेच कमी वेळेत जास्त वजनाचे काम करण्यास उपयोगी पडत आहे. मजुरांची कमतरता यामुळे जाणवत नाही.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आंदोलनास निघालेल्या रोहित पवार यांचा टेंभुर्णीत सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १३ जून-**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी या मागणीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी १२ जूनपासून पंढरपुरात बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यासाठी पंढरपूरच्या दिशेने जात असताना भीमानगर चौकात डीव्हीपी बँकेचे अध्यक्ष औदुंबर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जंगी सत्कार करण्यात आला.

आ. पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणेने विठुरायाच्या पंढरीत १२ जूनपासून बेमुदत अन्नत्याग करणार आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठीचा हा लढा आहे. सर्वांनी या लढ्याला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बाळासाहेब पाटील, सुरेश पाटील, संदीप कुटे, नवनाथ शिंदे, विशाल मस्के, गणेश मुळे, अंबादास महाडिक, नवनाथ महाडिक, सुधीर पाटील, बापू गलांडे, अक्षय धोत्रे, पांडुरंग देशमुख, लखन वाघमोडे, सागर खोले, प्रमोद शिंदे व राजू बनसोडे उपस्थित होते.







## विधान परिषद निवडणूक मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रशिक्षण

### निवडणूक साहित्य ताब्यात घेण्याबाबत सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

महाराष्ट्र विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी येथील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. नगरपंचायत व नगरपरिषद केंद्रांमध्ये मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदारांना ओळखण्यासाठी व्हिडिओ-सीईओ व संबंधित अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे तसेच सर्व संबंधित तहसीलदार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुशांत बनसोडे यांनी प्रशिक्षणासाठी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वागत केले. निवडणुकीसाठी मतदानाचे सहा केंद्र असून दोन उमेदवार आहेत. या निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण ६१६ मतदार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदारांची यादी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरविली जाईल. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या मतदान केंद्रावर ज्या मतदारांची यादी प्राप्त झाली आहे, त्या यादीची प्रथम खात्री करून घ्यावी. तसेच निवडणूक साहित्य ताब्यात घेण्याबाबत सूचनाही त्यांनी दिल्या. दि. १७ जून रोजी सकाळी ९.०० वा. नियोजन भवन सोलापूर येथे साहित्य वितरण होणार आहे.

साहित्य वितरण केंद्रावर वेळेवर उपस्थित राहून साहित्य ताब्यात घ्यावे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय सोडण्यापूर्वी तसेच मतदान केंद्रावर पोहोचल्यानंतर साहित्याची खात्री पुन्हा-पुन्हा करावी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे अहवाल द्यावा, असे सांगण्यात आले. महत्त्वाच्या साहित्याची तपासणी मतदान केंद्राध्यक्षांनी स्वतः करून घेणे आवश्यक आहे. सिलींग साहित्य म्हणून पितळी सिल व लाख, ढकलपट्टी, इशारा फलक यांचाही उल्लेख करण्यात आला.

मतपेटी गोदरेज कंपनीची असून ती उघडणे, सीलबंद करणे यासंदर्भातील प्रशिक्षण होणार आहे. मतपेटीवर ॲड्रेस टॅगवर मतदान केंद्राचे नाव, अनुक्रमांक, पत्ता व दिनांक अचूक लिहिण्याच्या सूचना दिल्या. उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी आभार मानले.

## ५५२ जागांसाठी ४ लाखांहून अधिक उमेदवारांची स्पर्धा

### एमपीएससी पूर्व परीक्षा; जिल्ह्यातील 13 हजारांहून अधिक उमेदवार मैदानात

### पदवाढ व वयोमर्यादा सवलतीची मागणी कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ साठी राज्यभरातील स्पर्धा परीक्षार्थी सज्ज झाले आहेत. रविवार, १४ जून रोजी होणाऱ्या या परीक्षेसाठी राज्यभरातून चार लाखांहून अधिक उमेदवार अर्जदार असल्याची माहिती समोर येत आहे. केवळ ५५२ पदांसाठी ही चुरशीची स्पर्धा रंगणार आहे.

भरती प्रक्रियेत पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) ३१०, राज्य कर निरीक्षक २३६ आणि सहाय्यक कक्ष अधिकारी ६ अशा एकूण ५५२ जागांचा समावेश आहे. निवड प्रक्रिया संयुक्त पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि संबंधित पदांसाठी आवश्यक शारीरिक चाचणी अशा तीन टप्प्यांत पार पडणार आहे. राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर परीक्षा आयोजित केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ३९ परीक्षा केंद्रांवर परीक्षा होणार आहे.



जिल्ह्यातून १३ हजारांहून अधिक उमेदवार परीक्षेला सामोरे जाणार असल्याने परीक्षा केंद्र परिसरात मोठी गर्दी अपेक्षित आहे.

स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात यंदाची ही सर्वाधिक चर्चेतील परीक्षा ठरली आहे. मर्यादित पदसंख्या आणि मोठ्या प्रमाणातील उमेदवार यामुळे स्पर्धेची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे उमेदवारांमध्ये पदसंख्या वाढविण्याची आणि काही संवर्गांमध्ये आरक्षणानुसार जागांचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी सातत्याने होत आहे.

दरम्यान, उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचणे, वैध मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत ठेवणे, तसेच आयोगाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. राज्यभरातील लाखो तरुणांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या परीक्षेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. यश मिळवण्यासाठी उमेदवारांचा अंतिम टप्प्यातील अभ्यास आणि आत्मविश्वासाची खरी कसोटी लागणार आहे.

### परीक्षेची उत्तरसूचीही तातडीने जाहीर करा

जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर आरक्षित संवर्गातील जागा वाढविण्याची तसेच वयोमर्यादेत सवलत देण्याची मागणी केली होती. अनेक पात्र उमेदवारांना यामुळे न्याय मिळाला असता. तसेच राज्यसेवा पूर्व परीक्षेप्रमाणेच या परीक्षेची उत्तरसूचीही तातडीने जाहीर करून पारदर्शकता राखावी.

- **प्रशांत शिरगुर,** राज्य उपाध्यक्ष, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटना.

## मनाच्या समाधानासाठी निस्सीम भक्ती आणि विठूनाम आवश्यक

### हरी महाराज राशिनकर ; दमानी नगर कीर्तन महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**



मन समाधान होण्यासाठी कोणतेही असे ठिकाण नाही. सुखाशिवाय समाधान नाही. मनाच्या समाधानासाठी निस्सीम भक्ती आणि विठूनामाचा जयघोष आवश्यक आहे, असे मार्गदर्शन पंढरपूरच्या गुरुजीबुवा राशिनकर फड परंपरेचे वंशज ह.भ.प.हरी महाराज राशिनकर यांनी काढले.

ह.भ.प.माऊली महाराज बचुटे-सवाळकर शिष्य-मित्र परिवारातर्फे दमानी नगरातील गड दर्शन समाज मंदिरात पंचदिनी कीर्तन महात्सव होत आहे. शुक्रवारी सकाळच्या सत्रात झालेल्या किर्तनात राशिनकर बोलत होते. महाराजांनी सुख आणि समाधान यावर विवेचन करताना माणूस आज भौतिक सुखाच्या मागे लागला असून ते त्याचे अंतिम ध्येय नसून नाम घोषातच सुख आणि समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.

सुख हे बाह्य गोष्टींवर अवलंबून असते तर समाधान हे अंतरिक मनाची तृप्ती असते.जीवनात समाधान मिळवण्यासाठी रोजच्या आयुष्यात लहान सहान गोष्टींमध्ये कृतज्ञता बाळगली पाहिजे, दुसऱ्यांच्या भौतिक सुखांकडे पाहून स्वतःच्या आयुष्याची तुलना करू नये,भूतकाळ आणि भविष्याचा अति विचार न करता रोजचा दिवस आनंदाने जगण्याची सवय लावली पाहिजे. मनाची मशागत करताना काही सकारात्मक भावना, विचार आणि दृष्टिकोन आपला भाग बनवून टाकावे लागतील. गरजू व्यक्तींना मदत केल्यामुळे आणि दुसऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद आणल्याने मनाला समाधान मिळते. साधेपणा आणि सकारात्मकता अंगीकारल्याने सुख, शांती लाभते. जीवनात सुख आणि समाधान यांचा योग्य समतोल असणे अतिशय गरजेचे आहे, असेही राशिनकर यांनी सांगितले.



## चैतन्य सहकारी पतसंस्थेचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १३ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील चैतन्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचा चाळीसावा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला. पतसंस्थेचे व्हा चेअरमन शोभा रोकडे व संजय रोकडे या दाम्पत्याच्या हस्ते गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी श्री गणेशाची व गोंदवलेकर महाराजांची सामुहिक आरती सादर करण्यात आली.

जेष्ठ सभासद दामोदर लोखंडे यांनी प्रास्ताविकात पतसंस्थेची मागील ४० वर्षाची आर्थिक दृष्ट्या प्रगती कशी होत गेली याचा इतिहास मांडला. पतसंस्थेची स्थापना मर्यादित सभासदांच्या सहभागाने १२.६.१९८६ रोजी घाली. ४० वर्षात अनेक संकटांवर मात करत पतसंस्थेची आर्थिक स्थिती सुधारलेली दिसत आहे. संक्षिप्त ठेवी व ठेवीत वाढ होत चालल्याचे दिसत असून कर्ज वसुलीचे प्रमाण हे चांगले असल्याचे संचालक अरिफखान पठाण यांनी सांगितले. चेअरमन रामचंद्र देशमुख यांनी संस्थेच्या ठेवी, कर्ज वाटपातही वाढ झाली असून वसुलीचे प्रमाणही चांगले असल्याचे सांगितले. पतसंस्थेच्या आर्थिक उलाढालीसाठी संचालक मंडळाने व सभासदांनी सहकार्य करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी सरपंच अमोल मदने पाटील, माजी सदस्य राजेंद्रसिंग जामदार यांनी पतसंस्थेविषयी मनोगत व्यक्त केले. शाखा व्यवस्थापक रघुनाथ नरळे यांनी आभार मानले. यावेळी माजी चेअरमन डॉ. मिलिंद गुळिभले, प्रा. तुकाराम पडळकर,जगन्नाथ करडे ,प्रभाकर वाघमारे ,महादेव वाघमारे, माजी सरपंच अमोल मदने पाटील, राजेंद्र सिंग जामदार, अमिनखान पठाण, प्रा. छगन मदने, दत्तात्रय भैस, महादेव तावरे ,विठ्ठल सदेवाले, दशरथ काळे, लक्ष्मण काळे, हरी काळे, गणेश देशमुख, रघुनाथ नरळे, विठ्ठल जाधव, गणेश ढेकळे, राजमाने आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## मोहरम उत्सवानिमित्त करमाळ्यात विविध उपक्रम

### मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्यावतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १३ जून -**

करमाळा शहर व तालुक्यातील करमाळा मोहरम उत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सचिन काळे यांनी दिली आहे.

मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व समविचारी संघटनांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा छत्रपती चौक येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत हिंदू -मुस्लिम भाईचारा वाढीस लागण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात हिंदू मुस्लिम भाविकांना अल्पोपहाराचे नियोजन केले आहे. याबरोबरच सरबतचेही वाटप करणार आहे. हजरत हसन हुसेन यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णांसाठी फळवाटप करणार आहे. याशिवाय अनेक उपक्रमही राबविणार आहेत. मोहरम विसर्जनाच्या दिवशी मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व समविचारी संघटनांतर्फे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा छत्रपती चौक, करमाळा येथे सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करणार असल्याचेही काळे म्हणाले.

मोहरम उत्सव हा करमाळ्यातील हिंदु व मुस्लिम बांधवांचा ऐक्याचा सण आहे. हे करमाळ्याचे विशेष वैशिष्ट्य असून त्याचे जतन करून हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश या सत्कार समारंभातून देण्यात येणार आहे. याच अनुषंगाने मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिक, आजी-माजी पदाधिकाऱ्यांचा सत्कार हिंदू बांधवांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रा. नागेश माने, प्रा. संजय चौधरी, वरकटनेचे माजी सरपंच बापूसाहेब तनपुरे, निवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब गोरे, संभाजी ब्रिगेडचे विभागीय कार्याध्यक्ष नितीन खटके, सतीश वीर, गणेश कुकडे, संतोष शितोळे, शरद जाधव, अजित कणसे, अशोक मचाले, दत्तात्रेय जाधव, अरुण टांगडे, बाळासाहेब झोळ, अतुल निर्मळ, सुहास पोळ, राज झिंजाडे, मराठा सेवा संघाचे व संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी आदी उपस्थित होते



## सांगोला शहरात धार्मिक सलोख्याचे दर्शन

### अधिक मासानिमित्त निघालेल्या दिंड्यांना मुस्लिम बांधवांकडून अल्पोपहार व चहा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१३ जून-**

सांगोला शहरात अधिक मासानिमित्त विठ्ठल नामाच्या गजरात भक्तीभावाने निघणाऱ्या तीन दिंड्यांना मुस्लिम बांधवांकडून अल्पोपहार व चहा वाटप करण्यात आले. यावेळी सामाजिक बांधिलकी आणि हिंदू-मुस्लिम धार्मिक सलोख्याचे एक अनोखे आणि आदर्श उदाहरण संपूर्ण सांगोला शहराला पाहायला मिळाले.

अधिक मासाचे औचित्य साधून शहरात तीन ठिकाणाहून दररोज दिंड्या निघत असतात. सांगोल्यातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येत या दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या वारकरी भाविकांसाठी चहा आणि अल्पोपहाराचे वाटप शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे केले. मुस्लिम बांधवांच्या या अनोख्या उपक्रमाचे आणि आपुलकीचे वारकऱ्यांनी मनापासून कौतुक केले व धन्यवाद मानले.

याप्रसंगी शाही जामा मस्जिदचे इमाम हाफिज शाहिद रजा, हाजी युसुफ मुलाणी, सलिम मुलाणी, मेहबुब पठाण, निहाल मुलाणी, हाजी हसन पठाण, मेजर सलिम शेख, इम्रान मुल्ला, राजू मुलाणी उपस्थित होते. सांगोला शहराला नेहमीच सर्वधर्मीय एकतेची आणि सलोख्याची मोठी परंपरा लाभली आहे. या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल सर्वच स्तरातून मुस्लिम बांधवांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अन्यथा, वीज वितरण कंपनीच्या कार्यालयांना टाळे ठोकणार

### माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१३ जून-**

भारनियमनामुळे सांगोला तालुक्यातील शेतकरी, पशुपालक चिंतेत आहेत. आठ दिवसात तालुक्यातील भारनियमन कमी न झाल्यास महावितरणच्या कार्यालयांना टाळे ठोकून महावितरणच्या अधिकाऱ्यांना तालुक्यात फिरकू देणार नाही असा इशारा माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिला आहे.



सांगोला तालुक्यातील वाढते भारनियमन, शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई तसेच शेतकऱ्यांच्या जीवनात जाणवणाऱ्या दैनंदिन समस्या याबाबत आयोजित कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी जि.प.अध्यक्ष जयमाला गायकवाड, पं.स.सभापती पुनम इंगवले, तानाजी पाटील, अनिल खटकाळे, मधुकर बनसोडे, नगरसेवक गणेश बनकर, सखाराम तंडे, राम बाबर, अरुण घुले, डॉ. सुदर्शन इंगवले, दिलीप नागणे, चंद्रकांत कारंडे, विजय शिंदे, चंद्रकांत चौगुले, समीर पाटील, विजय येलपले, डॉ.राज मिसाळ, संतोष पाटील, अनिल खडतरे, सचिन लोखंडे, शिवाजी बनकर, विजय पवार यांच्यासह कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यंदा भीषण उन्हाळा जाणवला असल्याने पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. विजेचा प्रश्न गंभीर झाला असून भारनियमन वाढले आहे. तालुक्यात भारनियमन वाढल्याने शेतातील पिके, फळबागा जळून जात आहेत. तसेच जनावरांचे दूध काढण्याच्या वेळी वीज नसल्याने जनावरांच्या धारा हाताने काढण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर होऊ लागला आहे. राजकारणाच्या पुढील काळात कार्यकर्त्यांच्या मनात आहे, तोच निर्णय घेतला जाईल असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. याप्रसंगी जयमाला गायकवाड, पूनम इंगवले, तानाजी पाटील, विजय शिंदे, विजय येलपले, विलास व्हनमाने, बाबासाहेब तोडकरी, भाऊसाहेब यमगर, शहाजी खरात, डॉ. अक्षय चोरमुले, तानाजी बाबर, ॲड. संपत पाटील, शिवाजी कोळेकर, शिवाजी बनकर, चंद्रकांत चौगुले, विजय पवार, अजिंक्य शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

### स्थानिक पातळीवर सर्व अधिकार कार्यकर्त्यांना

आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत जास्तीत जास्त ग्रामपंचायतीवर आपली सत्ता मिळवण्यासाठी प्रत्येक गावातील स्थानिक समीकरण लक्षात घेऊन कोणत्या प्रभागात कोणता उमेदवार द्यायचा आणि कोणत्या गावात कोणत्या गटासोबत आघाडी करायची याचे संपूर्ण अधिकार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी स्थानिक कार्यकर्त्यांना देत असल्याचे सांगितले. आपापसातील मतभेद विसरून खांद्याला खांदा लावून या निवडणुकीत कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

## कन्हेरगावच्या वीजप्रश्नावर आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १३ जून-**

कन्हेरगाव (ता. माढा) येथील वाड्या-वस्तीवरील सिंगल फेज वीजपुरवठा मागील दोन महिन्यांपासून रात्रीच्या वेळेत बंद ठेवण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या प्रश्नाकडे महावितरण प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास सोमवार, दि. १५ जून रोजी सकाळी १० वाजल्यापासून टेंभुर्णी येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांनी दिला आहे.

याबाबतचे निवेदन टेंभुर्णी येथील महावितरणचे उपअभियंता महेश पवार यांना दिले आहे. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, संजय डोके पाटील, किशोर मोरे उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, कन्हेरगाव येथील वाड्या-वस्तीवरील सिंगल फेज वीजपुरवठा दररोज सायंकाळी ६ ते सकाळी ८ वाजेपर्यंत खंडित ठेवला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर, पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर परिणाम होत आहे. वारंवार तक्रारी करूनही या समस्येचे निराकरण करण्यात आलेले नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. वीजपुरवठा तात्काळ नियमित न झाल्यास १५ जूनपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.